
# माणूस

चित्र वार्ता पुस्तक पुरवणीसह

शनिवार
१७ मे १९७५
एक रुपया




**सत्ता + अहंकार = मोरारजी !**

**सत्ता + अहंकार = मोरारजी !**

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १७ मे | अंक : पन्नासावा (५१) |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


## मोरारजी देसाई
# अहंकारग्रस्त नेत्याची दुर्दैवी शोकांतिका

ग. प्र. प्रधान

राजकारण ही हाराकिरी नाही. ही एक चिवटपणे खेळण्याची लढाई आहे. दीर्घकाल डावपेच करीत सत्तेचे राजकारण खेळणे ही सोपी गोष्ट नाही. प्रबल महत्त्वाकांक्षा आणि स्वकर्तृत्वाबद्दल जबर विश्वास असणाऱ्या व्यक्तीच सत्तास्पर्धेत टिकून राहतात. मोरारजी देसाई हे या वर्गातील नेते आहेत.

म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीत भाग घेऊन मोरारजीभाईंनी त्यांच्या राजकीय जीवनास सुरुवात केली. ते स्वतःला कट्टर गांधीवादी म्हणवितात. परंतु त्यांचा गांधीवाद महात्माजींच्या अनेक इतर अनुयायांपेक्षा वेगळा आहे. आचार्य विनोबा भावे यांना गांधीजींच्या शिकवणुकीतील तत्त्वज्ञानात्मक भाग महत्त्वाचा वाटतो.पंडित नेहरूंना गांधीजींच्या मानवतावादी दृष्टिकोणाचे आकर्षण वाटले. अप्पासाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्रबुद्धे आदींना महात्माजींच्या विधायक कार्याचे आकर्षण वाटले. ठक्करबाप्पांना गांधीजींची दलितांच्या उद्धाराची तळमळ स्फूर्तिदायक वाटली. मोरारजीभाईंना मात्र गांधीवादातील कर्मकांडामुळे निर्माण होणाऱ्या अहंकाराने पछाडले. म. गांधींनी अनेक कठोर व्रतांचा आचार केला तरी जीवनातील अपूर्णतेची जाणीव असल्यामुळे त्यांनी सामान्य माणसाचा कधी तिटकारा केला नाही. परंतु या व्रताचारामागील ही व्यापक सहानुभूती मोरारजीभाईंना न समजल्यामुळे त्यांच्या व्रताचारातून अहंकार व हट्टाग्रहच निर्माण झाला.

मोरारजी देसाई यांनी सत्याग्रहात भाग घेतला तरी सत्याग्रही नेते म्हणून त्यांना मोठीशी मान्यता मिळाली नाही. १९३७ साली खेर मंत्रिमंडळात महसूलमंत्री म्हणून त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली, त्या वेळी एक कार्यकुशल प्रशासक म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला. पुढे १९४२ च्या चळवळीच्या वेळी ९ ऑगस्टला जी पुढाऱ्यांची धरपकड झाली, त्यात ते पकडले गेले. तुरुंगात असताना, 'भूमिगत चळवळीने अहिंसेच्या राजकारणाला काळिमा आणला' अशीच भूमिका ते मांडीत असत. देशात अराजक माजले तरी चालेल, पण स्वातंत्र्याची आकांक्षा दडपून चालणार नाही, ही म. गांधींची भूमिका मोरारजींना मानवणारी नव्हती. अहिंसेच्या व्रताचाराचेच त्यांना अधिक महत्त्व वाटत होते.

स्वातंत्र्योत्तर कालात पुनश्च मंत्रिमंडळे स्थापन झाल्यावर मोरारजींना स्थान मिळणे अपरिहार्य होते. प्रथम ते मुंबई राज्याचे गृहमंत्री झाले आणि खेरांच्या नंतर मुख्यमंत्रिपदावर त्यांची निवड झाली. या श्रेष्ठ सत्तास्थानी असताना त्यांच्यातील अहंकार, उद्धटपणा व असहिष्णुता हे अवगुण प्रकर्षाने अनेकदा प्रकट झाले. त्यांनी विरोधकांची अवहेलना केली. एक कम्युनिस्ट कार्यकर्ते तुरुंगात आजारी होते, तेव्हा त्यांची पॅरोलवर सुटका व्हावी, अशी विनंती करावयास त्यांचे बंधू मोरारजीभाईंच्याकडे गेले होते. ती मागणी नाकारताना, 'विध्वंसक वृत्तीच्या लोकांना तुरुंगात मरण आले तर काय बिघडले?' असे उद्गार मोरारजीभाईंनी काढले.

श्री. एस. एम. जोशींच्या एका उपवासाच्या वेळी मोरारजींनी मध्यस्थी करावी, अशी विनंती करणाऱ्या एका नेत्याला 'कोणी आत्महत्या करू लागला तर मला त्याला अडवण्याचे कारण काय?' असे मोरारजीभाई म्हणाल्याचे त्यावेळी वृत्तपत्रात आले होते. गोवा मुक्तिसंग्रामाच्या वेळी सत्याग्रहींना ट्रकमधून जाण्यास बंदी घालताना त्या सत्याग्रहाबद्दलही मोरारजींनी असेच गरळ ओकले होते.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी मराठी जनतेचा स्वाभिमान दुखवावा असे मोरारजीभाईंचे अनेक प्रलाप महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. मुंबईमध्ये अमानुष गोळीबार करताना, सत्तेची अमर्याद धुंदी मोरारजी देसाईंना चढली होती. विरोधकांना कस्पटासमान लेखणे, लोकक्षोभामागील सात्त्विक संताप न समजणे असे प्रमाद ठायी ठायी हातून घडत असताना मोरारजीभाई मात्र 'माझी भूमिकाच नैतिक व शुद्ध आहे' अशा तोऱ्यात सतत वावरत असत. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर गुजरातमध्येही मोरारजी देसाईंनी विलक्षण अप्रियता संपादन केली. अहमदाबादच्या लोकांनी त्यांच्या सभेवर जनता कर्फ्यू पुकारून त्यांना चांगलाच धडा दिला.

१९५७ सालच्या निवडणुकीत महाराष्ट्रात काँग्रेसचा जो पराभव झाला त्याचे मोठे श्रेय मोरारजीभाईंच्या घमेंडखोरीला व

उन्मत्तपणालाच आहे. नंतर एकमताने मुख्यमंत्री म्हणून निवड न झाल्याने मोरारजींनी मुंबई राज्य सोडले व पं. नेहरूंनी त्यांना केन्द्रिय मंत्रिमंडळात घेतले. केन्द्रात अर्थमंत्री असताना मोरारजी देसाई हे अमेरिकेत गेले होते. त्यावेळी अनेक मातब्बर व्यक्तींशी बोलताना, 'तुम्ही भारताच्या भावी पंतप्रधानाशी बोलत आहात' अशा तोऱ्यात ते वावरत असत. मोरारजीभाईंनी पैसे खाल्ले नाहीत हे खरे. प्रशासक म्हणून त्यांनी कोणाची गय केली नाही हे खरे. पण नवे धोरण आखताना त्यांनी कधीही प्रतिभेची झेप दाखवली नाही. इतकेच नव्हे तर सुवर्ण नियंत्रण हे पुरोगामी पाऊल टाकताना गरीब सुवर्णकार मरू नये अशी खबरदारीही घेण्याची आवश्यकता त्यांना वाटली नाही.

पं. नेहरूंच्या निधनानंतर भारताचे पंतप्रधान होण्याचे आपले स्वप्न पूर्ण होणार असे मोरारजींना वाटू लागले. परंतु कामराजांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली व लालबहाद्दूर शास्त्री हे पंतप्रधान झाले. हा अपमान गिळून 'माझेही दिवस येतील' या आशेने मोरारजीभाई मंत्रिपदास चिकटून राहिले. शास्त्रीजींच्या निधनानंतर काँग्रेसच्या खासदारांनी इंदिराजींच्या बाजूने कौल दिला आणि मोरारजींचे स्वप्न पुन्हा भग्न झाले. परंतु येथेही मोरारजीभाईंच्या चिवट आशावादाने त्यांच्या स्वाभिमानावर मात केली आणि ते इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळात दुसऱ्या स्थानावर संतुष्ट राहिले. १९६७ च्या निवडणुकीनंतरही मोरारजींना याच दुय्यम स्थानावर राहावे लागले आणि १९७० मध्ये बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा कुशल डाव खेळून इंदिरा गांधींनी त्यांना अर्धचंद्र दिला.

इतके दिवस सत्तास्थानावर वावरणारे मोरारजीभाई यानंतर विरोधी पक्षात आले. ज्या गोष्टी त्यांनी अधिकारावर असताना केल्या त्याबद्दलही त्यांनी इंदिरा सरकारवर टीका केली. या टीकेची फारशी गंभीर दखल कोणी घेतली नाही ही गोष्ट वेगळी.

पुढे गुजरातेत चळवळ झाली. ही चळवळ मुख्यतः विद्यार्थ्यांनी केली. या चळवळीच्या सुरात सूर मिळवून मोरारजीभाईंनी काँग्रेसच्या भ्रष्ट शासनावर टीका केली. पण या चळवळीस ते Positive वळण लावू शकले नाहीत. बिहारमध्ये चळवळ सुरू झाल्यावर जयप्रकाश नारायण यांना विद्यार्थ्यांनी नेतृत्व करण्याची विनंती केली आणि जयप्रकाशजींनी भ्रष्टाचारविरोधी आंदोलनास नवी तात्त्विक बैठक देऊन सर्वंकष क्रांतीची कल्पना देशापुढे मांडली. जयप्रकाशजींच्या असामान्य व्यक्तिमत्त्वामुळे देशातील राजकारणाची कोंडी फुटली. विरोधी राजकीय पक्षांवरील विश्वास उडालेल्या जनतेला नव्या तेजाचा साक्षात्कार झाला व राजकीय क्षेत्रात एक अभूतपूर्व आंदोलन उभे राहिले. मोरारजीभाईंनी या आंदोलनास पाठिंबा दिला. पण जयप्रकाशजींचे नेतृत्व स्वीकारण्याचा मनाचा मोठेपणा त्यांच्याजवळ नव्हता. 'मी व जयप्रकाश नारायण यांनी राजकारणाला नवे वळण दिले' असेच ते मानतात. ज्या समाजवाद्यांना एका वेळी तुच्छ लेखले, ज्या जनसंघावर एका वेळी प्रहार केले, त्याच पक्षाच्या नेत्यांच्या समवेत बसणे मोरारजीभाईंना भाग पडले. पण ज्या चिवटपणाने केन्द्रिय मंत्रिमंडळात दुसऱ्या स्थानावर ते राहिले त्याच चिवटपणाने ते विरोधी आघाडीत राहिले.

६ मार्चला जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली दिल्लीत लोकसभेवर प्रचंड मोर्चा गेला. पण या जनशक्तीच्या दर्शनाने उत्साहित होण्याऐवजी मोरारजींच्या अहंकारी मनाला अहमदाबादला स्वतःच्या नेतृत्वाखाली मोर्चा काढणे श्रेयस्कर वाटले. नव्या आंदोलनाचे नेते जयप्रकाशच आहेत, हे देशभर मान्य झाले आहे. पण हे नेतृत्व स्वतःकडे ओढून घेण्याचा अटीतटीचा (desperate) प्रयत्न म्हणून मोरारजीभाईंनी गुजरातमधील निवडणुकीच्या प्रश्नावर उपोषण सुरू केले. मोरारजीभाईंच्या उणीवांची जाणीव असूनही त्यांचे प्राण वाचावे, ही देशभर भावना निर्माण झाली आणि इंदिराजींनाही ही तीव्र भावना जाणवल्यामुळे माघार घेणे भाग पडले.

यानंतर गुजरातमधील एक नवे पर्व निर्माण होऊ शकले असते. परंतु मोरारजी देसाईंचा अहंकार तेथेही आडवा येत आहे. एकत्र येणाऱ्या पक्षांचे मन जिंकणे हे त्यांना आवश्यक वाटत नाही. सर्वाधिकाऱ्याच्या तोऱ्यात ते वावरत आहेत. भारताचा मीच भावी पंतप्रधान आहे, अशा भ्रमात ते वावरत आहेत. या त्यांच्या अरेरावीमुळे तरुण कार्यकर्ते दुखावले जात आहेत. चळवळीचे ऐक्य दुभंगत आहे. पण मोरारजीभाईंचा हट्टाग्रही अहंकारी स्वभाव बदलणे शक्य नाही. ती जित्याची खोड आहे. या अहंकाराचे इतक्या विस्ताराने वर्णन करण्याचे प्रयोजन इतकेच की, जयप्रकाशजींच्या भव्य आणि उदात्त आंदोलनाला या अहंकाराने गौणत्व प्राप्त होत आहे. एका आत्मकेंद्रित नेत्याला वृद्धापकाळातही देशाच्या भवितव्यापेक्षा स्वतःची महत्त्वाकांक्षा मोठी वाटावी, ही एक दुर्दैवी व खेदकारक घटना आहे. अहंकारग्रस्त मोरारजीभाई स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेत असून ज्या चळवळीने त्यांच्या राजकारणात जीवदान दिले, त्या चळवळीचाही अवसानघात करीत आहेत, ही शोकांतिका आहे. ☐

---


या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण घाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

**आनंदाच्या दाही दिशा**

**रवींद्र पिंगे**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

**किंमत । दहा रुपये**

गुजरातेतून : चंद्रशेखर

# वैभव आणि वैराग्य यांचे चमत्कारिक मिश्रण

संघटना काँग्रेसचे कार्यालय. व्हरांड्यात चार-पाच माणसे भजन म्हणत आहेत. भोवताली पंधरा-वीस मंडळी भकास चेहरे करून उभी. त्यांत मी एक ! ऑफिसच्या मधल्या सुटीत सहज चक्कर मारायला म्हणून बाहेर पडलो. मोरारजींच्या उपोषणाबद्दलचा बोर्ड वाचायला थांबलो–भजन ऐकू आले म्हणून उभा राहिलो.

'हे जी रे ' असल्या खास हेलांनी भरगच्च असे हे भजन (महेंद्र कपूर यांची फिल्मी भजने आठवा) धंदेवाईक भजनकरी मोठ्या जोसात करीत होते. घामाने पार थबथबून गेले होते. त्यातल्या एका माणसाने माझे लक्ष अगदी खिळून ठेवले.

त्याच्या दोन्ही हातात खंजिरीसारख्या आवाज करणाऱ्या दोन पट्ट्या होत्या. तो असे काही हातवारे करीत होता. देखते रहो. कधी दोन्ही हात वर्तुळाकार तर कधी डोक्याच्या मागे, तर कधी सताड मागे वाकवून पाठीच्या मागे, कधी डोके जमिनीला लावून, कधी डोके मागे झुकवून. हे सारे इतके वेगात की नजर ठरू नये.

त्याने कितीही व कसेही हातवारे व आविर्भाव केले तरी त्याच्या खंजिरी पट्ट्यातून एकच आवाज होत होता. पाहाताना मनात आले, आपल्या राजकारणी मंडळींची स्थिती याहून फार वेगळी नाही. कितीही वेगवेगळ्या घोषणा दिल्या, कितीही आविर्भाव आणले, कितीही रंग बदलले तरी त्यांच्या व्यक्तित्वातून 'सत्ता सत्ता' हाच एक आवाज उमटत असतो. समोरच्याची नजरबंदी करणे, स्वतःकडे लक्ष वेधून घेणे हाच त्याचाही उद्योग असतो.

सत्तेच्या व्यवहारात गुजरात तसा फार जुना व मातबर. गांधी-पटेल यांचे सोडा, पण इतर गुजराती नेतेही हा व्यवहार फार पक्केपणाने करीत आले आहेत. राजकारणाचे अनेक पवित्रे येथून पैदा झाले.

त्यापैकी एक जुनाच पवित्रा व तसा बदनाम झालेला–पण जिद्दीने वापरला मोरारजी देसाई यांनी. मला तर वाटते, उपोषण हे अस्त्र वापरण्यास स्वभावदृष्ट्या मोरारजींखेरीज अन्य कोणाताही नेता योग्य नाही. अव्वल दर्जाचा हेकटपणा असल्याशिवाय उपोषण स्वतःच्या फायद्याकरता वापरणे अशक्य आहे. मोरारजींच्या उपोषणकाळात इतरत्र किती कुतूहल होते याची मला कल्पना नाही, पण अहमदाबादमध्ये मात्र बरीच हवा तयार झाली होती. रोज वार्ताफलक, देवळातील भजने, फूटपाथवरच्या सभा (हितेंद्र देसाईंची अशी एक सभा ऐकली. इतक्या वेगाने हे गृहस्थ बोलत होते, 'जनता व लोकतंत्र ' हे शब्द इतक्या वेळा उच्चारत होते की, इतर काहीच पत्ता लागला नाही. ), मोर्चे वगैरेंनी उपोषणकाळात शहर गजबजले होते. 'वातावरण तंग झाले ' वगैरे शब्दप्रयोग आजवर पेपरात वाचीत आलो पण हे नक्की कसे होते, त्याचा आजवर पत्ता नव्हता, तो येथे लागला.

१२ एप्रिलची संध्याकाळ. पुण्याला जाण्यासाठी रात्रीचे तिकीट १५ दिवस आधी काढून ठेवले होते. ७ वाजता रस्त्यावर हिंडताना एकदम कसला तरी ताण जाणवू लागला. लाल दरवाजा बस स्टँडवर बसेसमधील हवा काढून टाकीत आहेत–' तोफान ' सुरू झाले असे समजले. रायपूर–अल्टोडिया भागात 'धांदलियां ' नी धमाल माजवली असे ऐकत आहो, तोच सर्व बसेस रस्त्यावरून काढून घेतल्या असे समजले. रायपूर–अल्टोडिया भागात कर्फ्यू लावली असे वर्तमान आले. 'तंग वातावरण ' कसे असते ते तर पाहिलेच, पण माझी स्वतःची हवाही तंग झाली. आता स्टेशनवर कसे जाणार ? सगळीकडे सामसूम झाले. (एका पोलीस अधिकाऱ्याच्या मदतीने कसाबसा स्टेशनवर गेलो ते वेगळे.)

मोरारजींच्या उपोषणाने गुजरात निवडणुका जूनच्या सुरुवातीस घेण्याचा निर्णय इंदिरा गांधींनी घेतला, त्याचे अनेक अन्वयार्थ वृत्तपत्रांनी लावले. मला वाटते, या प्रकरणाची खरी हकीकत दहा वर्षांनंतर केव्हा तरी कळू शकेल. धारियांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेस पक्षात निर्माण झालेल्या अंतर्गत अस्वस्थतेचा फायदा घेऊन मोरारजी यांनी उपोषणाचा पवित्रा घेतला व हे गृहस्थ अगदी दुर्लक्षण्याजोगे नाहीत, अशी श्रीमती गांधींची खात्री पटली म्हणून त्यांनी मोरारजींची मागणी मान्य केली एवढेच सध्या म्हणता येईल.

आपले मर्यादित यश मोरारजी कसे पचवतात ते दिसलेच, पण सध्या तरी त्यांची मूळची 'हम करेसो ' वृत्ती वर उफाळून आली आहे. बिगर–कम्युनिस्ट विरोधकांची 'जनता फ्रंट ' म्हणजे सब कुछ मोरारजी असा मामला आहे. त्यांच्या या वृत्तीचा अंदाज घेऊनच हितेंद्र देसाई यांनी साऱ्या प्रकरणातून अंग काढून घेतले आहे. जयप्रकाश नारायण यांना देखील फारसे महत्त्व देण्यास मोरारजी तयार नाहीत. त्यांनी चमत्कारिक वक्तव्ये करण्यास सुरुवात केली आहे. 'मी मुख्यमंत्री होणार नाही पण जनतेची इच्छा असल्यास पंतप्रधान होईन, ' असे अत्यंत असंबद्ध उद्गार त्यांनी नुकतेच काढले. जनसंघ व स्वतःचे अनुयायित्व पत्करणारी काही मंडळी एवढाच मोरारजींचा आधार आहे.

गुजरातचे राजकारण हा एक निराळाच प्रकार आहे. एरवी ' नवनिर्माण ' आंदोलनात पूर्णपणे बदनाम झालेले चिमणभाई पटेल स्वतःचा पक्ष काढण्याइतके मोठे कसे होतात व त्यांना जनता फ्रंट जवळ कशी करते ? तेव्हा राजकारणामधील 'सौदेबाजी 'चे अंग, जन्मजात सौदेबाज असलेल्या गुजराती मंडळींनी चांगलेच जोपासले आहे. येथे एखादी पेढी टाकावी इतक्या सहजपणे नवी आघाडी, नवा पक्ष वा नवी समिती यांची निर्मिती होते.

'यूथ पॉलिटिक्स ' हा गुजरातच्या राज-

पृष्ठ ४० वर



# मुंबई
## दोन चित्रे







परीक्षाच रद्द करा ही मागणी घेऊन
रिव्हॅल्युशनरी स्टुडंटस फ्रंट नावाच्या
विद्यार्थी संघटनेने आंदोलनाची घोषणा
केली आणि ३० एप्रिलच्या दुपारी मुंबईत
अभूतपूर्व दंगल उसळली.
लाठीमार दगडफेक मोडतोड डबे जाळणे
इ. सर्व प्रकार नेहमीप्रमाणेच पार पडले.
अवघ्या पाच मिनिटात सुरू झालेली ही
हिंसक दंगल मोजून पंचेचाळीस मिनिटात
शांत झाली.

आणि.......








आणि..... पूर्वी ठरल्याप्रमाणेच परीक्षा सुरू झाल्या.
फक्त फरक इतकाच की कडेकोट
पोलिस बंदोबस्तात विद्यार्थ्यांना पेपर्स
लिहावे लागले.








# राज्य कर्मचारी संपावर
# भीक मागतो रस्त्यावर


## "३७ रुपये = ३७ चकोट"

केंद्रीय व राज्य कर्मचाऱ्यात कमीतकमी फरक
किती रुपयांचा आहे ? तो पब्लिकला दाखविण्यासाठी
चकोट करणाऱ्या या संपावरील ३७ कर्मचाऱ्यांना विचारा.


## "केशदान"

३७ कर्मचाऱ्यांचे हे 'केशदान'
केन्द्रीय अर्थमंत्री श्री. सी सुब्रह्मण्यम
यांच्याकडे सप्रेम सादर करण्यात आले आहे.










हे रक्तदान नव्हे. हे आहे संतप्त रक्त.
मुख्यमंत्री सुखी माणसाच्या सदऱ्याच्या शोधात होते असे कळले म्हणूनच संपावरील कर्मचाऱ्यांनी स्वत:चे थेंब थेंब रक्त देऊन त्यांत भिजवलेला सदरा मुख्यमंत्र्याना पाठवून दिला.

ससूनची 'सेवा' करणाऱ्यांपैकी एक महिला होमगार्ड.

संपकाळात आवश्यक सेवा सुरळीतपणे कशा चालू आहेत? निष्कामसेवाव्रत घेतलेल्या या होमगार्डांना विचारा. बाटल्या धुण्यापासून त्यांचे वाटप करण्याचे काम तेच करीत आहेत तर कामावर आलेले कर्मचारी आराम करीत आहेत.



राज्य कर्मचारी संप

# १

# सरकारचे बोटचेपे धोरण संपनेत्यांचा धीमेपणा....

प्रकाश जोशी

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा संप चालू आहे.

आज २२ वा दिवस.

पण संप चालू आहे हे सांगावं लागतंय्. सकाळी उठल्यावर दुधाची बाटली आपल्याला वेळेवर मिळते, पाणी पुरवठा सुरळीत आहे. ससूनमध्ये केस पेपर मिळतो, रुग्णांची देखभाल होते. सगळीकडे शांतता आहे. त्यामुळे आपल्याला संप चालू असल्याचं सांगावं लागतं. कारण त्याची प्रत्यक्ष झळ आपल्याला बसत नाही.

सरकारी धोरणही अतिशय मवाळ, लेचेपेचे आहे. कालच सरकारने शेपूट घातले. नऊ तारखेला कामावर या नाहीतर गंभीर परिणामाला तोंड द्या असा निर्वाणीचा इशारा मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांनी दिला होता. संपफोड्या म्हणून प्रसिद्धी पावलेल्या ओंकारांच्या काही तुरळक पाठीराख्यांची मामुली उपस्थिती वगळता संपावरील कर्मचारी कामावर आलेच नाहीत. कोणीच कामावर आलेले नाही, हे बघून मुख्यमंत्र्यांनी सरळ एकतर्फी शरणागती पत्करली. मुदत वाढवून दिली. सोमवारपर्यंत कामावर आलात तर संपकाळातील वेतन, वगैरे प्रलोभने दाखविली, अन्यथा वेतनखंड, कडक कारवाई करू अशी धमकी दिली आहे.

संप हे काही दीर्घकाळ वापरायचे साधन नाही. बघता बघता ते अंगावरही उलटतं.

पण तरीही हा संप चालू आहे.

रेल्वेचा प्रचंड संप सरकारने मोडून काढल्यानंतर खरं पाहिलं तर देशातील, कोणत्याच संपाला निदान काही वर्षंतरी भवितव्य नाही.

असे असतानाही राज्य कर्मचाऱ्यांचा हा संप कोणताही गाजावाजा न करता धीमेपणाने चालू आहे.

संप दीर्घकाळ चालू राहण्याला दोन महत्त्वाची कारणे दिसतात. एक म्हणजे सरकारचे बोटचेपे धोरण. सुरुवातीपासूनच सरकारचे धोरण अतिशय सहानुभूतीचे दिसते. कोणतेच पाऊल सरकारने स्वत: उचलले नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे संपनेत्यांचा धीमेपणा. संपाला अनिष्ट वळण लागू न देण्याचे श्रेय त्यांचेच. संपाला समाजाकडून पाठिंबा जरी मिळाला नाही तरी विरोध होऊ नये म्हणून संपनेत्यांनी आवश्यक सेवा कर्मचाऱ्यांनी कामावर पाठविण्याचा निर्णय संप सुरू करून चोवीस तास होण्याच्या आतच घेतला.

केंद्रिय दराने आम्हाला महागाई भत्ता द्या ही राज्यकर्मचाऱ्यांची एकमेव प्रमुख मागणी. तर आमच्याकडे पैसा नाही, त्यामुळे केंद्राइतका जरी नाही तरी महागाईभत्ता वाढवून दिला जाईल ही महाराष्ट्र शासनाची भूमिका. त्यात रस्सीखेच. या बावीस दिवसांत अनेकवेळा अनेक पातळ्यांवर चर्चा-वाटाघाटी झाल्या. संप मिटण्याची आशा अनेकवेळा उगवली व मावळली. संप आपला चालूच आहे.

पुण्यातील सेंट्रल बिल्डिंगचे आवार. मागची बाजू. गुलालाची उधळण. झाडाच्या सावलीत आराम. संपावरील कर्मचाऱ्यांची वर्दळ. काही येतात, काही जातात. आपापसात गटागटाने चर्चा. आजचा कार्यक्रम काय ? संध्याकाळी मोर्चा. बरंय, संध्याकाळी येतो.

गेले वीस दिवस संपावरील कर्मचाऱ्यांचे यात्रास्थान असे स्वरूप आंबेडकर पुतळ्याच्या परिसराला आलेले. तिथल्या भिंतीवर कर्मचारी नेता उभा राहतो. टाळी वाजवून लक्ष वेधतो. पांगलेले, पेंगुळलेले कर्मचारी जमतात. नेता काही तरी सांगतो. मध्येच टाळ्या. ' हम सब एक है ', एकजुटीचा विजय असो ' घोषणा. संपाच्या हालचालीची माहिती दिली जाते, काही कार्यक्रम ठरविले जातात, परत लोक पांगतात. झाडाखाली कट्ट्यावर गटागटाने चर्चा.

विषय एकच. संप.

प्रश्नही एकच. संपाचे काय झाले ?

नेत्यांकडे तरी त्याचे उत्तर कुठे आहे ? मग कार्यकर्त्यांपुढे काही ना काही कार्यक्रम मांडले जातात. कारण वेळ कसा घालवायचा हाही प्रश्नच. ऑफिसात बसून रिकामा वेळ घालविणे सोपे पण ऑफिसबाहेर कठीणच.

संपाच्या काळात निरनिराळे कल्पक कार्यक्रम आखण्यात पुणेकर आघाडीवर होते. संपात समाजाची सहानुभूती मिळविणे, आपल्या मागण्या न्याय्य असल्याचे पटविण्याचा प्रयत्न करणे व संपकाळात कर्मचाऱ्यांपुढे सतत काहीना काही कार्यक्रम ठेवून त्यांचे मनोधैर्य कायम ठेवण्यासाठी पुणे कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नारायण जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अतिशय कल्पक कार्यक्रम आखण्याची कमालच केली.

१८ तारखेला मध्यरात्री कर्मचारी संपावर गेले. त्या मध्यरात्री आंबेडकर पुतळ्यापासून टिळक पुतळ्यापर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

आवश्यक सेवा कर्मचाऱ्यांनी कामावर जावे असा आदेश दुसऱ्या-दिवशी सकाळी महासंघाने काढला. परंतु ससूनच्या कर्मचाऱ्यांनी कामावर जाण्यास नकार देऊन पुण्यातील संपनेत्यांची परीक्षाच पाहिली. एकत्रितपणे संपावर जाण्याचा ससून कर्मचाऱ्यांच्या पहिलाच प्रसंग. त्यामुळे कदाचित कामावर परत जाण्यास ते नाखूष असावेत; त्यात नर्सेसच्या संघटनेत दोन गट. परंतु एकदाची समजूत घालून मिरवणुकीने त्यांना ससूनमध्ये परत पाठविण्यात आले. ससूनच्या कर्मचाऱ्यांचे स्वागत करण्यासाठी डीन राजापूरकर स्वत: दारापर्यंत चालत आले. आमच्या इच्छेविरुद्ध आम्ही कामावर जात आहोत, असे ससून कर्मचाऱ्यांच्या नेत्यांनी आत जाता जाता पुन्हा स्पष्ट केले.

पहिल्या काही दिवसांतील वाटाघाटी खेळीमेळीत झाल्या. परंतु जसजसे दिवस वाढू लागले तसतसा ताण वाढू लागला. आवश्यक सेवा कर्मचाऱ्यांना पुन्हा संपावर बोलविण्याची धमकी देण्यात आली. लहान लहान मोर्चे काढणे, निरनिराळ्या अधिकाऱ्यांना निवेदने देणे, शहरातील आमदार-खासदारांना गटागटाने भेटून संप मिटविण्यासाठी वजन खर्च करण्याची विनंती करणे, ठिकठिकाणी लहान मोठ्या सभा आयोजित करणे असे उपक्रम सातत्याने हाती घेण्यात आले.

केंद्राच्या दराने महागाई भत्ता देण्यासाठी तिजोरीत पैसा नाही असा सरकारचा दावा. सरकारला मदत करण्यासाठी 'भीक मोर्चा' काढण्यात आला. लक्ष्मीरोडवरून काढण्यात आलेल्या या भीक मोर्च्यात पै–पैसा करत करत बरेच पैसे जमले. रुपयाला नकार देऊन अगदी अल्प भिक स्वीकारणारा हा अभिनव भीक मोर्चा. याला प्रतिसाद चांगला मिळाला.

कामगार एकाकी लढू शकत नाही. समाजाची सहानुभूती व मदत लागते. 'मदत-मोर्चा' काढण्यात आला. संप मोडून पडण्यास कामगारांची बिकट आर्थिक परिस्थिती कारणीभूत असते. मदत मोर्च्याने एक दिलासा मिळाला. 'सरकारी नोकर रस्त्यावर–मदत मागतो रस्त्यावर '–'मदत कशाची मूठभर गव्हाची ' अशा घोषणा देण्यात आल्या.

केंद्राच्या दराने महागाई भत्ता न मिळाल्यास केंद्र व राज्य सरकार दोन्ही जबाबदार. दोघांचाही निषेध. पण कशा प्रकारे? केंद्र व राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात कमीत कमी तफावत किती आहे. रुपये ३७ फक्त. एक दिवस ३७ संप कर्मचारी सकाळी सकाळी सेंट्रल बिल्डिंगच्या आवारातील आपल्या संघटनेच्या कार्यालयासमोर बसले. चार न्हावी बोलावून त्यांनी चक्क चकोट करून घेतले. सर्व केश-धन एकत्र करून एका पेटाऱ्यातून केंद्रीय अर्थमंत्री सी. सुब्रह्मण्यम यांना सप्रेम भेट म्हणून पाठवून दिले. दिवसात केव्हाही तिकडे फिरकले तरी एखादा चकोट दृष्टीला पडतोच.

मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेण्यास अक्षम्य दिरंगाई केलेली. त्याबद्दल तीव्र संताप. कर्मचाऱ्यांचे उसळते संतप्त रक्त बाहेर पडते. एक शर्ट त्यात भिजतो. हा रक्तरंजित 'लाल-शर्ट' मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात येतो. हा शर्ट मी स्वीकारू शकत नाही असे मुख्यमंत्री जाहीर करतात. का? 'लाल-शर्टाची' त्यांना भीती तर वाटत नसावी?

एखादे जनआंदोलन लढविताना, संप चालविताना आपल्या भावना, मागण्या व्यक्त करण्यात फारच थोड्यावेळा कल्पकता आढळते. नवनिर्माण समितीने गुजरातमध्ये आंदोलनाच्या वेळी दाखविलेल्या कल्पकतेनंतर महाराष्ट्रातील राज्य कर्मचारी आपला संप कल्पकतेने लढवीत आहेत असे मला वाटते.

संपाला सामान्य माणसाचा कितपत पाठिंबा आहे? सरकारी कर्मचारी म्हटला की सर्वसामान्य माणसाच्या कपाळाला आठी पडते. सरकारी कचेऱ्यात कोठेही गेले तरी मिळणारी तुच्छतेची वागणूक, भ्रष्टाचार व दफ्तरदिरंगाई जीव घेणारी आहे. जिल्हा परिषदेतील एखादा कर्मचारी पोस्टात गेला तरी त्याला हाच अनुभव येतो. सामान्य नागरिकाचा 'सरकारी' म्हणून ज्या ज्या गोष्टींशी संबंध येतो त्या त्या बाबतीत त्याचा अनुभव अगदी कडवट असतो. 'स्पीड-मनी' शिवाय सरकारी कचेरीतील फाईल एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर जाईल यावरचा लोकांचा विश्वासच उडाला आहे. या अकार्यक्षम सरकारी नोकरांची महागाई भत्तावाढीची मागणी असमर्थनीय असल्याची भावना सर्वत्र आढळली. या संपाची प्रत्यक्ष झळ सामान्य जनतेला न लागल्याने ही भावना फार तीव्र स्वरूपात व्यक्त झाली नाही इतकेच.

संपाला समाजाची सहानुभूती कुठंय असं विचारताच एक कर्मचारी भडकला. "हा सरकारी प्रचार झाला. आमच्याबरोबर भीक-मोर्चात आला असता तर समजले असते. आमचा मोर्चा चालला होता. फडके हौद चौकात एका ८० वर्षांच्या आजीबाईने आपली पुरचुंडी काढली व पोलिसाकडे पैसे देऊन झोळीत पैसे टाकायला सांगितले. ही सहानुभूती नाही? सहानुभूतीबरोबरच सरकारबद्दलची चीड तिने व्यक्त केली आहे." आमच संभाषण ऐकणारा दुसरा कर्मचारी पुढे झाला. 'हे तर काय बी नाय. सिटी पोस्टाजवळ एका भिकाऱ्याने आपल्याकडली भीक आमच्या झोळीत घातली. भिकाऱ्याची भिक घेणाऱ्या शासनाला लाज वाटली पायजे.'

पुण्यातील संप कुशलतेने हाताळणारे संघटनेचे अध्यक्ष नारायण जोशी म्हणाले, "आमच्या मागण्या न्याय्य आहेत. आम्ही त्या अत्यंत शांतपणे, योग्य मार्गाने मांडल्या आहेत. शासनाला अडचणीत टाकण्याचा आमचा हेतू नाही. या संपाकडे दबाव म्हणून न पाहता लोकमत म्हणून पाहिले पाहिजे."

"शासन तडजोडीला तयारच आहे, पण तुम्ही आपल्या मागण्यापासून जराही हटायला तयार नाही. तुमच्या मागण्या पूर्ण करायच्या म्हणजे रोजगार हमी योजनेसारख्या महत्त्वाच्या व विकास योजनांवर परिणाम होईल ना."

"पहिली गोष्ट म्हणजे सरकारकडे पैसा नाही ही गोष्ट आम्हाला पटत नाही.

"सर्व रिसोअर्सेस जर सरकारने टॅप केले तर सरकारला केंद्राच्या दराने महागाई भत्ता देणे अशक्य नाही. महागाईच्या वाढीचा सरकारला फायदा होत असतो. त्या पटीत सरकारचे उत्पन्न वाढते. सेल्स टॅक्सचेच उदाहरण घ्या. मग असे असताना आमच्या वेतनाला पुरेसे संरक्षण का नको? महाराष्ट्र शासनाच्या प्रशासनावरील खर्चाचे प्रमाण ७४–७५ साली २१ टक्के होते. ते ३० टक्के असायला हरकत नाही, असा प्रशासन पुनर्रचना कमिटीचा अहवाल आहे. पण सरकारची इच्छाच नाही. महागाईने त्रस्त होऊन कर्मचारी रस्त्यावर आला आहे"

'महागाई, वेतनवाढ, वेतनवाढ, महागाईवाढ या दुष्ट चक्राचा कामगारनेत्यांनी विचार करायला नको काय?'

'महागाईभत्तावाढीचा महागाईवाढीशी काही संबंध नाही, असे व्ही. के. आर. व्ही. राव यांनीच म्हटले आहे. महागाईभत्ता ही काही धर्मादाय बाब नव्हे, असा निर्णयही सुप्रीम कोर्टाने दिला आहे. महागाईभत्ता वाढला नाही तरी महागाई वाढतेच. केंद्रीय कर्मचाऱ्यांना व राज्य कर्मचाऱ्यांना एकाच महागाईला तोंड द्यावे लागते. मग वेतनात फरक का?'

'केंद्र–राज्यातील वेतनात विषमता आहेच. पण इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे काय, त्याचा तुम्ही विचार कोठे करता?'

'त्याला सरकारी धोरण कारणीभूत. राष्ट्रीय वेतन धोरण ठरवा, ही आमची मागणी धूळ खात पडली आहे. समाजातील विषमतेला सर्व अर्थव्यवस्थाच कारणीभूत आहे.'

'तुम्ही वेतनवाढ मागता, जनतेने कार्यक्षमता वाढवा अशी मागणी केली तर कोठे चुकते?'

'कार्यक्षमता वाढायला हवी हे मान्य. पण आम्ही काय करणार? कमी पगारामुळे इंटलिजंट लोक सरकारी नोकरीकडे फिरकत नाहीत. सगळा गाळा चिठ्ठ्या–चपाट्यांवर भरला जातो. प्रशासनाचे सुद्धा विकेंद्रीकरण करायला हवे. निर्णय घ्यायलाच उशीर लागतो, त्याला आम्ही कर्मचारी काय करणार? सरकारने कर्मचाऱ्यांसाठी नियमित कोचिंग क्लास सुरू केले पाहिजेत.'

एक दिवस मित्राशी गप्पा मारत उभा होतो. समोरून दुधाची गाडी गेली. ड्रायव्हर होमगार्ड होता. प्रकार काय आहे? आवश्यक सेवा कर्मचारी तर केव्हाच कामावर गेले आहेत. मग होमगार्ड का?

चौकशी केली. कामावर गेलेले कामगार काम करीत नाहीत असे आढळले. सरकारचा व कर्मचारी संघटनांचा दावा असला तरी १०० टक्के आवश्यक सेवा कर्मचारी कामावर गेलेले नाहीत. ससून, दूधपुरवठा योजना या ठिकाणी होमगार्डस् अहोरात्र राबत आहेत. 'या संपाचा आम्हाला एक फायदा झाला. दुधपुरवठा, पाणीपुरवठा व ससून आम्ही चालवू शकतो, असा आत्मविश्वास निर्माण झालाय,' असे होमगार्ड कमांडर एम. एस. कामत यांनी सांगितले.

हाफकीन इन्स्टिट्यूटची एक ब्रँच पिंपरीला आहे. तेथे तर अतिशय गंभीर परिस्थिती आहे. तेथील एकही कर्मचारी कामावर गेलेला नाही. सर्व शास्त्रीय प्रयोग व घटसर्प, धनुर्वात, सर्पदंश यावरील लस उत्पादनाचे काम पूर्णपणे थंडावले आहे. निष्काम सेवा व्रत घेतलेले होमगार्ड व काही हंगामी नोकरांच्या साहाय्याने तेथील घोडे, उंदीर व कोंबड्या वाचविण्याचे प्रयत्न चालूच आहेत.

जुळ्या मुंबईपासून रस्त्याला नाव देण्याचा प्रश्न असो, राजकारण आल्यामुळे तो लोंबकळत पडतो किंवा लवकर सुटतो. शंकरराव चव्हाणांना पेचात टाकण्यासाठी हा धूर्त डाव टाकण्यात आला आहे, असे सांगितले जाते. आम्ही मध्यमवर्गीय असल्याने आमचा जनसंघाशी संबंध जोडला जातो; पण तसे काही नाही, असे संपनेते सतत सांगत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी नेमलेल्या उपसमितीशी बोलण्यास संपनेत्यांनी नकार का दिला? मंत्रिमंडळातील एक लॉबी या प्रश्नाला ग्रामीण विरुद्ध शहरी असा रंग भरीत आहे. रोजगार हमीसारखी योजना राबवायचे सोडून या कारकुनांना पैसे का द्या, असा प्रचार चालू आहे.

या संपाबाबत फारशी सहानुभूती नाही. पण तो लोंबकळत ठेवण्याचे शासनाचे धोरणही योग्य वाटत नाही. निर्णय लवकर न घेतल्यास परिस्थिती चिघळण्याचे भय आहे. रिकामी डोकी सैतानाचे घर असते असे म्हणतात. सेंट्रल बिल्डिंगच्या आवारात आता नारंगीमोसंबीचा वास येऊ लागला आहे, याची जबाबदार घटकांनी नोंद घेतली पाहिजे.

वेतनवाढीच्या-महागाईभत्त्याच्या प्रश्नावर मलमपट्टी किती दिवस पुरणार?

राष्ट्रीय वेतन धोरण ठरविण्याची अवघड शस्त्रक्रिया करून दुखणे मुळासकट उपटून टाकण्याची वेळ आता आली आहे. □

---

राज्य कर्मचारी संप

# २

# राजकीय मागण्या घेऊन राजकीय लढे लढणे हाच खरा मार्ग

धन्वंतरी

आणि आता महाराष्ट्रातील राज्य कर्मचारी संपाच्या लढ्यात उतरत आहेत. सध्याच्या समाजव्यवस्थेच्या काळात संपलढ्यांचे हे मैदान तसे मोकळे कधीच नसते. आर्थिक अरिष्टाची तीव्रता जशी वाढत जाते तसा समाज तळागाळापासून ढवळला जाऊ लागतो. तणाव, संघर्ष पृष्ठभागावर येतात. कष्ट करणाऱ्या जनतेचे वेगवेगळे घटक यात ओढले जातात. खरे तर या लढ्याचा रोख प्रचलित समाजव्यवस्थेविरुद्ध असायला हवा. आज मात्र याचे स्वरूप मालक विरुद्ध नोकरवर्ग असे असते. नोकरवर्गाची ताकद संघटनेत असते.

भारतासारख्या मागासलेल्या देशात आज शासनसंस्था व तिची कारभारयंत्रणा वाजवीपेक्षा जास्त फुगलेली आढळते. म्हणून आज चार लाख इतकी मोठी संख्या असलेले राज्य कर्मचारी संपावर जाऊ शकतात. शासकीय कर्मचारी हा एकजीवी असा घटक नाही. यात बुद्धिजीवी व श्रमजीवी असे दोन्ही प्रकारचे लोक मोडतात. असे असले तरी त्या सर्वांचे उत्पादनातील स्थान कोणते ते लक्षात घेतले म्हणजे लक्षात येते ती गोष्ट ही की, कामगार चळवळीपेक्षा कितीतरी उशीरा म्हणजे १९६७–६८ च्या सुमारास सुरू झालेले आर्थिक अरिष्ट जसजशी आपली पकड आवळीत गेले तेव्हा, त्या-

नंतरच हा घटक संपलढ्यांमध्ये उतरू लागला.

१९६७ नंतरच्या काळातला शासकीय कर्मचाऱ्यांचा हा सहावा संप आहे. या आंदोलनाची भूमिका स्पष्ट करणाऱ्या एका पत्रकातून त्यांच्या परिस्थितीची व मागण्यांची कल्पना येते. 'निकृष्ट वेतनावर राबणाऱ्या व कर्जबाजारी जीवन जगणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतन-मूल्यात सतत होणाऱ्या भाववाढीमुळे गेल्या केवळ दहा वर्षांत क्रयशक्तीच्या संदर्भात सुमारे पन्नास टक्के घट झाली आहे. अशा विपन्नावस्थेत त्यांच्या आर्थिक मागण्या पुढे येणे अपरिहार्य आहे.' त्यांच्या मागण्या आहेत वेतनात केंद्रीय पातळीप्रमाणे पुनर्रचना, महागाईभत्त्याच्या दरात केंद्राच्या दराने वाढ, घरभाडे भत्ता, नोकरकपात बंद करण्याबाबत कारवाई, महसूल विभागाच्या रचनेचे एकसूत्रीकरण, सर्व प्रकारची दमननीती बंद होणे; या मागण्यांसाठी हे आंदोलन होते आहे. सरकारी-निमसरकारी कर्मचारी दिवसेदिवस दारिद्र्याच्या गर्तेत जात आहे व त्याच वेळी व्यापारी, उद्योगपती, धनिक जमीन-मालक या लोकसंख्येच्या केवळ दहा टक्के असलेल्या धनिकांच्या नफेबाजीत व त्यामुळे संपत्तीत गेल्या दहा वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे. ही वाढती आर्थिक विषमताच संघर्ष तीव्र करण्यास मदत करते आहे. त्यातही रोजगार हमी कर शहरी कामगार कर्मचाऱ्यांवर लादला गेला आहे. ४०० ते ५०० रुपये पगार मिळवणारा कर्मचारी ४८ रुपये कर भरतो व १८००० रुपये प्राप्ती मिळविणारा धनिक उद्योगपती पन्नासच रुपये कर भरतो. म्हणजेच शहरी उद्योगपती व ग्रामीण श्रीमंत जमीनमालकांना मात्र त्याची झळ पोचत नाही इतका त्यांच्यासाठी तो अत्यल्प आहे. या सर्व धनिक मालक वर्गांना मिळणाऱ्या सवलतीविरुद्ध उठवलेला हा आवाज ही राजकीय मागणी आहे व ती सरकारचे वर्गीय स्वरूप स्वच्छ दाखवून देते. उत्पादनाची साधने ज्या वर्गांच्या हातात असतात त्यांचे हितसंबंध जपणेच फक्त सरकारला परवडू शकते. कायदे कोणत्या वर्गांना दडपून ठेवण्यासाठी, कोणाचे हितसंबंध जपण्यासाठी केले जातात, 'सुव्यवस्था' कोणासाठी जपली जाते, याचे अधिकाधिक स्वच्छ ज्ञान शहरातील कामगार कर्मचाऱ्यांना होते आहे.

शासनयंत्रणा पूर्णपणे कोलमडून टाकण्याची ताकद या संघटनेत आहे. सरकारची दमणयंत्रणाच काय ती—पोलीस, एस्. आर. पी.—व ती मात्र अधिक कार्यक्षमरीत्या चालू राहील. याच पत्रकात म्हटल्या-प्रमाणे, 'पोलीस व न्यायखात्याशिवाय सर्व विभागांतील कर्मचारी राज्याच्या विकास योजनाच राबवीत आहेत.' याचाच अर्थ अप्रत्यक्षरीत्या उत्पादनप्रक्रियेत भाग घेणारा हा घटक आहे. 'कर्म-चाऱ्यांच्या वेतनावर होणारा खर्च हा शासनाच्या कारभार यंत्रणेवर म्हणजेच देशाच्या आर्थिक व सामाजिक व्यवस्थापनेवर होणारा खर्च आहे.' 'म्हणून कारभार यंत्रणेवरील खर्च हा उत्पादक तर आहेच, परंतु अत्यावश्यक व अपरिहार्यही आहे.' त्याच वेळी हेही दिसून येते की, दमनयंत्रणेची बाजू गेल्या काही वर्षांच्या काळात जास्त बळकट करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. (एस. आर. पीं. च्या संख्येत वाढ करून, प्रत्येक एस. आर. पीं.'च्या पगारात वाढ करून नव्हे.) शासनकर्ते शासनयंत्रणेचाच एक विभाग दुसऱ्या विभागाच्या असंतोषाला दडपण्यासाठी कसा वापरतात याचे रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संपाच्या वेळचे ताजे उदाहरण आहेच. हा या व्यव-स्थेतील अमानुष विनोद आहे. कारभार यंत्रणेवरील खर्च हा अनु-त्पादक खर्च आहे व म्हणून तो करता येणार नाही, अशी सबब पुढे करताना पोलीस व एस. आर. पी. खात्यावरचा खर्च हा 'उत्पादक बाबीवरचा खर्च' आहे की नाही याचे तर्कशुद्ध उत्तर शासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना द्यावे. खरी गोष्ट अशी आहे की, ते देता येणार नाही. आजच्या 'लोकशाहीत' तर नाहीच नाही. थोडक्यात, एकूणच शासनयंत्रणा हे राज्यकर्त्या वर्गाचे समाजावर राज्य कर-ण्याचे एक भलेमोठे व गोंडस हत्यार असते. राज्यकर्ते वर्ग सरकार, लोकशाही या मुखवटयाच्या आड दडलेले असतात.

राज्य कर्मचारी शूर तर खरेच. र. ग. कर्णिक व इतर झुंजार नेते शास्त्रीय दृष्टीने विचार करणारे आहेत. आज हे कर्मचारी एकांडे शिलेदार म्हणून लढत आहेत. यापूर्वीच्या श्रमजीवींनी एकेकटयाने लढलेले लढे, संप शासनाकडून मोडून काढले गेल्याची उदाहरणे आहेत. म्हणून शहरांतील या श्रमजीवी व बुद्धिजीवी घटकाने कष्ट-करी कामगार व इतर मध्यमवर्गीय जनतेशी नाते जोडून त्यांना आपल्या लढ्यात ओढून घेणे, आपल्या लढ्यांतून जनतेच्या मागण्या घेणे, जनतेला या दृष्टीने पुढील लढ्यांच्या तयारीला लागणे आज अत्यंत आवश्यक आहे. रेल्वे संपाच्या काळातील सरकारी प्रचार पाहा : डॉक्युमेंटरीज् दाखवल्या जात होत्या, लहान मुलांना दूध मिळत नाही, आजाऱ्यांना उपचारासाठीसुद्धा परगावी जाता येत नाही, अशी हालाची परिस्थिती रेल्वे कर्मचाऱ्यांच्या बेजबाबदार व जनताद्रोही संपामुळे सामान्य जनतेच्या वाटयाला आली आहे—जणू रेल्वे कर्मचाऱ्यांचे इतर जनतेशी शत्रुत्व होते!— पण असा खोडसाळ प्रचार संपवाल्यांना लोकांची सहानुभूती न मिळता ते अलग पडावेत, यासाठी सरकारकडून केला जात होता. पण कष्टकरी जनतेला अशा लढ्यांतून आपले मित्र व शत्रू यांची ओळख हळूहळू पटत जाते.

रेल्वे संप दडपला गेल्यानंतरच्या काळातला एवढ्या मोठ्या ताकदीचा हा पहिलाच संप. हाही दडपला गेला तरी नजीकच्या काळात होणाऱ्या कामगार कर्मचाऱ्यांच्या लढ्यांसाठी लोकांना स्फूर्ती व आत्मविश्वास देण्याचे कार्य हा लढा करणार आहे. परंतु केवळ आर्थिक मागण्यांसाठी कोणतेही संप होत राहिले तर त्यांचा दूरगामी असा काहीही परिणाम होऊ शकत नाही. संघटनेचे महत्त्व व ताकद कळते, पण राजकीय शिक्षण त्यातून झाले नाही तर आहे याच समाजव्यवस्थेची चौकट पक्की होते. म्हणून राजकीय मागण्या घेऊन राजकीय लढे लढणे हाच या दुष्टचक्रातून सुटण्याचा खरा मार्ग आहे, याची जाणीव लोकांना होणे हे महत्त्वाचे आहे. नाही तर अशा संपांना काहीही अर्थ उरणार नाही. म्हणून अशा संपाच्या यशाचे मोजमाप आर्थिक दृष्ट्या काय पदरात पडले, यापेक्षा त्यातून लढणाऱ्यांचे राजकीय ज्ञान किती वाढले व आपल्या लढ्यांना ते अर्थवादात बंदिस्त न करता पुढे नेत आहेत की नाहीत, यावरून ठरवावे लागते व याचवेळी क्रांतिकारी पक्षाची आवश्यकता भासते. असे सर्व लढे शेवटी समाजाचा वर्गीय पाया नष्ट करण्याच्या क्रांति-कारक मार्गाने जायला हवेत व यासाठी समाजाचे वर्गीय दृष्टिकोणा-तून विश्लेषण करून त्यानुसार योग्य मार्ग दाखवणारा, क्रांतीच्या ध्येयाने प्रेरित झालेला पक्ष बांधला जायला हवा. नाही तर असे सर्व लढे केवळ वावटळी ठरतील. त्यातून मूलभूत बदल होणार नाहीत व परिस्थितीत फरकही पडणार नाही.

मागासलेल्या देशांत आढळणारा, जनतेच्याच एका विभागाच्या (म्हणजे आज शहरी मध्यमवर्ग व कामगार) खिशातून पैसा काढून श्रीमंत व मध्यम शेतकरी वर्गाला शेतीच्या क्षेत्रांतील भांडवलशाही विकासाला मदत व्हावी म्हणून पुरवण्याचा प्रकार आज घडताना दिसतो आहे. अर्थात याचवेळी भूमिहीन शेतमजूर व गरीब शेत-कऱ्यांची पिळवणूक वाढते आहेच. शहरांतील गरिबांकडून खेड्यां-तील श्रीमंतांकडे व श्रीमंतांसाठी पैशांचा ओघ वळवण्याच्या या प्रकाराला शहरी व ग्रामीण विभागातील सर्व श्रम करणाऱ्यांनी संघटित होऊनच विरोध करायला हवा. यासाठी सर्व श्रमिकांची आर्थिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावणाऱ्या मध्यम वर्गाची एकजूट व्हायला हवी. ही एकजूट घडून येईल, तेव्हाच्या क्रांतिकारक लढ्यांना संपलढ्यांचे मैदान अपुरे पडेल. □ □

# रोजगार हमी योजना ‘क्रांतिकारक’ केव्हा ठरेल?

एक बी. डी. ओ.

एका गावात एक राजा होता. त्याने कित्येक वर्षे आपल्या प्रजेकडे विशेष लक्ष दिले नाही. कित्येक माणसे उपाशी रहात, आजारी पडत व रिकामपणामुळे आळशी बनत, आपसात भांडत व शेवटी राजाच्या विरुद्ध बंडाची भाषा बोलत. हे फार झाले तेव्हा राजाने गावात घरोघर फिरून सर्व परिस्थिती पाहिली. गरिबांचे हाल पाहून त्याचे हृदय भरून आले. आता काही तरी ह्या गरिबांसाठी केलेच पाहिजे असे त्याने ठरविले. त्याने आठ दिवस विचार केला, आपल्या तज्ज्ञांचा सल्ला घेतला व नवव्या दिवशी गावात दवंडी दिली. ‘ह्यापुढे गावात कोणीही उपाशी रहाणार नाही. ज्याला खायला नसेल, त्याने महाराजांना भेटावे.’ राजाचा दयाळूपणा बघून लोक खूप झाले. प्रत्येकजण राजवाड्याकडे निघाला. राजाने पटांगणात सगळ्यांना बोलाविले. प्रधानालाही पाचारण केले. लोकांना त्यांनी सांगितले की, ‘जो गरीब असेल त्याने माझ्यापुढे यावे व अडचण सांगावी.’ एक तेली पुढे आला. तो म्हणाला, ‘माझा तेलघाणा बंद आहे. कारण माझ्याजवळ बैल नाही.’ ‘तू थांब, इथे उभा रहा!’

जरा वेळाने एक सुतार पुढे आला. ‘महाराज, मला उत्तम फर्निचर बनविता येते. माझ्याजवळ चार खुर्च्या बनविलेल्या आहेत; पण त्या कोणी खरेदी करीत नाही. लोकांना विचारले तर लोक म्हणतात, खायला नाही तर तुझ्या खुर्च्या घेऊन आम्ही काय करणार?’ राजा म्हणाला, ‘तूही थांब!’

थोड्या वेळाने एक विणकर पुढे आला. ‘महाराज, मी उत्तम लुगडी विणतो, पण गेले आठ दिवस सूत घ्यायला पैसे नाहीत मुले उपाशी आहेत.’ राजा म्हणाला, ‘तूही ओळीत जाऊन उभा रहा.’

नंतर एक चवदा वर्षांचा शेतकऱ्याचा जवान मुलगा उभा राहिला. ‘राजेसाहेब, माझ्या अंगात काम करण्याची हिम्मत आहे; पण माझे बाबा म्हणतात मलाच काम नाही तर तुला मी काय काम देऊं?’ राजा म्हणाला, ‘तूही जरा थांब!’

मग पन्नास वर्षांची एक म्हातारी पुढे आली. तिने राजाच्या पायांवर डोके ठेवले. ‘महाराज, तीन दिवस मी उपाशी आहे. माझी एकुलती एक मुलगी सासरी गेली. मला कोणी पोसत नाही. मी आता काय करू?’ अशी प्रत्येकजण आपली तक्रार सांगू लागला.

राजाने सांगितले ‘कोणीही आळशी असू नये हे तुम्हाला मान्य आहे का?’ लोक म्हणाले, ‘होय.’ त्याने परत विचारले ‘उद्योग केल्यानं माणसाचे मनोरथ पूर्ण होतात हे बरोबर आहे का?’ लोक म्हणाले, ‘बरोबर आहे.’ राजाने विचारले, ‘उद्योग केल्यास म्हणजेच खूप श्रम केल्याशिवाय आयते खायला घालायचे म्हणजे गुन्हा आहे, हे तत्त्व तुम्हाला मान्य आहे का?’ लोक म्हणाले ‘अर्थातच! आयते खायला लागू, तर कितीही धान्याची कोठारे भरली तरी पुरणार नाहीत व आम्ही जास्त ऐदी बनू!’ मग राजाने विचारले, ‘मी देईन ते काम तुम्ही करायला पाहिजे.’ लोक म्हणाले, ‘का नाही करणार? आम्हाला जे काम करणे शक्य आहे ते अगदी मनोभावे करू.’

राजाने प्रजाजनांना हुकूम दिला, ‘समोरची खोली उघडा. त्यांत टिकाव, कुदळी, फावडे, घमेली व कुऱ्हाडी आहेत. प्रत्येकाने एकएक उचला. येथून चार मैलांवर एक डोंगर आहे. त्या डोंगराच्या पलीकडे एक तलाव खणायचा आहे. मात्र त्या कामावर फक्त सोळा वर्षांच्या वरच्या लोकांना काम मिळेल.’

मग त्या जवान मुलाने विचारले, ‘मग मी काय करू?’ राजाने सांगितले की, ‘तू शाळेत जा किंवा आई, बाबा त्या तलावाच्या कामावर गेल्यानंतर घरी लहान भावंडाना सांभाळत रहा!’

‘पण महाराज, माझे पोट मी कसं भरू?’

‘आमचे काम फक्त प्रौढ लोकांसाठीच आहे!’

‘मग राजेसाहेब, त्या म्हातारीने काय करावे?’

म्हातारी म्हणाली, ‘मी डोंगरावर कधी जाणार आणि किती काम करणार?’

राजा म्हणाला, ‘तुला जेवढे करता येईल तेवढे तू काम कर. जेवढे काम करशील तेवढी मजुरी मिळेल. त्या मजुरीतून जेवढे मिळेल तेवढेच खा. म्हाताऱ्यांना जास्त खायला लागत नाही.’

विणकराने व सुताराने विचारले, ‘महाराज, मला दगड फोडायची, माती खणायची माहिती नाही.’

महाराज म्हणाले, ‘कष्टाची, श्रमाची सवय झालीच पाहिजे. सहकुटुंब तिथे जाऊन काम केलेच पाहिजे!’

त्यांनी विचारले, ‘आमची लहान मुले शाळेत आहेत. त्यांच्या शिक्षणाचे तिथे काय होणार?’

राजा म्हणाला, ‘अडचणी सांगू नका. काम हवे असेल तर अडचणींवर मात करायला शिकले पाहिजे.’

एकाने विचारले, ‘महाराज, आम्ही तिथे राहायचे कोठे? खायचे काय? पाणी कुठले प्यायचे?’

राजा म्हणाला, ‘ती सर्व व्यवस्था शासनातर्फे करण्यात येईल.’

एकाने विचारले, ‘दयाळू महाराज, माझी बायको व मी तिकडे राहायला गेलो तर माझ्याकडे एक गाय व वासरू आहे, त्यांना कोण सांभाळणार?’

राजा म्हणाला, ‘ते तुमचे तुम्ही ठरवा. तुम्हाला काम हवे असेल, भाकरी हवी असेल तर तिथेच गेले पाहिजे!’

म्हातारी माणसे कामावर जाऊ शकली नाहीत. सुतार, शिंपी, तेली, बुरूड, विणकर ह्यांनी कधी आयुष्यात असली कामे केली नाहीत म्हणून ते कामावर गेले नाहीत. पंधरा वर्षांची मुले व मुली ह्यांना कामावर घेतले जाणार नाही, म्हणून तीही जाऊ शकली नाहीत. उरले फक्त पन्नास तरुण स्त्री–पुरुष.

राजा म्हणाला, 'मग ह्या गावात फक्त एवढीच गरजू माणसे आहेत ?'

बाकीचे लोक म्हणाले, 'आम्हाला योग्य असे काम नाही. मग आम्ही कसे येणार ?'

राजा म्हणाला, 'तुमचे हित तुम्हाला कळते का मला ?'

'चला जा तुम्ही घरी. पुन्हा तक्रार करू नका ! राजा तुमच्या करता यापेक्षा अधिक काही करू शकत नाही !'

एका शहाण्याने तरी धिटाईने विचारले, 'महाराज, तिथें तलाव खणून ह्या गावाला उपयोग काय ?'

राजाने रागाने उत्तर दिले, 'हे तुम्ही कोण विचारणार ? मी पैसे खर्च करणार. माझ्या तज्ज्ञाने सांगितले तिथे मी तलाव खोदणार. तुम्हाला काम मिळाल्याशी कारण !'

असा हा दयाळू राजा म्हणजे महाराष्ट्र सरकार व त्याची पुजारी म्हणजे महाराष्ट्राची ग्रामीण जनता. त्या राजाची गरिबांना भाकरी देण्याची ही योजना म्हणजेच रोजगार हमी योजना. योजना अशी आहे –

ज्या लोकांना कामाची जरुरी आहे, त्यांनी आपली नावे ग्रामपंचायतीकडे नोंदविली असतील तर लोकांसाठी काम ताबडतोब सुरू करण्यात येईल, असा सरकारी आदेश आहे. हे काम देण्याची जबाबदारी तालुक्याचे तहसीलदार व जिल्हाधिकारी यांचे आहे. ह्या कामाची अंमलबजावणी पंचायतीने करायची आहे. जर पन्नास लोक जमले नाहीत तर काम सुरू होणार नाही. त्याला अपवाद डोंगराळ भागाचा. डोंगराळ भागात सुरुवातीस कमी लोक असले तरी चालतील; पण थोड्या दिवसांत तरी निदान पन्नास लोक जमले पाहिजेत. मात्र जे काम सुरू करायचे ते काम जर रस्त्याचे असेल तर त्या कामास मंजुरी देण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नाही, तर तो शासनाला आहे म्हणजे त्या कामाची मंजुरी मुंबईहून येईपर्यंत ते काम सुरू होणार नाही. पुष्कळशा पंचायतसमित्या रस्त्याच्या कामाच्या मागण्या करतात. कारण उत्पादन स्वरूपाची म्हणजे पाझरतलाव, जमीनदुरुस्ती, जंगलसंवर्धन, बंधारे बांधणे, तळी खोदणे वगैरे कामे रस्त्यापेक्षा थोडी जास्त तांत्रिक व कुठेही करता येण्यासारखी नाहीत. मात्र ही कामे सरकारकडून किती पैसे येणार त्यावर अवलंबून आहेत. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, ग्रॅन्ड्स बंद झाल्या को कामे एकाएकी बंद केली जातात. गेली दोन–तीन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळी कामे म्हणून सुरू झालेली कामे अपूर्ण आहेत. ती अपुरी का राहिली आहेत ? तर लोकांना रोजगार नको होता म्हणून नव्हे, तर सरकारजवळ पैसा नव्हता म्हणून व ही कामे घेण्यामध्ये बरोबर नियोजन नव्हते. तर फारशी जरूर नसलेल्या ठिकाणीही निव्वळ लोकांना खूष करण्याकरिता कामे घेण्यात आली. ज्या गावातील शेतकऱ्यांजवळ गाडीही नाही, तिथे रस्ते आखण्यात आले. कारण एस. टी. कधी तरी जावी म्हणून. असा कोकणातील अनुभव आहे. मूलभूत प्रश्न आहे, लोकांना कोणत्या स्वरूपाचे काम द्यावे हा! ह्या आपल्या देशात १९६१ ते ७१ ह्या दहा वर्षांत सरासरी लोकसंख्या २४ टक्क्यांनी वाढली. ह्याचा अर्थ खेड्यात उद्योग नसल्यामुळे लोकांचा लोंढा शहराकडे जाऊ लागला व शहराकडे जाणाऱ्यांचा ओघ वाढत आहे. त्याला ही तथाकथित 'क्रांतिकारक योजना' थांबविणार आहे का ? ह्या रोजगार योजनेत वर सांगितल्याप्रमाणे ज्यांना स्वतःची शेतजमीन अगदी थोडी आहे, ज्यांच्या जमिनीला पाण्याची व्यवस्था नाही व जे शेतमजूर आहेत, त्या सर्वांना काम देण्याची सोय केली आहे. ह्या कामावर काम करणाऱ्या लोकांसाठी शासनाच्या खर्चाने छोट्या झोपड्या उभाराव्यात, पाणी पिण्याकरिता सोय व्हावी, रेशन मिळण्याची व्यवस्था व्हावी, औषधोपचाराची सोय व्हावी असा सरकारी आदेश आहे.

प्रत्यक्षात अशी सोय फारच क्वचित ठिकाणी झालेली आहे. तेव्हा लोक नाइलाज म्हणून दुःखित अंतःकरणाने कष्ट करतात. घरी मुले–बाळे, गुरे–ढोरे ठेवतात. कारण कित्येक वेळा अशी कामे कुठे तरी त्यांच्या घरापासून दूर अंतरावर असतात. खडी फोडणे, खड्डे खोदणे ह्यांसारखी कामे नेहमी करायची सवय नसल्यामुळे तीन रुपये रोज (जो जास्तीत जास्त दिला जावा अशी योजनेत तरतूद आहे) मिळत नाही. ही तीन रुपये मजुरी फक्त एकूण मजुरांच्या पंचवीस ते तीस टक्के लोकांना मिळते. ओव्हरसिअर, डेप्युटी इंजिनियर खोटी मापे लिहितील (तशी काही वेळा लिहावी लागतात.) तर इतरांनाही तीन रुपये मिळू शकतात. ही इतक्या श्रमाची व कष्टाची कामे करणाऱ्या लोकांना खायला काय तर बिनदुधाचा चहा व दोन वेळा रेशन मिळाल्यास त्या प्रमाणात चटणीभाकरी, एखाद्या दिवशी उसळ. कारण भाजीपाला हा या लोकांकरिता नसतोच. अशा कामाच्या ठिकाणी त्यांना भाजी कोण देणार व ते ती कधी तयार करणार ? इतकेही करून ही कामे देण्यात काही सूत्रबद्ध कार्यक्रम कागदावर असला तरी प्रत्यक्षात काही आहे का ? पाचशे लोकांनी एक पाझर तलाव खोदून पूर्ण केला की दुसऱ्या दिवसापासून पुढचे काम लगेच सुरू होईल, अशी खात्री नाही. कधी पुढच्या कामाला तांत्रिक मंजुरी नाही, कधी कामाची आखणी करायला ओव्हरसिअर येणार नाहीत व कधी पैसाच नाही. मग काम बंद ! असे प्रकार नेहमीचे आहेत.

दुसरा एक मुद्दा. ग्रामीण भागातही मराठी सातवी पास झालेले, एवढेच नव्हे तर नववी–दहावी शिकलेले, काही एस. एस. सी. पास झालेले तरुण मुलगे रोजगार मागतात. तेव्हा त्यांना कोणता रोजगार द्यावा ? ही मुले टिकाव–फावडे घेऊन अशीच डोंगरात जाऊन माती खोदणे व खडी फोडण्याची कामे करू लागली म्हणजे निराश होतात. इतके शिकूनही शेवटी खडी फोडणे व माती खोदणे हेच आपल्या नशिबी, असे व्यथित मनाने म्हणतात. दुसरी काही उत्पादक कामे त्यांना देता येण्यासारखी नाहीत का ? नसल्यास का नाहीत ? ह्याचा जाब सरकारला ह्या तरुणांनी विचारला पाहिजे. खडी फोडणे व माती खोदणे ह्याखेरीज इतर काही योजना खेड्यात करता येण्यासारख्या नाहीत का ? या रोजगार हमी योजनेबाबत असे स्पष्ट

सांगितले गेले आहे की इतर कुठलाही उद्योग ज्यांना नाही, त्यांच्याकरिता ही रोजगार हमी योजना आहे. इतर कुठलाही उद्योग निर्माण करायचा नाही किंवा तसा उद्योग करता येईल, अशी साधने उत्पन्न करायची नाहीत व मग म्हणायचे, ही तरी रोजगारी आम्ही देतोय की नाही ? अशी आत्मप्रौढी मिरवायची व मग म्हणायचे, ' आमची ही क्रांतिकारक योजना आहे. कोणीही काम मागेल त्याला आम्ही काम देतो. फक्त हे काम त्या दयाळू राजाप्रमाणे 'आम्ही देऊ ते काम देऊ त्या ठिकाणी व आम्ही सांगू त्या माणसांना, ' अशी ही योजना आहे.

ह्यात कसली क्रांती आहे, हे एक परमेश्वर जाणो की महाराष्ट्र सरकार जाणो. टांचा घासून मरण्यापेक्षा काही तरी कुठे तरी पाटचा टाकायच्या, दोन कोरडे घास मिळतील ते उन्हात बसून पोटात कोंबायचे. आठ तास कष्टाचे काम करून प्रामाणिकपणे दीड-दोन रुपये हा खेडेगावचा शेतकरी व शेतमजूर कमावतो. परंतु त्याच वेळी सावलीत सात तास काम करणारा गिरणीतील किंवा कारखान्यातील मजूर दररोज सरासरी पंधरा रुपये कमावतो हे तो पाहात असतो. शहरातील मजुराइतकी मजुरी पाहिजे असे तो म्हणणार नाही, पण निदान आजच्या महागाईच्या काळात निदान स्वतःचे व मुलावाळांचे वस्त्र व पोटभर अन्न मिळेल इतकी तरी अपेक्षा त्याने का करू नये ?

ह्या छोट्या शेतकऱ्याला किंवा शेतमजुराला शेतीचा हंगाम नसेल तेव्हा इतर दुसरा कुठलाही उद्योग देता येणार नाही का की ज्यामुळे तो स्वतःच्या घरी किंवा स्वतःच्या गावात आठ तास काम करून पोट भरू शकेल ? असे करता येणे शक्यच नाही का ? शेतीहंगामात खडी फोडण किंवा माती खोदणे एवढाच कार्यक्रम सरकारजवळ असेल तर हा दुष्काळी कार्यक्रम झाला. तो रोजगार हमीचा ' क्रांतिकारक ' कार्यक्रम मुळीच नाही. त्यात रोजगाराची हमी नाही व पोट भरण्याचीही हमी नाही. त्यात कसलीच शाश्वती नाही. ही गरीब जनतेची शुद्ध फसवणूक आहे. बागाईतदार व मोठ्या शेतकऱ्यांच्या (द्राक्षे, ऊस, कापूस पिकविणाऱ्यांच्या) हिताला कुठेही धक्का लागणार नाही व लोकांना गप्प बसविण्याकरिता गरिबांच्या तोंडावर फेकलेली ही युक्ती आहे. तुरुंगातल्या कैद्याला मिळते त्यापेक्षा जास्त काही विशेष ह्या काम करणाऱ्यांना मिळत नाही. गरीब म्हणून जन्माला येणे हा त्याचा गुन्हा आहे व इतके कष्ट करून होणाऱ्या शेकडा ८० टक्के तलावात उन्हाळ्यात पाणी रहात नाही. मात्र योजनांमधून तयार होणाऱ्या रस्त्यांवरून गरिबांजवळ बैलगाड्या नसल्यामुळे ती बैलगाडी जाणार नसली तरी त्यावरून पायी जाण्याचे समाधान त्या गरिबाला मिळेल– (अर्थात हे रस्ते टिकले तर) किती वर्षे हे खडी फोडण्याचे व माती खोदण्याचे काम ह्या लोकांनी करायचे व अर्धपोटी रहायचे असा प्रश्न स्वतःला विचारीत व कपाळाला हात लावीत गरीब काम करतो. ह्या योजनेत क्रांती कसलीही नाही.

पन्नास कोटी रुपये खर्च करूनही सतत वर्षातून २०० दिवस काम देण्याचे ठरविले तर महाराष्ट्र सरकार राज्यातील एकूण ५३ लाख शेतमजुरांपैकी ८ लाख लोकांना काम देईल. तेही या वर्षापुरते. इतरांचे काय ?

हा कार्यक्रम मर्यादित स्वरूपातील दुष्काळी योजना असून त्याचे नाव फक्त रोजगार हमी योजना असे आहे.

हा कार्यक्रम मर्यादित स्वरूपात का होईना लोकांना रोजगार देण्याच्या उपयोगी होण्याच्या दृष्टीने खालील सुधारणा होणे अत्यंत जरूर आहे.

१. ही कामे मजुरांना अंगावर देण्याची पद्धत ही चुकीची पद्धत आहे. त्यामुळे खोटी मापे लिहिण्याची पद्धत सुरू होते. हजेरीवर प्रौढाचे नाव लिहिले जाते. प्रत्यक्षात बऱ्याच ठिकाणी मुले मुली कामे करतात. त्याऐवजी रोज– पगारावर लोकांना काम दिले जावे.

२. कामाच्या जागेवर रेशनची सोय नसते. चहापाण्याची किंवा जेवणाची कसलीच सोय नसते. मग हे लोक काहीही खातात व पितात. त्यामुळे प्रकृती ढासळते. अनेकांचे डोळे उन्हात बसून खडी फोडून बिघडले आहेत.

३. औषधीय किंवा वैद्यकीय मदत कुठेही वेळेवर नसते. मोफत औषधकेंद्र तर नसतेच.

४. अंगावर मुलांना पाजणाऱ्या मातांची तर भयंकरच गैरसोय होते. मुलांना कुठे तरी ठेवावे लागते. त्यांच्याकरिता फिरते वर्कशेड असावे. त्या मुलांकरिता तरी निदान पौष्टिक आहार दिला जावा. सुखडीयोजना सुरू झालेली बंद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी दुसरी योजना सुरू करावी.

५. आठवड्यातून एक दिवस पगारी सुट्टी असावी.

६. धान्याच्या रूपाने अर्धी मजुरी दिली जावी.

७. एक काम संपण्यापूर्वी निदान सात दिवस तरी पुढील कामाची योजना तयार असावी.

ह्यापैकी काही सुधारणा करण्याची तरतूद आजच्या सरकारी आदेशातही आहे. पण प्रत्यक्ष त्या कोणीही अंमलात आणीत नाही. त्या अंमलात येणार नसतील तर गरीब लोकांना दुष्काळी स्वरूपाचे काम म्हणून का होईना देण्याबाबतची फसवणूक चालू आहे असे कोणीही म्हणेल.

निदान हा दुष्काळी ' डोल ' सरकारी संपूर्ण आदेशाप्रमाणे तरी मिळावा अशी अपेक्षा आहे. खऱ्या अर्थाने लोकांना ' रोजगार हमी ' कशी देता येईल व ग्रामीण जनतेचा मोठ्या शहराकडे जाणारा लोंढा कसा थांबविता येईल त्याबाबत मूलभूत विचार होणे जरूर आहे.

□ □


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# सोलकढी

## □ विजया मेहता दोन आहेत


‘मुंबई मराठी साहित्य संघ’ या जीर्ण-जाणत्या संस्थेला मुंबईच्या सांस्कृतिक जीवनात मोलाचे स्थान आहे. अनेकांगी कार्यासाठी म्हणून जरी संघ बद्धपरिकर झाला असला तरी लोक असे कोंज्या दृष्टीचे आहेत की, ते संघाचे नाटकी कार्य तेवढे ओळखतात. ते मात्र चांगले लांब, रुंद आणि खोलसुद्धा आहे. डॉ. अमृत भालेरावांच्या काळात संघामुळे मराठी रंगभूमी आजारमुक्त झाली, हा इतिहास आहे. ‘तुझे आहे तुजपाशी’ आणि ‘होनाजी बाळा’ या संघाच्या नाटकांनी नव्या काळात बऱ्यापैकी चैतन्य उत्पन्न केले. नंतर संघाने एक जरा दीर्घ डुलकी काढली. मग ‘पति गेले ग काठेवाडी’ आणि ‘घेतलं शिंगावर’ ही नाटके. त्यांचे शंभरावर प्रयोग झाले. डोळ्यांवर पुन्हा झापड आली. ती विजया मेहतांनी थोडी उडवली. त्यांनी दिग्दर्शिलेले ‘अजब न्याय वर्तुळाचा’ हे नाटक येथे चालले, पूर्व जर्मनीत चालले; शंभर प्रयोग होण्याइतके चालले.

विजया मेहता या नावामुळे वाचकांचा घोटाळा होईल म्हणून मुद्दाम सांगतो की विजया मेहता दोन आहेत. ‘रंगायन’च्या एक विजया मेहता होत्या. मुंबईतली नवी मराठी रंगभूमी त्यांनी उभी केली असे पुराव्यानिशी शाबित करता येते, असे म्हणतात. ज्या गंगाधर गाडगीळांचे ‘ज्योत्स्ना आणि ज्योती’ हे नाटक विजया मेहतांनी ‘रंगायन’ काळात केले नाही त्या गंगाधर गाडगीळांनासुद्धा विजया मेहतांबद्दल ईषत् आदर असावा की काय असा अस्फुट संशय उत्पन्न होऊ शकेल, असे मानण्याजोगी परिस्थिती नसेलच असे ठामपणे म्हणता येणे तसे काहींसे अवघड जावे, अशी समजूत काही लोकांच्या अंतर्मनाला कधीकधी हलकेच चाटून जाते, असे दिसते. यावरून विजया मेहतांची योग्यता निश्चितच फार मोठी असली पाहिजे, ही गोष्ट निर्णायक रीतीने सिद्ध होते. ‘रंगायन’काळात विजयाबाईंनी परक्या मातीतली नाटके केली; आणि मुंबईच्या कोवळ्या नाटकुल्यांनी ती माती अधाशीपणाने खाल्ली. सध्या मराठी रंगभूमीवर वावरणाऱ्या विजया मेहता एक वेगळ्याच विजया मेहता आहेत. त्यांना आपल्या मातीतल्या रंगभूमीचा एकच ध्यास लागला आहे. ‘मला उत्तर हवंय’, ‘एका घरात होती’, ‘माता द्रौपदी’, ‘संध्याछाया’, ‘नल-दमयंती’, ‘अखेरचा सवाल’, अशा मातिवंत नाटकात त्यांनी भूमिका केल्या अथवा त्यांचे दिग्दर्शन केले.

‘मुंबई मराठी साहित्य संघा’तर्फे वाजत-गाजत आलेल्या ‘अजब न्याय वर्तुळाचा’ या नाटकाने अलीकडे या दुसऱ्या विजयाबाईंचे नाव मराठी रंगभूमीवर दुमदुमत ठेवले. ‘अजब न्याय वर्तुळाचा’ हे बर्टोल्ड ब्रेख्त (किंवा ब्रेश्च्त) जर्मन नाटककाराच्या ‘कॉकेशियन चॉक सर्कल’ या नाटकावरून बेतलेले. म्हणजे परक्या मातीतलेच. दुसऱ्या विजयाबाईंना तर परक्या मातीची ॲलर्जी. तेव्हा त्यांनी पूर्व जर्मनीतले ते नाटचरोपटे इथे आणताना त्याच्या मुळांना लागलेला जर्मन मातीचा कणन्‌कण झटकून टाकला आणि इथल्या अस्सल मराठमोळ्या मातीत ते असे रुजवले की कोणालाही ते मातिवंत मराठी नाटचरोपटेच वाटावे. त्यासाठी त्यांनी चिं. त्र्यं. (किंवा चिम्‌त्र्यम्) खानोलकरांचे साहाय्य घेतले. खानोलकरांना (पूर्व) जर्मन येत असावे. शिवाय नुकताच त्यांनी कोकणातल्या विविध नाटचरूपांचा, भाभा शिष्य-वृत्तीने, अभ्यास केला होता. नाटक परक्या मातीतले थोडेसुद्धा राहू नये म्हणून खुद्द ब्रेख्तचे सहकारी बेनेविट्झ यांना सह-दिग्दर्शक व्हावे लागले. संगीत–दिग्दर्शन होते ‘घाशीराम कोतवाल’फेम भास्कर चंदावरकरांचे.

एवढे सगळे केले त्याचे सार्थक झाले. कारण नाटक पूर्वजर्मनीत तर चाललेच पण इथे देखील चालले. इथे ते नाटक पाहणाऱ्यांपैकी ज्यांनी ‘घाशीराम कोतवाल’ आधी पाहिले होते त्यांना ‘अजब न्याय वर्तुळाचा’-मध्ये नाटचशैलीच्या दृष्टीने लक्षणीय वेगळेपण काहीच आढळले नाही; ‘घाशीराम कोतवाल’ ज्यांनी पाहिले नव्हते त्यांना मात्र, जाहिरात केल्याप्रमाणे ‘अजब न्याय वर्तुळाचा’-मध्ये थोडेसे वेगळेपण आढळले. एकूण, विजया मेहतांची आणि ‘साहित्य संघा’ची आकांक्षा होती तसे मराठी प्रेक्षकांनी या नाटकाचे उकळते स्वागत केले नाही. ते केले पूर्व–जर्मन प्रेक्षकांनी. पूर्व–जर्मन प्रेक्षक मराठीहून अधिक मराठी आहेत. नाटकातल्या अनेक खुबीदार जागा मराठी प्रेक्षकांना कळल्या नव्हत्या; पूर्व–जर्मन प्रेक्षकांनी मात्र त्या नेमक्या ओळखल्या. बर्टोल्ड ब्रेख्त आणि त्याचे ‘कॉकेशियन चॉक सर्कल’ पूर्व-जर्मनांना स्वतंत्रपणे सगळेच्या सगळे कळले नव्हते; चिंतोल्ड खानोलकर आणि ‘अजब न्याय वर्तुळाचा’ यामुळे आता त्यांना ते सगळेच्या सगळे कळले आहे. त्यामुळे चित्र्यंखा, विजया मेहता, ‘मुंबई मराठी साहित्य संघ’ यांना आपापले नाटककार समजावून देण्यासाठी, देशोदेशींच्या सुपाऱ्या आल्या आहेत. सध्या संघातली माणसे त्या सुपाऱ्या तोंडात ठेवूनच बोलतात.

आपल्या मायमराठी रंगभूमीला चांगले दिवस कधी येतील, याची घोर चिंता तुम्हा-

आम्हा सर्वांना सदासर्वकाळ लागलेली असते. मला वाटते, विजया मेहतांची दोन होण्याची किमयागारी जर जापल्या नट, सूत्रधार, निर्मितिसंकल्पकादी रंगभूमीच्या निष्ठावंत पाईकपाइकिणींना साधली तर मायमराठी रंगभूमीला चांगले दिवस लौकरच येऊन तुम्हाआम्हा सर्वांना चिंता करायचे कारणच उरणार नाही. तेव्हा नटराजाजवळ समस्त मराठी आणि अमराठी प्रेक्षकांच्या वतीने मी 'अनंतराव' अशी प्रप्रार्थना करतो : हे नटराजा, तू आम्हाला दोन कानेटकर, दोन तेंडुलकर, दोन कोल्हटकर, दोन आळेकर, दोन दारव्हेकर, दोन अमोल पालेकर, दोन जब्बार पटेल, दोन दत्ता भट, दोन पद्मा चव्हाण ( अरे बापरे, अरे बापरे ), दोन प्रभाकर पणशीकर, दोन मोहन वाघ, दोन विद्याधर गोखले, दोन भालबा केळकर, दोन माधव मनोहर, दोन पुष्पा भावे, दोन सेन्सॉर-बोर्डे, दोन नाटच परिषदा दे ! दे !

मराठी रंगभूमी हे एक वेगळे जग आहे. एकाचे दोन झाल्याशिवाय ते चालणार नाही. ◻

## ◻ एकजिनसी जिभा

माझा जसा उदार आहे तशी माझी जीभसुद्धा उदार आहे. उत्तम केलेल्या कोणत्याही प्रकारापद्धतीच्या खाद्यपदार्थांना योग्य, उचित आणि स्वाभाविक न्याय देण्यात ती कशी अगदी तत्पर आहे. तिला नावडते काही नाही. तिला सगळेच आवडते. सगळे आवडणाऱ्या काही जिभा बिचाऱ्या बोथट आणि ठिसूळ होतात. माझी जीभ तशी झालेली नाही : तिची धार आणि तिचे टोक, दोन्ही तीक्ष्ण आहेत. माझ्या सर्वजिनसी जिभेला एकजिनसी जिभांची दया येते. काही जिभांना फक्त घरचाच आहार लागतो; काही जिभांना बाहेरचाच आहार मानवतो; काही जिभांना मीठ, काही जिभांना तिखट, काहींना आंबट, काहींना कडू, तर काहींना गोड वर्ज्य असते; काही जिभांना तेचतेच सारखे तेच खायला हवे असते; काही जिभांना दुसऱ्यांना जे आवडते तेच आवडवून घ्यायचे उच्च शिक्षण मिळालेले असते; काही जिभांचे मांसाहाराशिवाय चालत नाही; काही जिभांना शाकाहारच चालतो.

अमेरिकेत सध्या जिभेला शाकाहाराचे वळण लावायचे खूळ बोकाळले आहे. शाकाहाराने दिव्यत्वाची प्रचीती वगैरे येते असे त्यांना वाटते की काय, कुणास ठाऊक. व्हिएतनामी युद्धात पडल्यामुळे भूतदयेची भावनासुद्धा कदाचित अचानक उत्कट आणि क्रियाप्रवण झाली असेल. अमेरिकेच्या राष्ट्रीय संशोधन आयोगाने या खुळाचे संशोधन केले, आणि शाकाहार समतोल नाही, त्यामुळे प्रकृतीची हेळसांड होते, अशी धोक्याची सूचना खुळावलेल्या शाकाहारीशुंभांना केली.

तिचा फार उपयोग होईल असे मला वाटत नाही. बोलूनचालूनखाऊन खूळच ते; ते असल्या सूचनासमजावणी मानत नाही. उसळले तसेच ते ओसरूनही जाईल; किंवा दुर्दैववशात आपला करडा अंमल ते जिभाजिभांवर बसवेल.

असे एखादे वळण मुद्दाम घेतलेल्या जिभा मोठ्या असहिष्णू होतात. दुसरे वळण त्यांना खपत नाही. अशा जिभांची असहिष्णुता जिभेपुरतीच मर्यादित राहात नाही. ती खाणाऱ्याच्या वृत्तीतसुद्धा भिनते; इतकेच नव्हे तर खाणारा, खाणारा न राहता खाद्यपदार्थ होऊन जातो.

—अनंतराव






# पॅपिलॉन

मूळ लेखक : हेन्री शॅरियर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

आधीच एकांतवास, त्यात भर म्हणून उपासमार सुरू झाली. एक-एक दिवस कंठताना प्राण कंठाशी येत होते. आता जास्त हालचाल करून भागणार नव्हतं. जास्तीत जास्त वेळ पडून आणि स्वस्थ बसून काढणं आवश्यक होतं. स्वप्नरंजन तर कायम चालू होतं. शिक्षा संपायला एक महिना बाकी असताना गुप्तपणे मित्रांची चिट्ठी मिळाली. पॅपिलॉननं त्याला उत्तरही पाठवलं. त्यामुळं राहिलेले दिवस मनोधैर्य कसंबसं टिकलं. अखेर तो दिवस उगवला. कोठडीचं दार उघडलं आणि त्याचं अंधारातून उजेडात पुन्हा आगमन झालं. 'सेंट जोसेफ'ला रामराम ठोकण्यापूर्वी कॅम्पवरील मित्रांनी तिघांची खूप सरबराई केली. जोन्स तर मरणोन्मुख झाला होता. त्याला उपचाराची नितांत गरज होती. रॉयेल बेटावर आल्यावर एका मोठ्या हॉलमध्ये पॅपिलॉन इतर जुन्या मित्रांच्यात येऊन मिसळला. त्यापूर्वी जोन्स सर्वांना सोडून निघून गेला होता. . . . . . . . . . . . . . . . . . . . . .


## प्रकरण सतरा : नवे जीवन

एकशे वीसजण राहात असलेल्या त्या मोठ्या चौकोनी हॉलमधे मी प्रवेश केला. भिंतीच्या कडांना लोखंडी बार ठोकलेले होते. त्याला लागून कॅनव्हसचे बिछाने होते. मधोमध दहा फूट मोकळी जागा. प्रत्येकी दोन-दोन कपाटं. त्यात सर्व चीजवस्तू ठेवायच्या. या इथेही दोन ते दहा जणांचे निरनिराळे गट पडले होते.

मी आत शिरतो न शिरतो तोच कित्येक कैदी घाईघाईनं माझ्या-भोवती गोळा झाले. 'पपी, इकडे ये.' 'नको, आमच्याजवळ ये.' इतक्यात ग्रँडेटनं माझी पिशवी उचलली. 'तो आमच्या गटात सामील झालेला आहे.' मी त्याच्या मागोमाग जाऊन माझी जागा पकडली. हॉलमधील खूप चेहेरे ओळखीचे होते. मला एकदम नवल वाटलं. मी सगळ्यांना विचारलं, 'पण या दिवसाचे वेळी तुम्ही सगळे मोकळे कसे ? कामावर गेला नाहीत ?' सर्व मंडळी मनापासून हसली. 'इथल्या व्यक्तींना रोज फार तर एक तास काम करावं लागतं-ध्यानात घे. ते उरकलं की आम्ही परत इथे येतो.' स्वागत तर चांगलं झालं होतं. अखेरपर्यंत असेच संबंध राहतील अशी मी आशा केली. मात्र एक गोष्ट मी मनोमन जाणून होतो की, इथे सामुदायिक जगात वावरताना खूप नव्या गोष्टी शिकाव्या लागणार होत्या.

ग्रँडेटनं मला जाणीव करून दिली की, 'इथे जवळ पैसे नसतील तर कुत्र्यासारखं मरावं लागेल-पावलोपावली पैसे लागतात. सतत पैसा मिळण्याचा एकच मार्ग आहे-कोणत्या ना कोणत्या रॅकेटमध्ये सामील होणं.'

रॅकेट हा प्रत्येक कैद्याला पैसा उपलब्ध करून देणारा मार्ग होता. आमची इमारत-खास विभाग, ए ब्लॉक-याबाबत फार महत्त्वाची मानली जाई. मांसाहारी खाद्यपदार्थ, ब्रेड, औषधे, ताज्या भाज्या, फळे, लोणी, दूध, चीज, दारू, सिगारेट्स आणि मासे यातील एकेका वस्तूच्या विक्रीचे सर्वाधिकार एकेका रॅकेटकडे असत. परंतु सर्वांत किफायतशीर उलाढाल होणारा व्यवसाय होता जुगार. एका ब्लॉक-



मध्ये तीन ते चार अड्डे असत. प्रत्येकात एकजण बँकर म्हणून काम पाही. त्याला जिंकलेल्या एकूण पैशांपैकी पाच टक्के रक्कम मिळे. रात्री खेळ सुरू होण्यापूर्वी कोणी तरी उभा राही आणि म्हणे,

'आज मी बँकर होणार.'

'चालणार नाही.' बाकीचे ओरडत.

'सगळ्यांचं म्हणणं तसं आहे?'

'होय.'

'तर मग मी अमुक-अमुक याला पुकारतो.'

ज्याचं नाव उच्चारलं गेलं असेल त्याला पुढे काय करायचं हे बरोबर माहीत असे. तो चाकू उघडून हॉलच्या मध्यभागी जाऊन उभा राही. तिथे दोघांची चाकूनं मारामारी होई. त्यात जो जिंकेल त्यानं टेबलचा ताबा घ्यायचा असा तिथला नियम होता. यावरून जुगारी रॅकेट किती भयानक असेल याची कल्पना करा.

खेळ चालू असताना सिगारेट्स, चॉकलेट किंवा केक्सची विक्री होई. प्रत्येकानं योग्य पैसे देऊन त्या वस्तू विकत घ्यायच्या. हॉलमध्ये एक-दोनजण कॉफी विकत असत. सर्व रात्रभर ती गरम ठेवण्याची व्यवस्था असे. त्यासाठी छोट्या शेगड्या होत्या. जुगारात मिळणाऱ्या पैशामुळे खाण्यापिण्याची चंगळ असे.

कैद्यांमध्ये कित्येक कलाकारही होते. धातुकाम, लाकडी वस्तू बनवणे किंवा खेळणी तयार करण्यात ते तरबेज होते. काही रंगारी सुद्धा होते. वॉर्डर लोकांच्या घरी लागणाऱ्या वस्तू असे कलाकार करून देत-अर्थात योग्य ती किंमत घेऊनच. मागणीनुसार आगाऊ पैसे घेऊनही व्यवहार होई. अधूनमधून आमच्या बेटाला लागणाऱ्या इतर जहाजांवरही तयार वस्तूंची विक्री होई.

हा अव्याहत चालू असलेला रॅकेट-व्यवसाय म्हणजेच पैशांची प्रचंड आवक. परंतु पहारेकऱ्यांचेही हितसंबंध त्यात गुंतले असल्यामुळे त्यात खंड पडत नव्हता. आपापल्या योजनांमध्ये सर्वजण दंग असत. अशा प्रकारे रॉयेलवर 'जिवंतपणा' नांदत होता.

बहुतांशी कैदी 'होमो' होते. त्याला जवळ जवळ मान्यता मिळाल्यासारखीच होती. गव्हर्नरपासून सर्वांना अशा ठरलेल्या जोड्या माहीत होत्या. जोडीतल्या एकाला काही कारणामुळे दुसऱ्या बेटावर रवाना केलं तर थोड्याच अवधीत दुसऱ्यालाही तिकडे पाठवलं जाई.

पळून जाण्याचा विचार करणारे शंभरात फार तर तिघं होते.

पृष्ठ २२ वर

# माणूस

अधिक स्वावलंबी, अधिक विविधतापूर्ण करण्यासाठी
वाढीच्या, विस्ताराच्या अनेकविध योजना कार्यवाहीत
आणण्यासाठी

## ठेवी हव्या आहेत.


तीनशे रुपयांच्या किमान ठेवीवर
व्याजाच्या मोबदल्यात
माणूस अंक विनामूल्य—विशेषांकासहित

## किंवा

जेवढ्या रकमेची ठेव तेवढ्या रकमेची कोणतीही

## राजहंस प्रकाशने

व्याजाच्या मोबदल्यात मिळू शकतील.
ठेवीची मुदत किमान पाच वर्षे.



### योजनेसंबंधी अधिक काही

१. 'माणूस'चे चालू वार्षिक वर्गणीदार पुढील वर्षांसाठी तीनशे रुपये ठेव ठेवून या योजनेत सहभागी होऊ शकतील.

२. ठेव योजनेत 'माणूस' साप्ताहिक हवे असल्यास तीनशे रुपये ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावे.

३. ठेव योजनेत 'राजहंस प्रकाशने' हवी असल्यास तीनशे रुपये ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.

४. रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

५. राजहंस प्रकाशन सूचीतून कोणतीही पुस्तके निवडता येतील. जी प्रकाशने तयार असतील ती त्वरित दिली जातील. काहींसाठी थांबावे लागेल. पुस्तक पाठवणी खर्च ठेवीदारांनी करावयाचा आहे. योजनेतील नवी पुस्तके जसजशी तयार होतील तसतशा सूचना 'माणूस' अंकातून किंवा पत्रद्वारा ठेवीदारांना पाठवल्या जातील.

६. या योजनेची मुदत १ जून ७५ पर्यंत.

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३—५० |
| २. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३—५० |
| ३. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४—०० |
| ४. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४—०० |
| ५. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७—०० |
| ६. | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७—०० |
| ७. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २—०० |
| ८. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २—०० |
| ९. | पूर्णिया | अनिल अवचट | ६—०० |
| १०. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७—०० |
| ११. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०—०० |
| १२. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०—०० |
| १३. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२—०० |
| १४. | आणि डूंगन जागा झाला | अरुण साधू | १४—०० |
| १५. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५—०० |
| १६. | शतपावली | रवींद्र पिंगे | १०—०० |
| १७. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५—०० |
| १८. | टॉलस्टॉय-एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे | २५—०० |
| १९. | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १०—०० |

## आगामी

| | | मूल्य अंदाजे रु. |
|---|---|---|
| ¤ पश्चिमेचे पुत्र | रवीन्द्र पिंगे | १५ |
| ¤ देवाघरचा पाऊस | रवीन्द्र पिंगे | १५ |
| ¤ मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे | ४० |
| ¤ संचित | सौ. सुमती देवस्थळे | २० |
| ¤ मी गॉर्की बोलतोय | सौ. सुमती देवस्थळे | २० |
| ¤ हॉन डॅट | लक्ष्मण लोंढे | २० |
| ¤ हैद्राबाद मुक्तीसंग्राम | अशोक परळीकर | १५ |

| | | मूल्य अंदाजे रु. |
|---|---|---|
| ¤ नाझी भस्मासुराचा उदयास्त<br>तिसरी आवृत्ती | रा. म. शास्त्री | ४५ |
| ¤ सांगत्ये ऐका<br>तिसरी आवृत्ती | हंसा वाडकर | १० |
| ¤ प्रतापगड *आणि* शिवदर्शन<br>तिसरी आवृत्ती | ब. मो. पुरंदरे<br>श्री. ग. माजगावकर | २ |
| ¤ पुरंदऱ्यांची दौलत<br>तिसरी आवृत्ती | ब. मो. पुरंदरे | ४ |

**साप्ताहिक माणूस । राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० : ४३४५९**

# पॅपिलॉन – पृष्ठ १९ वरून

अगदी जन्मठेप मिळालेल्या कैद्यांची सुद्धा तशी इच्छा होत नसे. रॉयेलवरून पळ काढणं अवघड होतं. त्यासाठी सेंट लॉरेंट, कोरू किंवा केयेन या बेटांवर पाठवलं जाणं आवश्यक होतं. म्हणजे एक तर काही तरी गुन्हा हातून घडायला पाहिजे किंवा आजारपणाच्या सबबीवर. क्षय, महारोग, कॉलरा असलेल्या रोगांचे खोटे दाखले मिळणं अवघड नव्हतं, पण त्यात धोका होताच. जो रोग निवडला असेल त्या रोगानं पछाडलेल्या लोकांना स्वतंत्र व्यवस्था असलेल्या विभागात एक–एक–एक दोन–दोन वर्षं काळ काढावा लागे. याचाच अर्थ त्या रोगांचा संसर्ग होण्याची शक्यता.

अशा प्रकारे मी हळूहळू एकशेवीस सहकाऱ्यांमध्ये सामावलो जात होतो. खूप नव्या गोष्टी शिकायच्या होत्या. इतर कैदी तुमचं पाणी तेव्हाच ओळखत. पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्यात 'आदर' मिळवायचा. एकदा ते तुम्हाला वचकून आहेत असं कळलं की, पहारेकऱ्यांशी उद्दामपणा सुरू करायचा. उदा. वाटेल तसं बोलणे, सांगितलेलं काम नाकारणे, शिक्षा मान्य न करणे इ. मग त्यातून वॉर्डरशी वैर निर्माण झालं तरी हरकत नाही. रात्रभर पत्ते खेळण्यात वेळ गेला तर सकाळी हजेरीच्या वेळी 'उत्तर' द्यायचं नाही. ब्लॉकचा प्रमुख मग सांगे, 'आजारी आहे–बिछान्यात पडलाय.' आत येऊन तपासायची कोणाही वॉर्डरची प्राज्ञा नव्हती–निदान आमच्या हॉलमध्ये. या सर्व गोष्टींत एकदा रुळलं की बस्स्. एकंदरीत इथे आमचं आयुष्य 'सरळ' जात होतं.

माझा साथी ग्रँडेड मार्सेलिसचा होता. वय पस्तीस. खूप उंच, काटकुळा पण सशक्त. फ्रान्समध्ये त्याचे खूप मित्र होते. तिजोरी फोडण्यात तो तरबेज होता. स्वभाव फारच चांगला, पण चिडला तर त्याच्यासारखा वाईट दुसरा कोणी नव्हता.

त्या दिवशी हॉलमध्ये मी एकटाच पडलो होतो. लीडर झाडत होता आणि एकजण बिछान्यावर बसून घड्याळ दुरुस्त करीत होता. त्याच्या मागच्या कपाटात पंचवीस–तीस घड्याळं पडलेली दिसत होती. आपल्या कामात तो अगदी दंग होऊन गेला होता. वय फार तर तीस–बत्तीस असेल, पण केस संपूर्ण पांढरे झालेले. त्याच्याजवळ जाऊन मी लक्ष देऊ लागलो. काही प्रश्न विचारून संभाषण सुरू करायचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. त्यानं साधी मान वर करून पाहिलं देखील नाही. वैतागून मी हॉलबाहेर आलो. तिथे टिटी पत्ते पिसत बसला होता. त्याचा वेग कौतुकास्पद होता. त्याची लांबसडक बोटं तरबेज असल्याचं पाहताक्षणीच जाणवत होतं. आपलं काम चालू ठेवूनच त्यानं मला विचारलं, 'बोल, मित्रा, ठीक चाललंय ना? तुला रॉयेल आवडलं का नाही?'

'बरं आहे, पण आज मला फारच कंटाळा आला. मी आता काही तरी काम मागणार आहे, म्हणजे थोडं बाहेर तरी पडणं होईल. आत्ताच आत मी त्या घड्याळवाल्याशी दोन शब्द बोलावे म्हटलं तर त्यानं ढुंकून पाहिलं नाही.'

'पपी, त्याला जगातल्या कोणाचीही पर्वा नाही, अगदी देवाची सुद्धा. तो बरा आणि त्याची दुरुस्ती बरी. तो वेडा कसा झाला नाही, याचंच सगळ्यांना आश्चर्य वाटतं. तो तरुण इसम–म्हणजे तिसाच्या आत आहे म्हणून तरुण–स्वर्गाच्या दारातून परत आला आहे. ऐक त्याची कथा.' असं म्हणून टिटीनं त्याची सारी कहाणी मला ऐकवली. ती फारच मजेशीर आणि विचित्रही होती. वॉर्डरच्या बायकोवर बलात्कार केल्याच्या खोट्या आरोपावरून त्याला मृत्युदंड देण्यात आला होता. वास्तविक महिनेन्–महिने संगनमतानेच तो व्यवहार चालत असूनही, एक दिवस तो उघडकीला येताच वॉर्डरच्या बायकोनं खोटा कांगावा केला. एका रात्रीत बिचाऱ्याचे सगळे केस पांढरे झाले. पुढे त्याला मृत्युदंडाऐवजी जन्मठेप मिळाली.

'तेव्हापासून त्याला घड्याळदुरुस्तीचंच वेड लागलंय्. तिथं खूप घड्याळं पडली असतील बघ. आता तुझ्या लक्षात येईल की, तो कोणाच्यात का मिसळत नाही ते.'

'बरोबर, टिटी. इतकं झाल्यावर त्याचं वागणं योग्यच आहे.मला त्याच्याबद्दल फार वाईट वाटतं.'

दररोज मी नवीन नवीन गोष्टी शिकत होतो. आमच्या ब्लॉकमध्ये खरोखरी भयानक लोक भरलेले होते. पूर्वायुष्यात आणि चालू जीवनातही माथेफिरू. एकशेवीस जणांच्या तेवढ्याच तऱ्हा. मी अजूनही कामावर जात नव्हतो. झाडूवाल्याचं काम मिळावं, अशी माझी इच्छा होती. म्हणजे सकाळी पाऊण तास काम झालं की बाकीचा वेळ बेटावर फिरायला मोकळीक मिळणार होती. मासे धरण्यासाठी परवानगीही घ्यायची होती.

त्या सकाळी, हजेरीच्या वेळी जीन कॅस्टेलीचं नाव पुकारण्यात आलं. नारळाच्या लागवडीसाठी त्याला पाठवायचा त्यांचा बेत होता. ओळीतून पुढे होऊन तो आश्चर्यानं म्हणाला, 'हे काय चाललंय? तुमच्या बोलण्याचा अर्थ मी कामावर जावं? मी?'

'होय, तूच.' पहारेकरी म्हणाला, 'ही कुदळ घे.'

कॅस्टेलीनं त्याच्याकडे थंडपणे पाहिलं. 'तुला बरं वाटतंय ना? अजून तू नवा दिसतोस. दुसरीकडे जा बाबा. आमचा कुदळ–फावड्याशी कधीही संबंध आलेला नाही. मला निष्कारण त्रास देऊ नकोस.'

त्या तरुण पहारेकऱ्याला इथे परिस्थिती कशी हाताळायची याची जाणीव नव्हती. त्यानं कॅस्टेलीला दम द्यायला सुरवात केली. त्याबरोबर एकशेवीस लोक एकदम गुरगुरले, 'त्याला स्पर्श तरी करून पाहा, तुझा शेवट जवळ आलाच, असं समज!'

'आत व्हा.' ग्रँडेटे ओरडला आणि पहारेकऱ्यांच्या आक्रमक पवित्र्यांना न जुमानता आम्ही सगळे हॉलमध्ये शिरलो.

'बी' आणि 'सी' ब्लॉकमधले कैदी केव्हाच कामावर निघून गेले. सुमारे डझनभर वॉर्डर आले आणि त्यांनी आमच्या हॉलचा दरवाजा बंद केला. असं क्वचितच घडे. एक तासाच्या आत सुमारे चाळीस पहारेकरी सब–मशिनगन घेऊन दाराबाहेर उभे राहिले. तेवढ्यात डेप्युटी गव्हर्नर, मुख्य वॉर्डर आणि इतरही वॉर्डर तिथे दाखल झाले. सगळे गव्हर्नरची वाट पाहत होते. तो सहा वाजताच डेव्हिल बेटावर तपासणीसाठी गेला होता. त्याला या घटनेची काही कल्पनाच नव्हती. डे. गव्हर्नर म्हणाला, 'डेसेली, एकेकाची नावं पुकार!'

'ग्रँडेट?'

'आहे.'

'बाहेर ये.'

तो बाहेर जाऊन चाळीसजणांच्या मध्ये निर्भयपणे उभा राहिला.

डेसेली त्याला म्हणाला, ' ताबडतोब तुझ्या कामाला जा. '

' ते शक्य नाही. '

' तू काम नाकारतोयस ?'

' नाही. काम नाकारण्याचा प्रश्न नाही. मी आजारी आहे. '

' केव्हापासून ? सकाळच्या हजेरीच्या वेळी तू तसं बोलला नव्हतास. '

' तेव्हा मी ठीक होतो, पण आत्ता मला बरं वाटत नाही.'

एकेकाला असंच पुकारलं गेलं. पहिल्या साठजणांनी ग्रँडेटप्रमाणेच उत्तरं दिली. फक्त एकानंच ' कामावर जाणार नाही ' असं ठणकावून सांगितलं. त्याची नक्की अशी इच्छा असावी की, त्याला सेंट लॉरेंट-वर पाठवून कोर्ट-मार्शल व्हावं. ते जेव्हा म्हणाले, 'तू नाकारतोयस ?' त्यावर तो उत्तरला, ' अर्थात, मी काम नाकारतोय. एकदा नाही तर तीनदा तेच सांगेन !'

' तीनदा ? का ?'

' तुमच्यासारख्या हलकटांची आज्ञा मी पाळणार नाही. मी यापुढे कधीही कामावर जाणार नाही !'

वातावरण अत्यंत तप्त झालं. पहारेकऱ्यांना, त्यातल्या त्यात तरुण पहारेकऱ्यांना, हा अपमान सहन झाला नाही–तोही यःकश्चित कैद्यांकडून. ते फक्त एकाच गोष्टीची वाट पाहत होते–आमच्याकडून एखादी विपरीत हालचाल घडण्याची. म्हणजे त्यांना बंदुका चालवायला निमित्त मिळणार होतं.

' ज्यांना ज्यांना आत्ता पुकारण्यात आलं त्यांनी कपडे काढा आणि हॉलमध्ये जा !' सर्वांनी कपडे काढले. ते खाली टाकताना जमिनीवर चाकू आपटल्याचे आवाज एकसारखे येत होते. एवढ्यात तिथे डॉक्टर हजर झाला. ' थांबा. डॉक्टर, कृपया आतील सर्वांची तपासणी करा. जे आजारी नसतील त्यांना सरळ अंधारकोठडीत रवाना करण्यात येईल. बाकीचे आत राहू शकतात. '


' या साठच्या साठ जणांना बरं नाही ?'

'होय, डॉक्टर. तो एक सोडला तर सगळ्यांना,' काम नाकारणाऱ्या माणसाकडे बोट दाखवून मुख्य वॉर्डर म्हणाला.

' ठीक. चला एक-एक. ग्रँडेट, तुला काय झालंय ?' डॉक्टरनं विचारलं.

' काही नाही. सगळ्यांना पहारेकऱ्यांचा राग आला आहे. आम्ही मोठमोठ्या शिक्षा भोगत इथे काळ काढतो. सुटकेची यत्किंचितही आशा नाही. अशा वेळी निदान आमच्याशी सहानुभूतिपूर्वक वागणूक असावी का नाही ? आज सकाळी आमच्यातल्या कॅस्टेलीचा त्यांनी निष्कारण अपमान केला. आमच्याकडून काहीही गैर हालचाल न होता त्यांनी धमकी द्यायला सुरुवात केली. त्याचं म्हणणं एवढंच होतं की, त्याला कुदळ वापरायची सवय नाही आणि आमच्यात रोगाची साथ पसरण्याचं तेच कारण आहे. आता तुम्ही योग्य काय ते करा !'

मान झुकवून डॉक्टरनं मिनिटभर विचार केला आणि तो

म्हणाला, ' ऑर्डर्ली, लिहून घे. अन्नातून विषबाधा झाल्यामुळे सर्वांची प्रकृती एकाएकी बिघडली आहे. त्याबाबत त्वरित उपाययोजना आवश्यक आहे. प्रत्येक कैद्याला वीस ग्रॅम सोडियम सल्फेट देण्यात यावं. काम नाकारणाऱ्या इसमाची तपासणी करावी लागेल. त्याचं डोकं ताळ्यावर आहे किंवा नाही याची शंका वाटते. '

आणि पाठ वळवून तो बाहेर निघून गेला.

' सर्वजण आत व्हा. आपापले कपडे उचला आणि कोणीही चाकू घ्यायला विसरू नका ! '

त्या दिवशी सर्वांनी हॉलमध्येच मुक्काम ठोकला. एकालाही बाहेर जाऊ दिलं नाही–अगदी ब्रेड घेऊन येणाऱ्या इसमालाही. दुपारी सूपऐवजी तीन वॉर्डर सोडियम सल्फेट घेऊन आले. आमच्यापैकी फक्त तिघांनी ते घेतलं. चौथ्याला अचानक ' चक्कर ' आल्यामुळे तो औषधाच्या बादलीवर जोरात पडला. सगळं औषध जमिनीवर चौफेर पसरलं. याबरोबरच त्या घटनेवर पडदा पडला.

त्या दिवसाची दुपार मी कॅस्टेलीबरोबर काढली. मी जेव्हा त्याच्यापाशी सुटकेचा विषय काढला तेव्हा त्याचे डोळे चकाकले. तो म्हणाला, ' गेल्या वर्षी माझा सुटकेचा प्रयत्न थोडक्यात हुकला. मी ओळखून होतोच की तू स्वस्थ बसणार नाहीस, पण इथे त्या विषयावर बोलणं धोक्याचं आहे. इथल्या लोकांची तुला अद्याप चांगली ओळख पटलेली नाही. जवळजवळ नव्वद टक्के लोक इथे सुखात आहेत. तुम्ही काहीही केलं तरी ते चहाडी करणार नाहीत. तू कोणाला ठार केलंस तर साक्षीदार कधीही मिळणार नाही– चोरीबाबत तसंच. शक्यतो सर्वांना सांभाळून घेण्याचा इथे प्रयत्न करण्यात येतो. सर्वांना भीती फक्त एकाच गोष्टीची वाटते– एखाद्याचा सुटकेचा प्रयत्न यशस्वी होणे. कारण असं की त्यानंतर त्यांच्या तथाकथित आरामशीर आयुष्यावर संकट ओढवतं. शांत जीवन त्रासदायक बनतं. सतत तपासण्या, पत्ते बंद, संगीत बंद. रॅकेटचे व्यवहार स्थगित, पुस्तकं मिळणं बंद. सगळं काही एकदम बंद. एकसारख्या तपासण्या. सर्व पदार्थ अदृश्य होतात– साखर, तेल, लोणी इ. इ. त्यातून पळालेल्या कैद्याला लवकरच पकडण्यात येतं ते वेगळंच. पण रॉयेलवरून पळण्यात त्याला यश मिळालेलं असल्यामुळे पहारेकऱ्यांना शिक्षा होते, त्याचा वचपा ते कैद्यावर काढतात. '

मी सर्व अगदी काळजीपूर्वक ऐकत होतो. या नव्या गोष्टीमुळे विचाराला नवी चालना मिळाली होती. या बाजूनं मी कधीच विचार केला नव्हता.

' मला सांगायचंय काय की तुला जो काही प्रयत्न करायचा असेल तो एकट्यानं, पूर्ण खबरदारी घेऊन कर. अनोळखी इसमाबरोबर याविषयी बोलताना आधी दहा वेळा विचार कर !

जीन कॅस्टेलीजवळ जबरदस्त इच्छाशक्ती आणि अचाट बुद्धिमत्ता होती. बावन वर्षांचा असूनही तो ताकदवान होता. घरफोडीमध्ये तज्ज्ञ. हिंसाचाराची त्याला तमा नव्हती. तो पुढे म्हणाला, ' पॅपिलॉन, तू मला मुलासारखा आहेस. इथल्या आयुष्यात तुला रस वाटत नाही हे मी जाणतो. केवळ प्रकृती बळकट राहावी म्हणून तू भरपूर खातोस. मला तुझं कौतुक वाटतं. इथे फार तर सहाजण अशा विचाराचे निघतील. असो. सुटका करून घेण्यासाठी, तुला ते दुसऱ्या बेटावर पाठवतील असं काही तरी कर. कारण इथून सुटका यशस्वी होईल यावर कोणाचाही विश्वास नाही. '

त्यानं मला इंग्रजी शिकण्याचा सल्ला दिला. शिवाय स्पॅनिश बोलण्याचा सराव करावा असंही सुचवलं. ' चोवीस धड्यात स्पॅनिश ' नावाचं पुस्तक आणि फ्रेंच–इंग्रजी शब्दकोश त्यानं मला दिला. सुटकेचा विचार करणाऱ्या पाच सहा जणांच्या निरनिराळ्या योजना होत्या. कोणाच्याही योजनेत साम्य नव्हतं. त्या दिवशी मी ठरवलं की आपणच आपले निर्णय घ्यायचे. यापुढे सुटका या विषयावर बोलणं बंद !

हे सगळं विचित्र होतं, पण ती वस्तुस्थिती होती. फक्त एकाच गोष्टीवर सगळ्यांचं एकमत होतं– पैसे मिळविण्यासाठीच केवळ जुगार खेळणं. त्यात धोका होताच. कोणत्याही क्षणी तुम्हाला आव्हान मिळेल, कोणाही दणकट माणसाकडून. आणि तुम्हाला युद्धाशिवाय दुसरा पर्याय नाही. जीन कॅस्टेली, लुईस ग्रेव्हन आणि गार्डेस या तिघांचा तिथे फार दरारा होता. वयाच्या मानानं त्यांची ताकद कमालीची होती.

कालचीच गोष्ट. असं काही घडलं की ब्लॉकमधल्या सगळ्यांना मी माझी विचारसरणी आणि योग्य वागणुकीविषयीची माझी कल्पना समजावून दिली. नाईम्स नावाच्या तगड्या इसमानं सार्डिन् या नावाच्या किरकोळ प्राण्याला युद्धाचं आव्हान दिलं– अर्थात चाकूनं. ' प्रत्येक खेळाचे मला पंचवीस फ्रँक तरी दे किंवा खेळणं तरी बंद कर! '

सार्डिन म्हणाला, ' आजवर असं कोणीही केलेलं नाही. तू माझ्यामागे का लागलास ? तिकडे ' मार्सेलिस ' खेळामध्ये तू का सामील होत नाहीस ? '

' तो तुझा प्रश्न नाही. तू पैसे तरी दे किंवा खेळ बंद कर, नाही तर माझ्याशी लढायला ये ! '

' नाही, मी येणार नाही ! '

' मग खेळ बंद कर. तू अगदीच भेकड आहेस ! '

' तसं समज, कारण तुझ्यासारख्या गोरिलाच्या हातून भोसकून घ्यायची माझी इच्छा नाही, ज्यानं एकदाही सुटकेचा प्रयत्न केलेला नाही. मला इथे सारं आयुष्य काढायचं नाही, त्यामुळेच कोणाला ठार करायची किंवा दुसऱ्याच्या हातून मरण्याची आपली तयारी नाही. '

वातावरण तंग झालं. पुढे काय घडणार ? ग्रँडेट मला म्हणाला, ' तो छोटचा फार चांगला माणूस आहे. सुटका व्हावी असं त्याला मनापासून वाटतं. आपल्याला आता काहीच करता येत नाही याचं मला फार वाईट वाटतं. '

मी माझा चाकू उघडला आणि मांडीखाली दडवला. मी बसलो होतो ग्रँडेटच्या बिछान्यावर.

' मग काय माकडा ? तू पैसे देतोस का खेळ थांबवतोस ? लवकर काय ते बोल. ' नाईम सार्डिनच्या जवळ जात म्हणाला,

त्यावर मात्र मी ओरडलो, ' ए, साल्या, मागे फीर ! त्याचा नाद मुकाट्यानं सोडून दे ! '

' पॅपिलॉन, तुला वेड–बीड लागलं की काय ? ' ग्रँडेटनं घाबरून विचारलं.

जागेवरून यत्किंचितही न हलता, पण हातात चाकूची मूठ धरून

मी म्हणालो, 'मला मुळीच वेड लागलेलं नाही. आता तुम्ही सगळेजण मी काय सांगतो ते नीट ऐका. नाईम, तू सुद्धा ऐक. तुझ्याशी लढण्यापूर्वी– तुझी जर तशी इच्छा असेल तर– मला काही सांगायचंय्. इथे आल्यापासून मला एका गोष्टीचा राहून राहून खेद होतो की एवढे 'पराक्रमी' लोक एकत्र असूनही मुख्य गोष्ट जी सुटका त्यावर कोणीच विचार करीत नाही. सगळी शक्ती नको त्या गोष्टीत व्यर्थ चाललीय्. मला लाज वाटते याची. जो माणूस सुटकेचा प्रयत्न करीत असेल किंवा पूर्वी केला असेल त्याच्याविषयी तरी निदान सर्वांना आदर वाटला पाहिजे, ते राहिलं दूरच. या माझ्या मताविरुद्ध कोणाला बोलायचंय् ?' संपूर्ण शांतता. 'तुमचे कायदे स्वतंत्र आहेत हे एक वेळ मान्य, पण एका गोष्टीची मात्र त्यात कमतरता आहे. सुटकेची इच्छा बाळगणाऱ्या धाडसी लोकांविषयी तुमच्या मनात आदरभावना पाहिजेच, त्याशिवाय तुम्ही अशांना सर्व काही मदत केली पाहिजे. तुम्ही सगळेजण षंढ बनला आहात. इथल्या आयुष्यात तुम्हाला आनंद मिळतो ते उगीच नाही. मग तसा प्रयत्न करणाऱ्यांच्या आड तरी तुम्ही येऊ नका. यापुढे ही गोष्ट जो विसरेल त्यानं गंभीर परिणामाला तयार असावं. आणि आता नाईम, अजून तुझी लढायची इच्छा असेल तर मी तयार आहे.' असं म्हणून मी चाकूसह खोलीच्या मध्यभागी उडी टाकली.

त्यानं चाकू खाली टाकला आणि म्हणाला, 'तुझं अगदी बरोबर आहे, पॅपिलॉन; म्हणून मी चाकूनं लढत नाही, पण हातानं मी लढणार आहे. माझ्यातही दम आहे हे मला सिद्ध करायचंय्.'

मीही चाकू ग्रँडेटकडे दिला. पुढची वीस मिनिटं आमच्या दोघात चांगलीच जुंपली. अगदी हिंस्र जनावरांप्रमाणे. शेवटी एका फटक्याबरोबर मी कसाबसा जिंकलो. आम्ही दोघंही तोंडाला आलेलं रक्त धुण्यासाठी मोरीमध्ये गेलो. नाईम म्हणाला, 'तुझं आपल्याला पटलं. बेटावर आम्ही अगदी मूर्ख आणि बुद्दू बनलो. आता मलाच इथे येऊन पंधरा वर्षं झाली पण सुटकेबाबत मी काहीच हालचाल केली नाही याची आता मला लाज वाटते.'

मी जेव्हा आमच्या गटात परत सामील झालो तेव्हा ग्रँडेट आणि गाल्गानीनं मला चांगलंच मूर्खात काढलं. 'तुझं डोकं ठिकाणावर आहे ना? सगळ्यांचा तू केवढा अपमान केलास. तुझ्यावर तुटून न पडता सगळे शांत राहिले हा एक चमत्कारच म्हणायचा किंवा तुझं नशीब!'

'नाही, मित्रांनो, त्यात आश्चर्य काहीच नाही. जर एखाद्याचं म्हणणं खरोखर पटलं तर आपल्या जगात ते मान्य केलं जातं.'

'असेल, तसं असेल' गाल्गानी म्हणाला, 'पण पुन्हा असलं काही करायच्या भानगडीत पडू नकोस.'

त्या दिवशी संध्याकाळी प्रत्येकानं मुद्दाम माझी गाठ घेतली. दाखवत होते सहज आल्यासारखे आणि अवांतर विषयांवर बोलून जाता जाता ते म्हणत, 'तुझं म्हणणं मला पटलं, पपी.' या प्रसंगामुळे माझी खरी ओळख त्यांना झाली होती.

त्या क्षणापासून त्यांनी मला जवळचं मानलं. पण एवढंही ते जाणून होते की भलत्या गोष्टी मी चिकित्सा केल्याशिवाय मान्य करणारा नव्हतो. मी जेव्हा जुगाराचे वेळी एका टेबलाचा प्रमुख होई तेव्हा झगडे होत आणि माझा हुकूम विनातक्रार मानला जाई.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे टेबलप्रमुखाला जिंकलेल्या पैशांपैकी पाच टक्के हिस्सा मिळे. मागून खून होण्याची शक्यता असल्यामुळे भिंतीला पाठ टेकून बाकावर बसायची खबरदारी अशा वेळी घ्यावी लागे. पायावर रग घेऊन त्याखाली चाकू उघडा ठेवावा लागे. एका ठिकाणी तीस ते चाळीसजण खेळात भाग घेत. निरनिराळे खेळ अगदी सोपे होते. कोणत्याही परिस्थितीत प्रमुखाचा फायदाच असे. फक्त त्याला सगळ्यांवर बारीक लक्ष ठेवून पैशांचं योग्य ते वाटप करावं लागे. हे काम तितकं सोपं नव्हतं. अशा वेळी दुर्बळाचं रक्षण करावं लागे, कारण सशक्त लोक लबाडी करायची संधी पाहत असत. वादग्रस्त खेळाचा निर्णय एकदा मुख्य इसमानं दिला की तो विनातक्रार मान्य केलाच पाहिजे.

काल रात्री 'कार्लिनो' नावाच्या इटालियन कैद्याचा खून झाला. एक तरुण मुलगा त्याच्या 'बायको'ची भूमिका करीत होता दोघही बागेत काम करायचे. त्याच्या जिवाला धोका होता हे तो जाणून असावा. कारण त्या दोघांपैकी एकजण रोज पहारा देई व दुसरा निजे. त्यांनी बिछान्याखाली रिकामे डबे ठेवले होते. आवाज झाल्याशिवाय खालून सरपटत जाणं कोणाला शक्य नव्हतं. तरीही त्याचा खालूनच खून झाला होता. त्याच्या किंचाळीनंतर त्या डब्यांचा प्रचंड आवाज रात्रीच्या शांत वेळी सर्वांना ऐकू आला.

ग्रँडेट तीस–पस्तीस जणांचा 'मार्सेलिस पद्धतीचा' जुगार चालवत होता. सर्वजण खेळण्यात दंग झाले होते. जवळच उभा राहून मी काही तरी बोलत होतो. अचानक एक हृदयद्रावक किंचाळी आणि रिकाम्या डब्यांचा आवाज ऐकू आल्यामुळे खेळ बंद पडला. सगळे दचकून उठले आणि 'काय झालं' 'काय झालं' असा एकच गिल्ला सुरू झाला. कार्लिनोच्या 'मित्रा'ला काहीच दिसलं नव्हतं आणि त्याची नाडी बंद पडली होती. लॉक लीडरनं विचारलं, 'वॉर्डरला कळवू या का?' 'नको. उद्या सकाळी बघता येईल. आता तो ठार झाला असल्यामुळे आपल्या हातात काहीच राहिलं नाही. हजेरीच्या वेळी सांगता येईल!'

ग्रँडेट म्हणाला, 'कोणालाही काहीसुद्धा ऐकू आलेलं नाही. बच्या, तुलासुद्धा, नाही बरं का!' तो कार्लिनोच्या मित्राला म्हणाला, 'उद्या आपल्याला उठवण्यात आलं की तो मेल्याचं आपल्या लक्षात येईल.'

आणि काही घडलंच नाही अशा पद्धतीनं सर्वजण पुन्हा खेळात गर्क झाले–अगदी पुढच्याच क्षणी.

सकाळी खुनाचा प्रकार वॉर्डरच्या लक्षात येताच काय घडणार याचं मला कुतूहल होतं. साडेपाचला पहिली घंटा झाली. सहाला



दुसरी आणि सोबत कॉफी हजर. साडेसहाला तिसरा घटा झाल्यावर आम्ही नेहेमीप्रमाणे हजेरीसाठी बाहेर जमा झालो. कॉफीच्या वेळेस लीडरनं पहारेकऱ्याला सांगितलं, 'एका माणसाचा खून झालाय्.'

'कोणाचा ?'

'कार्लिनो !'

'ठीक आहे.'

दहा मिनिटांनंतर सहा पहारेकरी हजर झाले. 'प्रेत कुठाय् ?'

'तिकडे पहा !' त्यांना कार्लिनोच्या पाठीत कॅनव्हसमधून खुपसलेला खंजीर दिसला. तो त्यांनी बाहेर उपसून काढला.

'हे घेऊन चला !' दोघांनी स्ट्रेचरवरून प्रेत हलवलं. हजेरीच्या वेळी आज्ञा सुटली, 'सर्वजण बाहेर या. ओळीत उभे राहा. आजारी लोकांनाही आत राहण्याची परवानगी नाही.'

सगळेजण बाहेर आले. सकाळच्या वेळी गव्हर्नर आणि मुख्य वॉर्डर्स उपस्थित असत. नावं पुकारण्यास सुरुवात झाली. कार्लिनोचं नाव येताच एक वॉर्डर म्हणाला, 'रात्री ठार झाला. प्रेतागारात हलवण्यात आलं.'

'ठीक.' असं म्हणून हजेरी पुढे चालू झाली.

त्यानंतर खंजीर हातात धरून कॅम्पचा प्रमुख म्हणाला, 'हा खंजीर कोणाचा आहे ?' उत्तर नाही. 'खुनी इसम कोणाला दिसला काय ?' पूर्ण शांतता. 'म्हणजे नेहमीप्रमाणे कोणालाही काही ठाऊक नाही. आता आपापल्या कामाला जा. मेजर, खुनी सापडणं नेहमीसारखं कठीणच आहे.'

'चौकशी समाप्त,' गव्हर्नर म्हणाला, 'खंजीर काळजीपूर्वक ठेवल्यावर चिठ्ठी अडकवा—यानेच कार्लिनाचा खून झाला.'

सगळं सपलं. मी पुन्हा आत जाऊन बिछान्यावर पडलो. रात्रभर जागा होतो. क्षणभरही झोप मिळाली नव्हती. थोडी तरी झोप आवश्यक होती. इथे कैद्याला काडीची किंमत नव्हती हे माझ्या लक्षात आलं. अत्यंत भेकडपद्धतीनं खून होऊनही त्याचा तपास करण्याची अधिकाऱ्यांची इच्छा नव्हती. त्यांना त्याची फिकिरच नव्हती. कैद्यापेक्षा कुत्रा परवडला !

## पुन्हा तयारी सुरू

सोमवारपासून मी भंगीकाम स्वीकारण्याचं ठरवलं. आमच्या ब्लॉकमधील 'भरलेले' डबे समुद्रात ओतून द्यायचे असं कामाचं स्वरूप. पहाटे साडेचार वाजता उठावं लागे. एक जोडीदार मदतीला होताच. या कामातही आम्ही पळवाट शोधून काढली. जवळूनच एक नाला समुद्रापर्यंत जात होता. एका गाडीवाल्याशी संधान बांधून आम्ही डबे नाल्यात रिकामे करायचे आणि त्यावर सहाशे गॅलन् समुद्राचं पाणी ओतून द्यायचे. पाणी आणायचं काम गाडीवाल्याचं. पाण्याच्या जोरामुळे प्रवाहाबरोबर घाण समुद्रापर्यंत वाहून जाई. गाडीवाला निग्रो होता. त्याला रोज वीस फ्रॅंक्स् या कामासाठी द्यायचे असं ठरवलं होतं. अशा रीतीनं काम वीस मिनिटात आटपायचं. सवय नसल्यामुळे पहिल्या दिवशी डबे वाहताना मनगटं खूप दुखली, पण पुढे मला ते अंगवळणी पडलं.

नवा जोडीदार खूपच प्रेमळ आणि मदत करणारा होता, पण गालगानीच्या मते त्याच्यापासून सावध राहणं योग्य होतं. त्यानं म्हणे सात खून केले होते. सोनखत विकणारं रॅकेट त्यानं तयार केलं हात बागसाठी खताचा जरूर असायचाच. म्हणून तो गुपचुप आधीच खणलेल्या खड्ड्यात आम्ही नेत असलेल्या मैल्याचा काही भाग ओतत असे. प्रथम हे काम तो एकटा करी. पुढे मला त्यात सामील व्हावं लागलं. काम गैर होतं हे मी जाणून होतो, त्यामुळे एकदा त्याची चांगली जानपहेचान झाली की तसं त्याला सांगायचं मी ठरवलं. अर्थात नुकसानभरपाई म्हणून त्याला पैसे देणं ओघानंच येणार होतं. निरनिराळे रोग वॉर्डर आणि आमच्यात पसरू नयेत—खताच्या भानगडीमुळे—ही माझी सदिच्छा होती.

हे पहाटेचं काम एकदा संपलं की मला समुद्रावर जाऊन मासे मारायला मुभा होती. त्याआधी भरपूर पाण्यानं स्वच्छ अंघोळ करावी लागे. नंतर खास विजार चढवून हव्या त्या ठिकाणी मी जात असे. दुपारी बारा वाजता कोणत्याही परिस्थितीत हॉलमधे हजर पाहिजे असा नियम होता. चापारनं मासे धरण्यासाठी आवश्यक ते सर्व सामान दिलं. बऱ्याच वेळा भरपूर मासे मिळत. एका वायरला ते अडकवून परत येताना वॉर्डर लोकांच्या बायका मला हाक मारीत. त्यांना माझं नाव ठाऊक झालं होतं.

'पॅपिलॉन, मला पाच पौंड म्युलेट विकत दे की !'

'तुम्ही किंवा तुमचा मुलगा आजारी आहे का ?'

'नाही !'

'मग तुम्हाला मासे मिळणार नाहीत !'

मग मित्रांतच मी ते वाटून टाकत असे. दिवसातून एकदा तरी मासे खाण्याचा कार्यक्रम व्हायचा. एकदा बारा मोठे 'क्रेफिश' आणि सुमारे पंधरा पौंड 'म्युलेट' घेऊन परतताना मेजर बॅरटच्या पत्नीनं मला हाक मारली. ती बाई जरा जाड होती.

'पॅपिलॉन, आज तुला खूपच मासे मिळालेत. मला मासे खाऊन आता पंधरा दिवस तरी झाले असतील. तू जर मला देशील तर काय बहार येईल! तू म्हणे बायकांना मासे विकत नाहीस ?'

'ते खरं मॅडम; पण तुमची गोष्ट वेगळी आहे.'

'कशी काय ?'

'तुम्ही लठ्ठ आहात. मांस खाणं तुमच्या दृष्टीनं चांगलं नाही. मासे उत्तम.'

'हो ना, मला फक्त भाज्या आणि मासे खायला सांगितलं आहे.'

'हे घ्या !' असं म्हणून मी तिला जवळजवळ पाच पौंड क्रेफिश आणि म्युलेट दिले. त्या दिवसापासून भरपूर शिकार मिळाली की आपण होऊन मी तिला मासे देऊ लागलो. बेटावर प्रत्येक गोष्टीची खरेदी-विक्री होते हे तिला चांगलं माहीत होतं; पण 'धन्यवाद' या शब्दाखेरीज़ ती मला काही देत नसे. पैसे देऊन माझं मन दुखावेल असं तिला वाटत होतं. मात्र ती मला नेहमी घरात बोलावून घ्यायची. काही ना काही खायला द्यायची. तिनं माझ्या भूतकाळाविषयी कधी अवाक्षरही काढलं नाही. एक दिवस बोलण्याच्या ओघात ती एवढं मात्र म्हणाली, 'बेटावरून पळ काढणं शक्य नाही; पण इतर भागात जाऊन सडण्यापेक्षा इथे शुद्ध आणि मोकळ्या हवेत राहणं केव्हाही चांगलं.'

नवं काम स्वीकारल्यापासून मला कुठेही जायला आडकाठी नव्हती. गेल्या तीन महिन्यांत इतर कोणाहीपेक्षा मी या बेटाची बारीकसारीक माहिती पैदा केली. भाज्या आणि फळे माशांच्या मोबदल्यात मिळ-

वण्यासाठी बागेतही जावं लागे. माळीकाम करणाऱ्या कैद्याचं नाव होतं मॅथ्यू कारबोनेरी. तो आमच्याच गटात राहत होता. पुढेमागे एखादा तराफा बागेत बनवता किंवा पुरून ठेवता येईल असा विचार माझ्या मनात आला. दोन महिन्यांनंतर गव्हर्नर निघून जाणार होता. माझ्या शब्दातून मी मोकळा होणार होतो.

मी हळूहळू योजना करू लागलो. माझं काम जरी गाडीवाला पैशासाठी करीत होता, तरी मीच ते करतो असं सगळे समजत होते. 'नेरिक' आणि 'केनियर' नावाच्या दोन कैद्यांशी मी मित्रत्व संपादन केलं. त्यांना जन्मठेपच भोगायची होती. ते बांधकामखात्यात काम करीत असत. तराफा बनवण्यासाठी उपयुक्त वस्तू थोड्या थोड्या करून आणून देणं त्यांना शक्य होतं. फक्त त्यांचं मन वळवणं जरुरीचं होतं.

एकदा वाटेत डॉक्टरची गाठ पडली. मी चाळीस पौंड वजनाचा 'मेरू' नावाचा मासा घेऊन जात होतो. आम्ही दोघांनी एका छोट्या भिंतीवर बैठक मारली. तो म्हणाला, 'या माशाचं सूप खरोखर सुंदर होतं.' त्याबरोबर मी तो डॉक्टरला देऊन टाकला. त्याला फार आश्चर्य वाटलं. 'म्हणजे तुझा माझ्यावर पूर्वीसारखा राग राहिला नाही तर?'!

'खरं सांगायचं तर मासा द्यायचं कारण वेगळं आहे. माझ्या प्रिय मित्राला–जोन्सला–वाचविण्यासाठी तुम्ही शक्य ते सर्व प्रयत्न केलेत.'

काही वेळानं बोलता बोलता तो म्हणाला, 'तुझी पळून जायची इच्छा आहे ना? तू काही इतरांसारखा नाहीस हे मी ओळखतो.'

'तुमचं म्हणणं चुकीचं नाही ही काही कायम राहायला योग्य जागा नाही. केवळ जाताजाता भेट देण्यासाठी मी या बेटावर आलोय'

तो हसू लागला, त्याबरोबर मी संधी साधली. 'डॉक्टर, माणसाला नवं आयुष्य सुरू करणं शक्य असतं?'

'हो, का नाही?'

'तुम्हाला असं वाटतं का डॉक्टर, की माझ्यापासून चांगल्या समाजाला कधी धोका निर्माण होईल? त्यांच्यात मान्यवर व्यक्ती म्हणून सामावून जाणं मला शक्य आहे का?'

'मला प्रामाणिकपणे तसं वाटतं. तुझा कोणालाही निष्कारण उपद्रव होणार नाही.'

'मग मला तुम्ही मदत का करीत नाही?'

'कशी काय?'

'मला इथून आजारपणाच्या सबबीवर दुसऱ्या बेटावर पाठवून?'

मी पूर्वी ऐकलं होतं तेच त्यानं मला सांगून दुजोरा दिला. 'ते शक्य नाही आणि तसा प्रयत्न तू करू नयेस असाही माझा सल्ला आहे. कारण त्यात फार धोका आहे. कोणत्याही विशिष्ट रोगाची शंका आली की निदान एक वर्ष खास त्यासाठी उघडलेल्या विभागात ठेवून मगच तुम्हाला दुसऱ्या बेटावर पाठवतात.'

'असं का?'

'सांगायला शरम वाटते, पण निरोगी कैद्यानं डॉक्टरच्या संगनमतानं आजारपणाचा खोटा दाखला दिला असेल तर त्या विभागातल्या रोग्यांमुळे त्याला खरोखरच रोग चिकटावा अशी त्यांची इच्छा असावी. म्हणून मी तुला तसली मदत करू शकत नाही.'

त्या दिवसापासून माझी आणि डॉक्टरची खास दोस्ती जमली.

[क्रमशः]

---

नव्या गव्हर्नरच्या पत्नीनं मासे पकडून परत येताना मला आपल्या घरात बोलावून घेतलं. तिच्याशी बोलत असताना गव्हर्नर हजर झाला. तो बायकोला म्हणाला, 'ज्युलिएट, घरगड्याखेरीज इतर कोणत्याही कैद्याला घरात घ्यायचं नाही हे तू विसरलीस वाटतं?'

'हे पहा, या घराची मालकीण मी आहे. मी हवं तसं करीन! शिवाय श्रीमती बॅरट यांनी याच्याविषयी खूप चांगले उद्गार काढले होते.'

मी निघालोच होतो पण तिनं मला पुन्हा बसवलं. मग गव्हर्नर म्हणाला, 'ठीक आहे. बरं, तुझं नाव काय?' मी नाव सांगितल्यावर तो म्हणाला, 'मी तुझ्याविषयी बरंच ऐकलंय खरं. तीन वर्षांपूर्वीचा तुझा सुटकेचा प्रयत्न अजून लोक विसरले नाहीत. या बेटावर दिवसेंदिवस खुनांचं प्रमाण फार वाढतंय् याचं कारण तुझ्या मते काय असावं पॅपिलॉन?'

'कारण अगदी उघड आहे, गव्हर्नरसाहेब' इथून सुटका करून घेणं शक्य नाही या गोष्टीमुळे सर्वजण भडक माथ्याचे बनले आहेत. वर्षानुवर्षं एकत्र राहिल्यामुळे मित्रत्व किंवा शत्रुत्व टोकापर्यंत जातं. त्याशिवाय फार तर पाच टक्के खुनांचा किंवा हल्ल्यांचा शोध लावला जातो; त्यामुळं कोणाला भीती अशी वाटतच नाही!'

# सुटकेची तयारी सुरू

**पुढील अंकी**

---

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १७-५-७५ ते २३-५-७५

### गुजराथ आघाडीच्या नौकेला वादळी हेलकावे

गुजराथच्या निवडणुका हाच या वेळचा राजकीय चर्चेचा विषय आहे. कॉंग्रेस, जनता आघाडी आणि चिमणभाईंचा किसान पक्ष हे महत्त्वाचे तीन पक्ष निवडणुकीच्या आखाड्यात उतरले आहेत. निवडणुकीच्या ठरलेल्या वेळापत्रकाला अनुसरून विचार केला तर त्या वेळचे ग्रहमान गुजराथ, भारत सरकार यांना अनुकूल नाही. रवी आणि मंगळ यांचे अनुक्रमे वृषभ आणि मीन राशीतील भ्रमण डोकेदुखी कायम ठेवणारे, स्थैर्याबाबतचे प्रश्नचिन्ह कायम ठेवणारे असेच आहे. ७१ च्या मध्यावधी निवडणुतील बड्या आघाडीची ही छोटी जनता आघाडी हेत्वारोप, संशय, मतभेद यांच्या वादळाने जबर हेलकावे खाणार असून ती सत्तारूढ होण्याची शक्यता कमीच आहे. कॉंग्रेसलाही निर्विवाद बहुमताची शक्यता नाही. या आठवड्यात शहकाटशह असे राजकारण चालेल. गुजराथेत अस्वस्थ वातावरण राहील. महाराष्ट्रात असंतोष आणि गोंधळ व अडचणी वाढत राहतील. मंत्रिमंडळाच्या वाढीचे पडसाद वातावरणात घुमतील.

---

**मेष : चमत्कारिक अनुभव**

चौथ्या शनीची कारकीर्द पुढील महिन्यात सुरू होणार आहे. त्याआधी तुम्ही तुमच्या सर्व कामांना वेग आणला नाही तर सारेच मुसळ केरात जाईल. आज तुम्हाला जे थोडे फार स्वास्थ्य व शांतता आहे ती औषधाला देखील शिल्लक राहाणार नाही. म्हणूनच कामाला वेग आणा. तुम्ही ध्यानधारणा केली असेल किंवा मनात हेतू धरून काही उपासना आरंभली असेल तर त्याची फळे या आठवड्यात तुमच्या पदरात पडतील. नोकरी-धंद्याच्या परिस्थितीत नेत्रदीपक यश पदरी पडेल. नोकरी कायम झाली नसेल तर ती या वेळी कायम होईल. वरिष्ठांच्या मनात ओलावा निर्माण होईल. रविवार ते बुधवार हे दिवस धामधुमीचे आहेत. जास्त काम व जास्त त्रास असे काही तरी घडेल. एखादा निर्णय मनाविरुद्ध लागेल. महिलांना घरात व नोकरीमध्ये बोलून घ्यावे लागेल. शुभांक ८-९-१०.

**वृषभ : काही नवे घडेल**

लवकरच तुमची साडेसाती संपणार असून तुमच्या जीवनात उत्साहाचे वारे वाहू लागणार आहे. या आठवड्यात बरेच काही नवे घडणार आहे. अनेक रेंगाळलेल्या कामांना गती मिळणार आहे. तुम्ही जर शैक्षणिक अगर आकाशवाणीसारख्या क्षेत्रात काम करीत असाल तर तुमच्या कामाचे चीज होणार आहे. विस्कटलेली आर्थिक घडी ताबडतोब बसली नाही तरी तसे प्रयत्न हातून होतील. कापड, प्रसाधने, रसायने यांचा व्यापार जोरात चालेल. या धंद्याचे मालक व नोकर यांच्यात समभाव निर्माण होईल. इंजिनियरिंग उद्योगाचे कारखानदार व सरकार यांच्यात मात्र रुसवे-फुगवे निर्माण होतील. विवाहाला अनुकूलता नाही. मोहाला बळी पडून प्रेमात फसवणूक होईल. महिलांना कुटुंबात महत्त्वाचे स्थान मिळेल. सासूबाईंची मर्जी बसेल. शुभांक ३-९-१०.

**मिथुन : अडचणीवर मात**

सध्या तुम्हाला अनेक लहानमोठे ग्रह अनुकूल झाले आहेत. त्याचा फायदा घेऊन तुम्ही तुमची कामे पुढे रेटू शकाल. आर्थिक क्षेत्रात तुमच्या बुद्धीला फार मोठी किंमत येणार आहे. तुम्ही जर संख्याशास्त्रज्ञ असाल तर तुम्हाला जगातील कीर्ती मिळणार आहे. जगातील मोठ्या लोकाबरोबर तुमचा सहवास घडेल. बँक, चार्टर्ड अकौंटमध्ये काम करणारे या आठवड्यात खूष होणार आहेत. त्यांच्या जीवनात उत्साहवर्धक कामाची नांदी सुरू होईल. तुम्ही लेखक असाल तर तुमचे साहित्य एकदम लोकप्रिय होईल. नवीन लेखकांना पहिली प्रसिद्धी मिळेल. शनिवार ते सोमवार प्रिय माणसाचा विरह सहन करावा लागेल. तुमची आर्थिक परिस्थिती सुधारली नाही तरी खर्च बराच आटोक्यात राहील. रेसमध्ये भाग घेऊ नका. महिलांच्या या वर्षात या आठवड्यात महिलांना लोकप्रियता व स्वास्थ्य मिळेल. शुभांक २-५-६.

**कर्क : ठरवलेली कामे होतील**

आठवड्याच्या सुरुवातीलाच तुमच्या व्यावसायिक क्षेत्रात एखादी महत्त्वपूर्ण घटना घडून येईल व त्याचे अनुकूल परिणाम सादपडसाद आठवडाभर उठत राहतील. मंगळ आणि गुरू भाग्यस्थानी बसून तुम्हाला सहकार्य देण्याची भाषा करीत आहेत. त्यांच्या सहकार्याचा भरीव लाभ अवश्य उठवा. नाहीतर मागाहून पस्तावण्याची पाळी येईल. शनिवार ते बुधवार कामानिमित्त प्रवास घडेल. प्रवासात एखाद्या धनिक व्यक्तीबरोबर तुमचा परिचय होईल. त्याला अनुसरूनच आगामी काळाच्या योजना तुम्ही आखू शकाल. साडेसाती आहे. शनी बारावा आहे. त्यामुळे खर्च आटोक्यात येणे जरा कठीण आहे. चैन, अनावश्यक व्यसन, दवाखाना वगैरे कारणासाठी पैसा जाईल. लॉटरीत गेलेला पैसा परत मिळण्याइतपत बक्षीस लागेल. महिलांना संसारात घरसजावट करता येईल. अनेक दिवसांच्या आशा-आकांक्षा पुऱ्या होतील. शुभांक ३-१०-१२.

**सिंह : महत्त्वाचे निर्णय**

हा आठवडा बराच महत्त्वाचा ठरणार आहे. मात्र आठवड्याची व्ययस्थ चंद्राने होत असल्यामुळे खर्चाला सुमार राहाणार नाही. आजार व आणखी काही अनावश्यक खर्च होऊ शकेल. गुरुवारी-शुक्रवारी मित्र, नातेवाईक यांच्याकडून अनपेक्षित मदत मिळेल. नव्या ओळखी होतील. राजकारणात मोठ्या नावाच्या व्यक्तीचा संबंध येईल. उद्योगधंद्याचे क्षेत्र विस्तारेल. स्वतःच्या मनासारखे काही तरी उद्योगात करता येईल. प्लॉट वा शेतजमीन विकत घेता येईल. स्त्री-मैत्रीचा लाभ होईल. नोकरीत बुद्धिचापल्य दाखवायला संधी मिळेल. महिलांच्या हितासाठी नोकरीत महत्त्वाचा बदल घडेल, खाजगी नोकरीत मालकांची मर्जी राहील. शुभांक १३-१४-१८

**कन्या : अनेक लाभ**

आठवड्याच्या सुरुवातीला पैशाची बाजू खूपच बळकट होणार आहे. तुमच्या शिलकेला गेले काही दिवस गळती लागली आहे ती या वेळी थांबेल. सोमवार ते बुधवार वरिष्ठांच्या मनातील तुमच्याबद्दलचा संशय निवारण होईल. कामाचा बदल होईल किंवा तसा विचार होऊ लागेल. तब्येतीची बाजू सुधारेल. त्रासिक वृत्ति लोप पावेल. सातवा

गुरू आहे. पति-पत्नीत अधिक प्रेम निर्माण करील. संसारातील कटुता कमीकमी होऊ लागेल. मुलांचे कौतुक करण्यात आनंद मानाल. नोकरीत तुमचे स्थान उंचावेल. तुमच्यापैकी जर कुणी बेकार असेल तर त्याला तात्पुरती नोकरी मिळू शकेल. विवाहाचे बेत पार पडतील. महिलांना नोकरीत बुद्धिमत्ता दाखवायला संधी मिळेल. परीक्षेत चांगले यश मिळेल. शुभांक १६–१७–२९.

**तूळ** : अनपेक्षित लाभ

आठवा रवी श्रमाशिवाय संपत्ती मिळवून देत असतो. तुमचा मूळचा रवी जर अनुकूल असेल तर या वेळी तुम्हाला लॉटरी अगर रेसमुळे पैसा मिळेल. पण या आठवड्यात तुम्हाला खरे यश मिळेल ते महत्त्वाच्या पत्रव्यवहारात. तुम्ही जर परदेशी प्रवासाच्या प्रयत्नात असाल तर ते काम सहज होऊ शकेल. सहावा मंगळ विरोधकांच्या कारवाया निपटून काढील. पण तब्येतीला काही किरकोळ त्रास होईल. चष्मा लावावा लागेल. सोमवारी चंद्र अकरावा शुभ आहे. कलाक्षेत्रात प्रवेश मिळेल. तरुणींना प्रेमाचा साक्षात्कार घडेल. गुरुवारी नोकरीत महत्त्व वाढेल. महिलांना माहेरहून बोलावणे येईल. पत्र येईल. शुभांक ७–९–१२.

**वृश्चिक** : अधिकारात वाढ

राशीचा अधिपती मंगळ पंचमस्थानी असून तो तुमच्या नोकरीतील स्थानाला मोठे महत्त्व आणून देणार आहे, प्लॅस्टिक, अभ्रक, खते व ॲल्युमिनियम या धंद्यात जे व्यवस्थापक आहेत त्यांना अधिकाराची प्राप्ती होईल. स्वतःचा धंदा असल्यास प्रगतीचा नवा टप्पा गाठता येईल. चालू नोकरीत मोठे काम व यश मिळेल. शेतीपदवीधर सरकारी नोकरीत गाजतील. नवा उद्योग मंगळवारी सुरू करा. पैशाची परिस्थिती रविवारनंतर सुधारेल. राजकारणात मात्र विरोधी वारे राहील. निवडणूक विरुद्ध जाईल. विरोधकांचा डाव उधळला गेला तरी त्रास होईल. संसारात आकस्मिक अडचण. महिलांच्या लेखनाला वाचकांचा प्रतिसाद मिळेल. चांगली नोकरी मिळेल. शुभांक १०–१२–१९.

**धनू** : विवेकाने वागा

गुरूच्या गुणधर्माची तुमची रास असून देखील तुमची पावले अनेकदा चुकीची पडतात. नोकरीत याचा प्रत्यय अधिक प्रमाणात येतो. हाताखालच्या लोकांना तुम्ही विनाकारण त्रास देता व त्यामुळे तुमचे व त्यांचे संबंध बिघडलेले राहातात. या वेळी तुमच्यावर मानहानीचा प्रसंग येईल असेच ग्रहमान आहे. बेकारांना नोकरी मिळण्यात अडचण येऊ शकेल. तब्येतीला कटकट सुरूच राहील. प्रवासाचा बेत पुढे ढकलावा लागेल. घरातील वातावरण गरम राहील. मुलांच्या बाबतीत काही कटकटी निर्माण होऊ शकतील. स्वतंत्र धंदा जरा मंदावेल. व्यापारात गिऱ्हाईक मिळू शकणार नाही. महिलांना मानसिक स्वास्थ्य कमी मिळेल. शुभांक १४–१५–२५.

**मकर** : नोकरीत प्रमोशन

सरकारी नोकरांच्या संपात तुम्हाला त्रास झाला असेलच.पण त्या कारणाने तुमच्याबद्दल झालेला गैरसमज या आठवड्यात विरघळून जाईल. रवी आणि मंगळ दोन्ही ग्रह तुम्हाला अनुकूल आहेत. अनेक अर्जविनंत्या करून देखील तुम्हाला जे प्रमोशन आजवर मिळत नव्हते ते या आठवड्यात मिळेल. सरकारी नोकरीपेक्षा खाजगी नोकरीत हा अनुभव विशेषत्वाने येईल. तुमच्या मनात शेतजमीन घेण्याचे बरेच दिवस घाटत होते. ती इच्छा या वेळी पुरी होईल. पैसा अगर तंत्रज्ञ याची अडचण होणार नाही. रविवार ते बुधवार जुन्या आठवणीने मन प्रसन्न होईल. पैसा पुरेसा मिळेल. हाताखालच्या माणसांना दुखवू नका. लेखनात अडचणी येतील. राजकारणात माघार घ्यावी लागेल. विद्यार्थी परीक्षेत पास होतील. महिलांना सार्वजनिक कार्यात मोठेपण मिळेल. प्रेमात यश येईल. शुभांक ९–१०–१२.

**कुंभ** : पुढे पाऊल पडेल.

तुमचा पिंड राजकारणी आहे. गेल्या काही दिवसांत तुमच्या वाट्याला उपेक्षाच आली होती. काहींच्या बाबतीत तर ओठाशी आलेला सुसंधीचा पेला अचानक दूर ओढला गेला असेल. पण आता ते दुःख तुम्ही विसरून जा. कारण तुम्हाला आता चांगले योग येत आहेत. राजकारणात तुम्हाला काही आश्वासने मिळाली होती. त्या आश्वासनांची परिपूर्ती या वेळी होईल असा विश्वास बाळगायला हरकत नाही. राजकारणात तुमचे स्थान उंचावणार आहे, तर नोकरीत तुम्हाला वरची जागा मिळणार आहे. कौटुंबिक स्वास्थ्य मात्र मिळणे जरा कठीण आहे. तेल-उद्योग, कापूस–उद्योग, लोखंडी सामानाचा उद्योग यांपैकी जर तुमचा काही उद्योग असेल तर त्यात प्रगती होईल. मुलांच्या तब्येती सुरमुरीत राहातील. सोमवार व गुरुवार महत्त्वाची वार्ता कळेल. महिलांना उद्योगधंद्यात उत्तेजन मिळेल. शुभांक– ९–११–१२.

**मीन** : नोकरीत अधिकारप्राप्ती

मीन राशीचा वनवास केव्हाच संपला आहे. काही तरी नवे नावीन्यपूर्ण अनुभव देणारे वारे तुमच्या जीवनात वाहू लागले आहे. तुमच्यापैकी ज्यांचे लग्नाचे वय उलटून गेले आहे व जे लग्नाच्या अपयशापायी निराश झाले आहेत त्यांना या वेळी संजीवनी लाभल्याशिवाय राहणार नाही. जोडीदार एकमेकाला पूरक असे भेटतील. संसारात प्रसन्न वातावरण राहील. नवराबायकोचे खटके उडाले तरी त्यात मजा वाटेल. शनिवारी मित्रमंडळींबरोबर सहल घडून येईल. रविवारी अपेक्षित व्यक्ती भेटेल. सोमवार ते बुधवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाच्या वाटाघाटी होतील. महसूल खाते, बांधकाम खाते यांत राजपत्रित अधिकारी या राशीचे असतील तर त्यांना प्रमोशन मिळणार आहे. महिलांना व्यवसायात मोठा वाटा मिळेल. अनपेक्षित अर्थलाभ होईल. शुभांक ४–८–१२. □ □


बॉम्बे डाइंग

एकमेव वितरक

पराग

डेक्कन जिमखाना, • लक्ष्मी रोड, पुणे

आज आपल्यासाठी

खास नवीन प्रकार

स्वस्त दरात

बेल बॉटम पिसेस

कुडता पिसेस

# झिलमिल सितारे

# धर्मेन्द्र

अरुणा अंतरकर

स्टार म्हणून त्याचं नाणं
आज खणखणीत वाजतंय....
उद्या नट म्हणून ते
कसं वाजेल ?

चांगला कलाकार बनण्यासाठी आधी चांगला माणूस बनायला शिकणं आवश्यक आहे, हे वचन खरं असेल तर धर्मेन्द्र एव्हाना भारतीय रजतपटावरचा सर्वश्रेष्ठ नट (स्टार नव्हे !) व्हायला हवा होता. चित्रव्यवसायातल्या कोणत्याही पदावरच्या, कोणत्याही स्तरावरच्या कोणत्याही व्यक्तीला धर्मेन्द्रबद्दल विचारा–जो तो एकमुखानं धर्मेन्द्रची प्रशंसा करताना आढळेल. ' विनम्र ', ' साधासुधा ', ' निगर्वी ', ' सहकार्यवादी ' ही सगळी विशेषणं धर्मेन्द्रवर मुक्तहस्ते उधळली जाताना दिसतात.

' धरमिंदरसाब बडे दिलका मालिक है ' म्हणून लाइटमन त्याची तारीफ करताना आढळेल. तीन शिफ्टसपैकी एकीकरता का होईना धर्मेन्द्र वेळ देईल, ही खात्री असल्यामुळे त्याचे निर्माते सहकार्यशील स्वभावाबद्दल त्याची तोंड फाटेतो स्तुती करताना दिसतील. त्याच्या वागण्यातल्या अदबीवर आणि गोडव्यावर त्याच्या नायिका खूप असलेल्या आढळतील. आपल्या कामात जराही ढवळाढवळ न करणारा, हिरोगिरी न करणारा हिरो म्हणून अनेक लेखक नि दिग्दर्शक धर्मेन्द्रच्या प्रेमात पडलेले सापडतील. आणि असे तसे दिग्दर्शक नव्हेत. हृषिकेश मुखर्जी धर्मेंद्रबद्दल आपण ' पार्शल ' असल्याचं उघड कबूल करतात. दुसऱ्या नामवन्त नटाबरोबर काम करायला असलेले बडे कलाकार धर्मेंद्रबरोबर खळखळ न करता काम करायला तयार असलेले दिसतील. कारण धर्मेन्द्रच्या स्वभावात राजकारण नाही याची त्यांना खात्री वाटत असते. सहजासहजी कुणाला चांगलं म्हणायला तयार नसलेली पत्रकार मंडळीसुद्धा धर्मेन्द्रची भलावत करताना आढळतील. कारण धर्मेन्द्रची भेट ही सहजशक्य गोष्ट आहे. इतरांप्रमाणे तो आढेवेढे घेण्याचे नखरे करीत बसणार नाही.

विस्मयाची गोष्ट म्हणजे, धर्मेन्द्रला भेटलात तर ही सगळी विशेषणं त्याला लागू पडतात असं आढळण्याची शक्यता जास्त आहे. त्याची गुलाबी कीर्ती ऐकून तुम्ही जरा बिचकतच त्याला भेटायला जाल. त्याच्या लोभसवाण्या हास्यात जादू आहेच, पण त्याच्या वागण्या-बोलण्यात आपुलकी निर्माण करणारी सहजता आहे; चटकन् ध्यानात येणारी प्रसन्नता आहे. त्याच्या वागण्यातली मिठास अदब फक्त स्त्रियांसाठी राखून ठेवलेली नाही. आणि ही मिठास मुद्दाम कमावलेली आहे. जनसंपर्क वाढवण्याची, प्रतिमा तयार करण्याची ही युक्ती आहे असं बिलकुल वाटत नाही. धर्मेंद्रच्या रूपाप्रमाणे त्याच्या स्वभावातही सौम्य गोडवा आहे. कणखर मर्दानी सौंदर्यासाठी धर्मेंद्रचं कौतुक होतं. पण त्याच्या या मर्दानीपणात ओबडधोबड राकटपणा नाही. उमदेपणा आणि सहृदयता, या भावांनी त्याच्या कणखरपणात हळूच एक हळुवारताही मिसळून दिली आहे. पुरुष-प्रेक्षकांना त्याच्याबद्दल मित्रभाव वाटतो; त्याच्या मर्दानपणात ते आपल्या स्वप्नांची प्रतिबिंबं बघतात. स्त्री-प्रेक्षकांना धर्मेंद्रच्या मऊसूत नजरेतून विश्वास, आदर आणि सन्मान मिळत असल्याची भावना होते. आबालवृद्ध प्रेक्षकांचा धर्मेंद्र प्यारा आहे तो म्हणूनच.

संवेदनक्षम चेहेरा त्याच्याजवळ नाही; पण आश्वासक निष्कपटता तिची उणीव भरून काढते. आणि धर्मेंद्रवर लोकप्रियतेचा वरदहस्त ठेवून जाते. पडद्यावरच नव्हे, तर पडद्यामागेही रोमँटिक नायकाची भूमिका सजीव करण्याबद्दल धर्मेंद्रचा लौकिक आहे. पण धर्मेंद्रच्या व्यक्तिमत्त्वावरून तरी वाटतं की, याच्या रंगेलपणातही विषयी लंपटपणापेक्षा दिलफेक रंगेलता आहे, भावुकता आहे. आणि त्याच्या या विशिष्ट ' कीर्ती 'च्या सच्चेपणाबद्दल संशय वाटावा असा लाघवी लाजरेपणाही आजही त्याच्या वागणुकीत आहे.

अन्य हिरोंप्रमाणे धर्मेंद्रची सेटवरची एंट्री कधी वाजतगाजत वा रुबाबदार थाटात होत नाही. धर्मेंद्रच्या येण्यानं सेटवर कधी दराऱ्याची शांतता पसरलीय असंही दृश्य दिसत नाही. त्याच्या सेटवर ' नो व्हिजिटर्स ' असा तुसडी प्रवेशबंदी फलकही नसतो. पत्रकारच काय, चहाते, बघे आणि मित्रमंडळी धर्मेंद्रच्या सेटवर गर्दी करताना दिसतात. ही गर्दी कधीकधी इतकी असते, की या माणसांच्यातून वेळ काढून धर्मेंद्र मधेमधे जमेल तेव्हा शॉट देतो म्हणणं चुकीचं ठरणार नाही. इतक्या यशस्वी नटाला शत्रू नसतीलच असं मानणं धाडसीपणाचं ठरेल. पण धर्मेंद्रचा मनमिळाऊ स्वभाव बघता, इतर नटांच्या मानानं त्याला फारच कमी शत्रू असावेत, असा अंदाज आहे.

नेमका इथेच प्रश्न पडतो : पंजाबमधल्या खेड्यातून आलेल्या शेतकऱ्याच्या या मुलाची जिद्द अमाप

आहे. त्यानं मोठं नाव कमावलं, संपत्तीच्या राशी खेचून आणल्या. या ऐहिक मोजमापांच्या पलीकडे जाऊन धर्मेंद्र या माणसानं केलेली कमाईही उदंड आहे.
पण वयाच्या आठव्या वर्षापासून 'शहीद 'मधल्या त्या छोट्या बालनटावरोबर मैत्री करणारा; मोतीलालवर जान कुर्बान करणारा, शामच्या अपघाती निधनानंतर सैरभैर झालेला; दिलीपकुमारच्या अभिनयानं भारावून जाऊन त्या क्षणांची तासन तास आरशासमोर उजळणी करणारा; 'परख ' पाहिल्यानंतर बिमल रॉयची कधी भेट होईल न् कधी त्यांच्याबरोबर काम करायला मिळेल हा एकच ध्यास लागलेला, नोकरीतून पैसे वाचवून पन्नास–साठ मैलांवरच्या शहरात दर आठवड्यासाठी सिनेमा पाहायला चक्कर मारणारा, आणि अखेर नट होण्यासाठी मुंबईत आल्यावर गॅरेजच्या वळचणीखाली राहणारा, पोट मारून सिनेमे पाहायला आणि स्टुडिओमध्ये चकरा मारायला पैसा–पैसा वेगळा काढून ठेवणारा नट धर्मेंद्र–त्याची कमाई काय ? अर्थात धर्मेंद्रनं केवळ त्याच्या देखण्या रूपावर चित्रसृष्टीतलं आजचं मानाचं स्थान मिळवलेलं नाही. त्याची जिद्द, त्याची मेहनत आणि त्याचे मर्यादित का होईना, पण अभिनयगुण ह्या गोष्टींनीच त्याला शिखरावर नेलं आहे. ' बेगाना ', ' बंदिनी ', ' सूरत और सीरत ' या सिनेमांमध्ये धर्मेंद्र अभिनयाविषयी ' सीरियस ' आहे, जागरूक आहे अशी आशा वाटली होती.
' यकीन 'सारख्या चित्रपटात त्याला डबल रोल होता, आणि त्यातल्या सांकेतिक नायकापेक्षा रंगेल, वाममार्गी खलनायकाच्या व्यक्तिरेखेला रंग भरून धर्मेंद्रनं स्वतःबद्दल अपेक्षा निर्माण केल्या होत्या.
' सत्यकाम 'सारख्या चित्रपटाची आर्थिक जबाबदारी स्वीकारून आपल्या कलाप्रेमाची ग्वाही त्यानं दिली होती. स्वाभाविकपणे पडद्यावर वावरणारा एक जबाबदार अभिनेता त्याच्या रूपात चित्रसृष्टीला मिळाला आहे असं वाटत होतं. इतक्यात– ' फूल और पत्थर ' आला. आला आणि धर्मेन्द्रला ' स्टार ' बनवून गेला. स्टार बनवून गेला आणि धर्मेन्द्रची चौकट ठरवून गेला. धर्मेन्द्रमधला नट हळूहळू वाढत होता, त्याला प्रसिद्धीची आणि वाढत्या सुबत्तेची चिन्हं दाखवून फितूर करून निघून गेला.
परिस्थितीनं वाममार्गाला लागलेला, पण दिलदार मनाचा, गरिबांचं भलं करणारा (आणि धडाकेबाज ॲक्शननी निर्मात्याचे खिसे भरणारा) निधड्या छातीचा नायक ही धर्मेन्द्रची प्रतिमा झाली. ७२ साली आलेल्या ' सीता और गीता 'नं या इमेजवर कळस चढवला. त्यानंतर ७३ साली धर्मेन्द्रनं अर्धा डझन रौप्यमहोत्सवांचा जॅकपॉट हस्तगत केला. या सहाही सिनेमांत तो आधुनिक रॉबिनहुड होता हे सांगायलाच नको.
वर्षानुवर्षांच्या सरावानं धर्मेन्द्रच्या कामात सफाई आली, आत्मविश्वास आला. पण त्याची अभिनयकला या पंधरा वर्षांच्या काळात परिपक्व, सखोल झाली नाही. रूप आणि शरीरसंपदा धर्मेन्द्रला सढळपणे लाभली असली, तरी नटाचे इतर गुण निसर्गतः धर्मेंद्रला त्या प्रमाणात लाभलेले नाहीत. भरीव आवाजाच्या देणगीपासून तर तो वंचित आहेच; पण स्वच्छ, स्पष्ट, शुद्ध शब्दोच्चार ऐकल्याचं समाधानही धर्मेंद्रकडून मिळत नाही. मग सुरेख संवादफेक वगैरे बाजूलाच राहू द्या. ' जिंदगी 'च्या ऐवजी तो ' जिन्गी ' असा उच्चार करतो तेव्हा हसून घालवता येतं. पण ' अनुपमा 'सारख्या सुरेख नावाचा उच्चार तो ' अनुप्मा ' असा करतो तेव्हा विरस झाल्याविना राहात नाही.
मुद्राभिनयाचीही धर्मेंद्रची बाजू साधारणच आहे. हर्ष, खेद, आनंद यांची त्याची अभिव्यक्ती ढोबळ असते. एखाद्या भावानं धर्मेंद्रची चर्या उचंबळली आहे, वा एखादे वेळी नजरेनंच तो बोलून गेला आहे किंवा आवाजाचा उपयोग करून त्यानं हृदय हेलावणारा शोक वा उसळता अंगार उभा केला आहे, हे दृश्य धर्मेन्द्रच्या बाबतीत कल्पिणं आजपर्यंत तरी अशक्य आहे.
जी भावनाशीलता धर्मेंद्रच्या स्वभावात आहे, तिचा उत्कट आविष्कार आजपर्यंतच्या त्याच्या भूमिकेत दिसलेला नाही. अपवाद एकच– ' सीता और गीता 'मधल्या त्याच्या शाका डोंबाऱ्याच्या भूमिकेचा. धर्मेंद्र त्या शाकाशी अगदी एकरूप झालाय, असं चैतन्य त्या भूमिकेत आढळलं. पुन्हा कधी धर्मेंद्र एखाद्या भूमिकेच्या असा प्रेमात पडेल तो सुदिन !
धर्मेंद्रने भावनिक चढउतार भरपूर पाहिले आहेत. सिनेमात जम बसण्यासाठी त्याला अफाट वणवण करावी लागली आहे 'हा काय हिरो होणार ? कधी काळी फूटबॉल खेळाडूच्या आयुष्यावर सिनेमा निघणार असेल तर याला चान्स मिळेल. नाही तर...' अशा अर्थाची हेटाळणी त्यानं सोसली आहे. ' फिल्मफेअर टॅलण्ट कॉण्टेस्ट ' तो पहिल्या क्रमांकानं उतरला. पण या स्पर्धेतला पहिला नंबर आपल्याला एकही काम मिळवून देत नाही, याचा त्यानं वर्षभर अनुभव घेतला. चित्रप्रवासाच्या पहिल्या टप्प्यात ' दिल भी तेरा हम भी तेरे 'सारखे सर्वार्थी दुय्यम सिनेमे त्याला मिळत गेले.
हे संघर्ष काहीच नव्हेत, अशा वादळाची चव धर्मेन्द्रनं मीनाकुमारी त्याच्या आयुष्यात आली तेव्हा घेतली. कोणत्याही हिंदी सिनेमाचा शेवट माहीत असावा, इतक्या निश्चितपणे या प्रेमपर्वाचा दुःखांत सर्वांना ठाऊक होता. अभिजात कलानिर्मिती हा उललेल्या अंतःकरणासाठी राखून ठेवलेला हक्क असेल, तर या तीव्र मानसिक संघर्षानंतर धर्मेंद्रच्या अभिनयात परिपक्वता दिसायला हवी होती. पण वैयक्तिक चढउतारांचे अनुभवकलेत रूपांतरित करण्यात आणि त्यायोगे स्वतःची कला समृद्ध करण्यात धर्मेंद्र नेहमीच अयशस्वी ठरत आला आहे.
या दुर्दैवी पर्वाचे बाकी बरेवाईट परिणाम आणि निष्कर्ष काहीही असतील, एक गोष्ट मात्र खरी वाटते : धर्मेंद्रनं मीनाकुमारीचा उपयोग स्वतःच्या करिअरसाठी करून घेतला, ह्या आरोपात फारसं तथ्य वाटत नाही. (धर्मेंद्रची मुलाखत होईपर्यंत माझाही हा गैरसमज होता, हे इथं कबूल केलं पाहिजे.) वैयक्तिक आयुष्यात धर्मेंद्र जितक्या रोमँटिक स्वभावाचा आहे, तितकाच सनातन मूल्यांचा पुरुष आहे. स्वतःच्या कोणत्याही लाभासाठी तो स्त्रीचा उपयोग करून घेणार नाही. खरी खोटी प्रेमप्रकरणं (किंवा कदाचित खरोखरच्या पण क्षणिक भावनिक गुंतणुकी) त्याच्या

आयुष्यात घडत असतीलही, पण त्यांचा प्रसिद्धी मिळविण्यासाठी उपयोग करणं हा धर्मेंद्रचा स्वभाव नव्हे.

फार काय, स्त्रीचं क्षणिक वर्चस्वसुद्धा तो सहन करणार नाही. स्वतः मीनाकुमारीनंच एका मुलाखतीत हे नमूद केलं होतं की, आपल्या नायिकांशी तो सलोख्याचे संबंध अवश्य राखतो, पण अभिनयाबाबत त्यांच्याकडून आलेली एखादी सूचनाही तो मंजूर करणार नाही आणि स्वतः धर्मेंद्रनंही अप्रत्यक्षपणे याची कबुली दिली आहे.

' राखी, जया किंवा शर्मिला यांच्यासारख्या बुद्धिमान नायिकांसमोर मी जरा अनुइझीच असतो. '

इतका प्रांजलपणा धर्मेंद्रचे भाईबंद दाखवतील का काय, शंकाच आहे.

बरं, अंगात जेवढे काही अभिनयगुण असतील ते अभ्यासानं वाढवायला धर्मेंद्रजवळ पुरेसा वेळ आहेच कुठं ? प्रसंगी दोन नव्हे, तीन शिफ्टसमध्ये धर्मेंद्र काम करतो. आधी या स्टुडिओतून त्या स्टुडिओत जाण्यासाठी वेळ लागतो. नंतर सगळा वेळ माणसांच्यात जातो. पुढच्या चित्रपटाबद्दल बोलणी करीत धर्मेंद्र शॉट देतो, पुन्हा परत येतो, त्या सिनेमाबद्दलची चर्चा थोडी पुढे सरकते, पुन्हा धर्मेंद्र शॉट द्यायला उठतो... बहुतेकदा हा त्याचा नित्यक्रम झालेला दिसतो. आपल्या दृश्यांची तयारी करायला, त्यांचे बारकावे अभ्यासायला धर्मेंद्रच्या हातात वेळच कुठे शिल्लक असतो.

भाराभार चित्रपट हाती घेण्यात धर्मेंद्रच्या बरोबरीला फारच थोडे नट उभे राहतील. पुन्हा एक गंमत म्हणजे, इतकं काम हाती घेऊन ते पुरं करणारा धर्मेंद्रसारखा एखादाच असतो. फक्त बड्या निर्मात्यांना तारखा द्यायच्या, त्यांना सांभाळायचं, असलं धूर्त राजकारण त्याच्याजवळ नाही. तो हृषिकेश मुखर्जीलाही सांभाळणार आणि ' क 'कार फेम अर्जुन हिंगोरानीचंसुद्धा मन राखणार. ' इंटरनॅशनल क्रूक ', ' रेशमकी डोरी ', ' पॉकेटमार ' हे त्याचे चित्रपट पाच–सात वर्षांपूर्वी सेटवर गेले. मध्येच त्यांनी बसकण मारली. पण धर्मेंद्रच्या नावाचा फायदा घेऊन त्यांनी आपली वाटचाल पुरी करायचं ठरवलं. चित्रपटांचं भवितव्य पुरेपूर ठाऊक असूनही धर्मेंद्रनं पाच वर्षांच्या अवधीनंतरही हे करार पूर्ण केले. दुसरा एखादा व्यवहारचतुर नट असता, तर डोळ्यांसमोर दिसणारं हे अपयश परतवून लावण्यासाठी त्यानं नक्की काही तरी टाळाटाळ करून या सिनेमांकडे दुर्लक्ष केलं असतं. धर्मेन्द्रच्या हे स्वभावात नाही. त्यानं आपलं काम पूर्ण केलं. परिणाम काय झाला ? ७३ साली ' टॉप ज्युबिली स्टार ' ठरलेल्या धर्मेंद्रला ७४ साली लागोपाठ तीन अपयशांचा टिळा लावून घ्यावा लागला.

पण अपयशांच्या अडथळ्यांनी धर्मेंद्रच्या घोडदौडीला कधीही नाट लावलेला नाही. आज अव्वल क्रमांकाचा बॉक्स ऑफिस स्टार या किताबतीसाठी धर्मेंद्र आणि अमिताभ बच्चन यांच्यात स्पर्धा सुरू झाली आहे. केवळ आपल्या स्वभावाच्या जोरावर धर्मेंद्रनं या स्पर्धेत विजेतेपद मिळवलं तर आश्चर्य वाटायला नको. धर्मेंद्र ज्या सिनेमाचा नायक आहे, त्याचे पैसे अडून राहणार नाहीत, अशी निर्मात्यांबरोबर वितरकांचीही खात्री असते, ती उगीच नाही.

बिमल रॉय यांच्या निधनानंतर ' चैताली 'ची हालचाल काही काळ पूर्ण थंडावली. ती पुन्हा मार्गावर आली, तेव्हा धर्मेन्द्र डबल शिफ्टच्या माऱ्याखाली गुदमरत होता. पण आजही महिन्यातून दोन दिवस धर्मेंद्रनं ' चैताली 'साठी राखून ठेवलं आहेत. या दोन दिवशीही धर्मेंद्र डबल शिफ्ट करतो आणि रात्री दहा वाजता ' चैताली 'च्या शूटिंगसाठी हजर राहतो. ' चैताली 'ची गोष्टच वेगळी. ' बिमल रॉय प्रॉडक्शन्स' ची ती निर्मिती आहे. हृषिकेश मुखर्जीसारखा खंदा दिग्दर्शक तिथं जातीनं लक्ष घालतो आहे. ' चैताली 'साठी दिलेला जास्त वेळ ही धर्मेंद्रची भावी लाभासाठी केलेली गुंतवणूक ठरेल. पण हलाखीच्या दिवसांत वाट्याला आलेल्या एखाद्या स्मिताची परतफेड करण्यासाठी जेव्हा धर्मेंद्र स्वतःची शक्ती अशीच फुकट घालवतो तेव्हा वाटतं, याचा हा स्वभावच याचा पहिला शत्रू आहे. ' लोफर 'सारखे सुमार, बकवास सिनेमे केवळ धर्मेंद्रच्या नावामुळे रौप्यमहोत्सव साजरे करतात. धर्मेंद्रनं या सिनेमांना मोठं केलं खरं; पण या सिनेमांनी धर्मेंद्रच्या वाढीला काय मदत केली ?

धर्मेंद्रबद्दल बोलताना एका परखड टीकाकारानं म्हटलंय, ' त्याची कलात्मक वाढ खुंटण्याची दोन कारणं आहेत. एक म्हणजे, उपजत तो फार बुद्धिमान नाही. दोन : अभिनयाखेरीज त्याला कोणत्याही सर्जक कलेचा छंद नाही. वाचन, संगीत, चित्रकला—यातल्या कशाचीच त्याला खास आवड नाही. '

धर्मेंद्रतल्या कलाकाराला मारक ठरलेली ही गोष्टच नेमकी हिंदी फिल्म इंडस्ट्रीच्या कामी आली आहे, हे मात्र विसरून चालणार नाही. त्याला अन्य कसलेही शौक नाहीत, म्हणून तर तो सारा वेळ सिनेमासाठी देऊ शकतो. समजा, त्याच्यापाशी बुद्धी आणि प्रतिभा असती तर काय झालं असतं ? दिलीपकुमारकडे या दोन ऋद्धी–सिद्धी पाणी भरतात. पण त्याच्याबद्दल निर्मात्यांचं म्हणणं काय आहे ? तो कामात नको तितकी ढवळाढवळ करतो, त्याच्या चिकित्सक स्वभावामुळे, पूर्णत्वाच्या अट्टाहासामुळे सिनेमाच्या कामाचे दिवस आणि बजेट फुगत राहतात.

अमिताभला सुद्धा या दोन्ही देणग्या देवदत्त मिळालेल्या आहेत. यश–अपयश–यश, असा अनुभव घेतल्यावर तो आता सावधपणे वागू लागला आहे. सिनेमांची, निर्मात्यांची आणि दिग्दर्शकांची कसोशीनं निवड करू लागला आहे. स्वतःच्या भविष्यकाळाला बाधक ठरणारी कुठलीही गोष्ट तो स्वच्छपणे दूर ठेवू लागला आहे. ' जुनं ऋण, एकेकाळचे उपकार ' अशा भावनांमध्ये अमिताभ गुंतत नाही. त्याला एकेकाळी हात देणारे निर्माते आज त्याच्या उपयोगाचे नसतील, तर त्यांना नकार द्यायला तो कचरत नाही. जाणकार मंडळी अमिताभच्या या वृत्तीची दाद देतात; पण प्रोड्युसर्स काय म्हणतात? ते म्हणतात, ' अमिताभला गर्व झाला आहे...यश त्याच्या डोक्यात गेलं आहे... त्याचे पाय आता जमिनीवर नाहीत, ' इत्यादी इत्यादी. या पार्श्वभूमीवर धर्मेंद्र निर्मात्यांना देवदूत वाटतो, यात नवल नाही. त्यांचंही खरंच आहे. कला आणि व्यवसाय, या सिनेमाच्या दोन्ही बाजू लक्षात घेतल्या तर त्याला दिलीपकुमार–अमिताभ–संजीवसारखे प्रतिभाशाली नटही लागतात

पृष्ठ ३७ वर

## खुशबू

दिलीप रुद्राक्ष

अलीकडे फिलमवाल्यांना चित्रपटासाठी चांगली नावे देखील सापडत नाहीत म्हणून अनेकदा तीच तीच नावं पुढे येतात. सध्या अशाच नावांचा जमाना आहे. एखादा निर्माता जर ' चोर ' या नावाचा चित्रपट तयार करीत असला तर मग त्यामागोमाग ' महाचोर ', ' कच्चा चोर ', ' चोर सिपाही ' ' काला चोर ' इ. त्या ' चोर ' नावाच्या पार चिंध्या केल्या जातात. म्हणूनच की काय आता ' परिणय, चमत्कार, सीधासादा, कोरा कागज ' यासारख्या नावांचा अवलंब केला जात आहे; पण ही नावं अगदीच ड्राय वाटतात. ' खुशबू ' हा अशा नावांपैकी एक चित्रपट लवकरच प्रकाशित होणार आहे. खुशबू म्हणजे सुगंध. या अर्थाचेच कथानक त्या चित्रपटासाठी निवडण्यात आले आहे. बंगालचे प्रसिद्ध स्व. साहित्यिक शरतचंद्र चतर्जी यांच्या ' पंडित मोशाय ' कादंबरीवर तो आधारलेला आहे. उपरोक्त चित्रपट तिरुपती पिक्चर्स कम्बाईन संस्थेने निर्माण केला असून यापूर्वीचा त्यांचा ' परिचय ' हा चित्रपट चांगला चालला होता. अभिनेते जितेंद्र यांचे बंधू प्रसन्नकपूर यांनी त्या चित्रपटाची पटकथा व गीते लिहिली असून निर्मातेही तेच आहेत. जितेंद्र' हेमामालिनी, फरिदा जलाल, असरानी, दुर्गा खोटे, मा. राजू, सिमरान आणि शर्मिला टागोर ( पाहुणी कलाकार ) यांच्या भूमिका असलेल्या ' खुशबू ' चे संगीत आर. डी. बर्मन यांनी तयार केले आहे. छायाचित्रक के. वैकुंठ आणि दिग्दर्शक गुलजार. बंगाली कथानकावर आधारलेले हिंदी चित्रपट प्रामाणिकपणे चित्रित केले असले तर चालतात असा अनुभव आहे. या चित्रपटाच्या कथानकावरून तरी असे वाटते की, तो प्रकाशित झाल्यावर रसिकांच्या परिसरात दूरवर आपल्या ' खुशबू 'ने एक प्रसन्न वातावरण तयार करील. ◻

## 'खुशबू' मध्ये हेमा - जितेन्द्र

हमारे प्यारकी खुशबू अब सारी बिरादरी मे फैल चुकी है।



# ' रंगा खुश ' ऽऽऽ जोगेंदर

मुंबईला आल्यावर अगदी सुरुवातीच्याच चित्रपटात त्याला डाकूचा मोठा रोल मिळाला. तो चित्रपट होता ' चंदन ' व त्याचा चित्रपटप्रवास सुरू झाला आणि आज केवळ पाच वर्षात त्याने निर्माता, दिग्दर्शक म्हणून चंदेरी दुनियेत झेप घेतली आहे.

ही फिल्मी व्यक्ती म्हणजे ' बिंदिया और बंदूक ' आणि ' दो चट्टाने 'चा जोगेंदर. सिनेमात सर्वच गोष्टी पैशाच्या भरवशावर चालतात; पण या क्षेत्रातले सगळेच पैशाच्या बाबतीत दादा लोक असल्यामुळे नव्या माणसांना तरी या क्षेत्रात अनेक वर्षे थारा मिळत नाही. नाव मिळत नाही. कारण फिल्मी दुनिया म्हणजे एक वेगळेच विचित्र वेड आहे.सध्या राजेश खन्नासारख्या हिरोला साईन करणे आणि तेही जोगेंदरसारख्याने म्हणजे ' बहोत बडी बाजी मार दी ' असेच आहे.


जोगेंदर यांच्या बाबतीत त्यांच्या चित्रपटाची गुणवत्ता काय ? म्हणून त्याला यशाचे मोजमाप लावायचे असाही प्रश्न येतोच. परंतु यावर त्याचे स्वतःचे उत्तर असे की, ' मैं सत्यजित राय नहीं हूँ । आम आदमी के लिए फिल्म बनाता हूँ । ' म्हणूनच जोगेंदरला ' अंकुर ' सारखे चित्रपट बकवास वाटतात. खयाल अपना अपना.

फिल्म इंडस्ट्रीत कुणाला संघर्ष करावा लागत नाही ? तो जोगेंदरनेही केला आहे. त्याच्या साफसाफ गोष्टी ऐकण्यात मोठी मजा वाटते. तो म्हणतो, ' फिल्म इंडस्ट्रीने कामयाबी हासिल करने के लिए हाथ में शराब, बगल में लडकी और सुविधा के लिए कार, बस फिर जंग फतह । ' नाही तर दुसरे चालतेच काय ? केवळ या गोष्टी असणाऱ्यालाच यश प्राप्त होते.

रुपेरी पडद्यावर दिसणारा, मोठमोठे केस वाढविलेला, दाढीवाला क्रूर प्राणी, जोगेंदरचे प्रत्यक्षातले वैशिष्ट्यच वेगळे आहे. ' रंगा खुश ' मध्ये तर तो डाकूच्या रूपात मोठा हिप्पीच वाटतो. १८ एप्रिलला तो चित्रपट दिल्लीला प्रदर्शित झाला आहे.


आजपर्यंत डाकूच्याच वेशात पडद्यावर दिसलेला जोगेंदर त्याच्या आगामी ' फौजी ' आणि ' यारी जिंदाबाद ' मध्ये एकदम वेगळ्या भूमिकांत दिसणार आहे. ◻





# धर्मेन्द्र

हॉलीवूडचा बर्ट लँकेस्टर!



अमिताभ • धर्मेंद्र • असरानी

# चुपके चुपके

धर्मेन्द्र : पृष्ठ ३२ वरून

आणि प्रदीपकुमार, देव आनंद आणि धर्मेंद्र देखील लागतात. (आणि निव्वळ स्वत:ची करमणूक करून घेण्यासाठी जीतेंद्र, मनोज आणि विश्वजीत सुद्धा लागतातच की ! )

अर्थात या दुसऱ्या वर्गामध्ये धर्मेंद्र वेगळेपणानं उठून दिसणारा नायक आहे. डोळे दिपवून टाकणारा अभिनय त्याच्यापाशी नसेलही. पण ठराविक लकबी, हातवारे या कंटाळवाण्या गोष्टींपासून धर्मेंद्र शंभर कोस दूर आहे. कोणत्याही भूमिकेतला पडद्यावरचा त्याचा वापर सुखद असतो. तो अभिनय करतो आहे, असं वाटू नये इतका नैसर्गिक असतो. केवळ उमद्या व्यक्तिमत्त्वानं तो अभिनयातल्या त्रुटींची भरपाई करू शकतो. डाकूपासून प्रोफेसरपर्यंतच्या भूमिकांत खपून जाऊ शकतो. रांगड्या भूमिका हा तर त्याचा स्वभाव आहे. सोहनवालच्या शुद्ध हवेवर साजूक तुपावर, कुस्ती आणि हॉकीवर वाढलेला धर्मेंद्र ' मेरा गाव मेरा देश ' सारख्या भूमिकांमध्ये अगदी चपखल वाटतो. आजच्या जमान्यातला तो एकमेव शुद्ध स्टार आहे. एखादा चलाख हृषिकेश मुखर्जी त्याच्यातल्या ' स्टार 'चा पुरेपूर फायदा उठवतो आणि ' गुड्डी ', ' चुपके चुपके ' सारखे प्रसन्न सिनेमे धर्मेंद्रच्या खाती जमा होतात. आपण वाट्टेल त्या सिनेमात काम करतो ह्या खंतीचा त्याला विसर पाडायला लावतात. तसा खंतीपायी झुरणारा माणूस नव्हे हा. आपल्याला परिस्थिती बदलणं जमणार नाही, तर परिस्थितीशी जमवून घेत हसतमुखानं जगू, ही त्याची वृत्ती. दृष्ट लागावी अशा देहसंपदेनं रंगीबेरंगी कपड्यांचा नूर वाढवत दर सिनेमागणिक तो भक्तिभावानं ॲक्शन डिपार्टमेंट सांभाळतो. (ते कपडेसुद्धा धर्मेंद्रच्या मोहक व्यक्तिमत्त्वावर फिदा असतात की काय ? इतर हिरोंच्या अंगावर भडक नि छाकटे वाटणारे कपडे धर्मेंद्रचा नूर वाढवण्याऐवजी, त्याच्याकडून स्वत:ची शोभा सांभाळून घेतात.)

चाळिशीच्या उंबरठ्यावर असलेल्या, हिंदी रजतपटाच्या या अग्रक्रमाच्या तळपत्या ताऱ्याला आपल्या भविष्याची आता चाहूल लागल्यासारखी वाटते. नायिकेचा वा नायकाचा बाप, भाऊ, मामा, काका या हिंदी सिनेमाच्या संदर्भात ' चरित्र भूमिका ' ( ! ) समजल्या जाणाऱ्या भूमिका आपल्याला शोभणार नाहीत याची त्याला जाणीव आहे. त्यामुळे आता मिळेल तेवढ्या भूमिका स्वीकारणं हे त्याचं धोरण राहाणार हे उघड आहे. ही मागणी कायम राहावी यासाठी त्यानं एक साधी पण नेमकी युक्ती हुकमाचं पान म्हणून त्यानं हातात ठेवली आहे. इतर टॉप हिरोंचे भाव वेगानं वाढत असताना, गेल्या चारपाच वर्षांत धर्मेंद्रनं स्वत:च्या मोबदल्यात एक रुपयाचीही वाढ केलेली नाही– अर्धा डझन ज्युबिली हातात असतानाही ! लागोपाठ त्याचे दोन–तीन सिनेमे पडले तरी धर्मेन्द्रची मागणी अजीबात कमी होत नाही, याचं हेही एक कारण आहे.

स्वत:चं वाढतं वय लक्षात घ्यायला धर्मेन्द्र विसरलेला नाही. (' चुपके चपके 'मध्ये त्याचं वय आणि अती कामानं त्याच्यावर पडलेला ताण त्याचा जून, शिणलेला चेहरा स्पष्ट सांगून जातो.) रोमँटिक नायकाच्या भूमिका त्यानं सोडलेल्या नाहीत; पण त्याचबरोबर ' यादोंकी बारात 'सारखी एखादी भूमिका धर्मेन्द्र हाताशी ठेवतो, जिच्यात सारं महत्त्व तर त्याच्या वाट्याला येतं, पण रोमँटिक इमेजशी तिचा काहीही संबंध नसतो. ' चैताली ', ' शोले ', ' डागदरबाबू ' या त्याच्या आगामी भूमिका या दृष्टीनं विशेष लक्षात घेण्यासारख्या आहेत. या तिन्ही भूमिकांत त्याच्या रोमँटिक इमेजपेक्षा स्वभावदर्शनाला अधिक वाव आहे. धर्मेन्द्र त्यांचा फायदा उठवील का ! नट म्हणून पुढे जाईल का ?...

कोण जाणे नट म्हणून त्याची चित्र–इतिहासात काय नोंद होईल; याचा आढावा घ्यायला अद्याप खूप अवकाश आहे. स्टार धर्मेन्द्रला भरपूर आयुष्ययोग्य आहे. निदान ज्याची स्टार म्हणून तळपण्यात काहीही खोट नव्हती एवढी धर्मेन्द्रची दखल निश्चित घेतली जाईल. ' स्टार ' म्हणून आज त्याची एकट्याचीच गणना केली जाईल. निदान या एका बाबतीत त्याचं नाणं आहेच तसं खणखणीत ! ■ ■

### ते पत्र

' फिल्मफेअर टॅलण्ट कॉन्टेस्ट 'साठी धर्मेन्द्रनं अर्ज पाठवला खरा. पण दोन तीन महिने लोटले तरी त्याचं काहीच उत्तर येईना. आशा निराशेचे हेलकावे घेता घेता एक दिवस धर्मेन्द्र इतका वैतागला, की त्या भरात, हिरो बनण्यासाठी म्हणून वाढवलेले केस त्यानं अगदी बारीक कापून घेतले– आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या हातात एक पत्र पडलं. ' फिल्मफेअर' नं त्याला स्पर्धेसाठी मुंबईला बोलावल्याचं आमंत्रण सांगणारं ते पत्र ! ◻

### सुजाता

ज्या ' सुजाता 'नं बिमल रॉयना आर्थिक व कलात्मक यश भरभरून दिलं, त्यानंच त्यांच्यापुढं इन्कम टॅक्सचा गहन प्रश्न निर्माण करून टाकला. या सिनेमाला मनोरंजन-कर माफ झाला होता. त्या काळी करमाफी मिळाली, तर तेवढी रक्कम तिकिटांमध्येच वसूल करून घेऊन मग निर्मात्याला परत मिळत असे.

' सुजाता 'नं ठिकठिकाणी रौप्यमहोत्सव साजरे केले, आणि इन्कम टॅक्सचं जबर देणं बिमलदांच्या डोक्यावर ठेवायला हेच कारण झालं ! ◻

### चेंडू हवालदार

' पांडू हवालदार 'ची प्रिंट घेऊन दादा कोंडके दिल्लीला गेले. सरकारी कचेरीत त्यांच्या फेऱ्या सुरू झाल्या. सरसकट अ–मराठी अधिकारी ' पांडू हवालदार ' ऐवजी सिनेमाचं नाव ' चेंडू हवालदार ' असं उच्चारीत होते.

' पांडू ' अशी दुरुस्ती सुचवल्यावर हे लोक आणखीच बुचकळ्यात पडले. ' पांडू क्या होता है ? पांडूका मतलब क्या ?'

पांडू हे पांडुरंगचं संक्षिप्त रूप आहे; पांडुरंग हे महाराष्ट्राच्या अनेक दैवतांपैकी एक आहे, असं कळल्यावर मग ' पांडू हवालदार 'चा उल्लेख ' भगवान हवालदार ' म्हणून होऊ लागला ! ◻



नजर । ह. शि. खरात

# बेल्जियम चित्रपट महोत्सव

बेल्जियम चित्रपट मी प्रथमच पाहतोय. हे चित्रपट बघावयास मिळाले त्याचे कारण फेडरेशन ऑफ फिल्म फोरमस्. ह्या संस्थांचा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य म्हणावा लागेल. नाही तर काय होतं, परदेशी चित्रपटांचा महोत्सव जाहीर केला जातो आणि परदेशी चित्रपट म्हणजे सेक्सचं उघडंवाघडं प्रदर्शन अशी एकंदर सामान्य प्रेक्षकांची समजूत. थोडीशी गैरच. मग काय, भरमसाठ काळाबाजार होतो. वाटेल ती किंमत देऊन काही आंबटशोकी मंडळी तिकीट घेतात. त्यामुळे खरा जाणकार रसिक ह्या चित्रपटांना मुकतो. त्याला लाईनीत उभे राहून तिकीट मिळत नाही किंवा पैशाअभावी काळाबाजारही महाग पडतो. त्यामुळे धड चित्रपट महोत्सवाचा हेतू साध्य होत नाही की धड सांस्कृतिक समाधानही मिळत नाही. ह्यावेळी फेडरेशन ऑफ फिल्म फोरमस् ह्यांनी आपल्या सभासदांना हे चित्रपट दाखविल्याने अनेक गोष्टी साधल्या गेल्या. तरीही चित्रपटांची निवड सापेक्ष नव्हती. किंवा मुद्दाम तसा एखादा चित्रपट निवडला होता की काय हे कळत नाही. उदाहरणार्थ, जॉनी आणि जेसी हा चित्रपट अगदी आपल्याकडील हिंदी चित्रपटासारखा वाटला. त्यातील रंगीत फोटोग्राफी आणि सेक्स वगळून. त्यातील सर्व काही मसाला बघून हा चित्रपट केवळ रुचिपालट म्हणून घेतला असावा. त्यात सर्व काही होते. सस्पेन्स, सेक्स्, मारामारी. फक्त गाणी नव्हती. आणि चित्र सपाटून मंद असे होते. वेगवान हिंदी चित्रपटाची दिल बहलानेवाली धडाकेबाज जसबानी स्टोरी असूनही तो जरा मंदच वाटला. असो.

बेल्जियम चित्रपट मी प्रथमच पाहात असल्याने पूर्वी काय होते आणि आता कुठपर्यंत मजल मारली आहे, हे काही सांगता येत नसले तरी परवा 'आकाशवाणी' मध्ये बेल्जियन सहा चित्रपटांचा महोत्सव बघताना पाहिजे तेवढे समाधान मिळाले नाही. असे जरी असले तरी हे चित्रपट पाहिल्यावर आपल्या लक्षात राहातात ते दोन चित्रपट आणि दोन कलाकार. रंगीत फोटोग्राफीबद्दल वादच नाही. डोळ्याला रंगीत सोहळ्याचे सुख मिळाल्यावाचून राहात नाही. परन्तु कॅमेऱ्याचा फार मोठ्या कलात्मकतेने विचार केला आहे असे वाटत नाही. कधी कॅमेरा वाटेल तसा फिरवलेला वाटतो तर कधी तो फारच रेंगाळतो. मात्र काही शॉटस् अतिशय देखणे आहेत. विशेषतः फ्लॅश बॅकचं तंत्र फारच परिणामकारकतेने वापरले आहे.

लुईसा, ए वर्ड ऑफ लव्ह, मीटिंग अॅट ब्रे, जॉनी अॅण्ड जेसी, रेड रूम, मालप्रेटिस आणि लव्हर हे सहा चित्रपट. बहुतेक १९७० ते १९७३ दरम्यानचे हे चित्रपट. त्यात 'मीटिंग अॅट ब्रे' हा १९७० चा तर 'रेड-रूम' हा १९७३ चा. ह्या चित्रपटांपैकी लक्षात राहातात ते मीटिंग अॅट ब्रे आणि मालप्रेटिस. मीटिंग अॅट ब्रे आपल्याला गूढ अशा विश्वात नेतो तर मालप्रेटिस भयानक अशा अद्भुततेमुळे चक्रावून टाकतो.

मीटिंग अॅट ब्रे या चित्रपटाला गूढ अशी काव्यात्मता लाभली आहे. धूसर अशा वातावरणातील चित्रण, समर्पक फ्लॅशबॅक आणि साऱ्यालाच गडद करणारं थोडंसं विषादपूर्ण संगीत ह्यामुळे हा चित्रपट एक उत्कृष्ट चित्रपट म्हणावा लागेल. ह्या चित्रपटातील देखणा नट जो 'मालप्रेटिस' मध्येही आहे, तो मात्र चांगलाच लक्षात राहतो. अतिशय रुबाबदार व्यक्तिमत्त्व असलेला व डोळे अत्यंत बोलके असलेला हा नट कामही तेवढ्याच वजनाने करतो. 'मीटिंग अॅट ब्रे' मध्ये हा पियानिस्ट असतो. तसेच वर्तमानपत्रांतूनही संगीतावर लिहीत असतो. परन्तु सैन्यात गेलेल्या संगीतप्रेमी मित्राकडून तार येते म्हणून तो एका अनोळखी गावी अगदी अनोळखी विश्वात जातो. सबंध चित्रपटावर युद्धाची गंभीर छाया पडली आहे. गाव ओस पडले आहे. स्टेशनवर सैनिक आहेत. गाडीतील चित्रणातही युद्धाची भीती परिणामकारकरितीने चित्रित झाली आहे. अशा ह्या परक्या गावी आपल्या मित्राच्या वाड्यात त्याला अनोळखी स्त्री भेटते. ही स्त्री अधिक गूढ वाटावी अशी फारच मोजके बोलते. मात्र पाहुणचार मात्र मनासारखा करते. मित्राची वाट बघणाऱ्या ह्याची चलबिचल होते. साऱ्या स्मृती उफाळून वर येतात. अगदी पियानोतील सुरासारख्या. जसजशी वेळ जातेय तसतशी अधिकच गूढता पसरत राहाते. ती अनोळखी बाई म्हणजे त्याला एक कोडेच वाटते. वैशिष्ठ्य असे की, त्याच्या आवडीचं सारं काही पाहुणचारात मिळते. केवळ मित्राची गाठ घेण्या-

साठी आलेला हा साऱ्या स्मृतीसह हळूहळू नकळत त्या स्त्रीकडे ओढला जातो. आणि तीही अनोळखी स्त्री त्याला शय्यासुख देते. सारं चमत्कारिकच असतं. एका अनोळख्या गावात आलेला हा अनोळखी अनुभव. हे स्वप्न तर नाही ना, अशी शंका यावी. मित्र आला नाही म्हणून हा सकाळीच निघतो. स्टेशनवर कळते, विमाने हवेमुळे अडकून पडलेली असतात. मग पुन्हा त्या घरी जावं की परत पॅरिसला जावं ह्या द्विधा मनःस्थितीत तो राहातो. कारण एकीकडे ती ओढ लावणारी स्त्री तर एकीकडे घरी खेळत, गाणे म्हणणारी पोरगी आठवते. ह्या चित्रपटाचा शेवट अत्यंत समर्पक असा आहे. हा चित्रपट आपल्याला एका वेगळ्या अनुभवविश्वात नेतो.

दुसरा लक्षात राहाणारा म्हणण्यापेक्षा चक्रावून टाकणारा चित्रपट म्हणजे मालप्रेटिस. मालप्रेटिस हे एका अद्भुत वास्तूचं नाव. ह्या वास्तुत जे घडतं ते तर भयंकर आहेच परंतु जे घडतं ते स्वप्न आहे की सत्य आहे हेच कळत नाही. शेवटी स्वप्न आणि वास्तव ह्यातील सत्य काय की हे जीवनच एक स्वप्न आहे ह्या संभ्रमात हा चित्रपट नेऊन सोडतो. ह्या चित्रपटातील सेटिंग्ज व फोटोग्राफी अत्यंत कल्पक व रम्यभीषण अशी आहे. फारा दिवसांनी परत गावी आलेल्या व आपले घर शोधणाऱ्या एका तरुणाला 'मालप्रेटिस' ह्या वास्तूत भयंकर अनुभव येतात. शेवटी सत्य काय आहे हे शोधण्यासाठी तो तळमळतो. शेवटी सत्य काय हेही उलगडते; परंतु पुन्हा तिथेच आल्याने शेवटी त्याच्या मनाला हा काल्पनिक तर खेळ नाही ना अशी शंका यावी तोच पुन्हा तो त्या मालप्रेटिस वास्तूत अडकतो. ह्या चित्रपटातील देखण्या नायकाचे काम चांगले झाले आहे. विशेषतः संबंध कथेला ग्रीक पुराणाची दिलेली बैठक योग्य वाटते. एखादी जी. ए. कुलकर्णींची कथा वाचल्याचा अनुभव हा चित्रपट बघून येतो.

इतर चित्रपटात 'लव्हर'मध्ये एका रोगट मनाच्या तरुणीचे काल्पनिक चाळे दाखवून त्या वृत्तीतूनच ती आपल्याला आवडणाऱ्या माणसाचा खून कसा करते ते दाखविले आहे. हा चित्रपट बऱ्याचजणांना कंटाळवाणा वाटला. मात्र ह्या चित्रपटातील नायिकेचं काम चांगलं झालं असून त्यामुळे ती लक्षात राहाते. 'लुईसा ए वर्ड ऑफ लव्ह' मात्र कथेत वेगळा वाटला. परंतु चित्रण जरा भडक वाटले. दोन पुरुषांवर एक स्त्री तेवढ्याच उत्कटतेने आणि एकाच वेळी प्रेम करू शकते. द्वेष, मत्सर ह्यातून मुक्त होऊन सबंध जगातील साऱ्या सांकेतिक कल्पना झुगारून; परंतु ह्यातील केवळ शारीरिक भोगकल्पनांमुळे ह्या चित्राला फार मोठ्या प्रेमकथेची किंवा व्यक्तिमत्त्वाची उंची लाभली नाही. निर्व्याज प्रेमाची प्रतिमा म्हणून लहान मुलीचा केलेला वापर मात्र चांगला आहे. 'रेडरूम'मध्ये केवळ असूयेने पेटलेली मुलगी आपल्या सावत्र आईच्या होणाऱ्या प्रियकरास आपल्या जाळ्यात ओढते; परंतु तिचं प्रेम खरं नाही म्हणून त्या प्रियकराने 'वेश्या' म्हणून तिची केलेली विटंबना तिला शेवटी भयंकर 'फ्रस्ट्रेट' कशी करते ह्याचं चित्रण आहे. जॉनी ॲण्ड जेसी हा हिंदी वळणाचा 'गरम' चित्रपट. जॉनी आणि जेसीला चरसी गुण्डामुळे अनेक भयानक अनुभव येतात. त्यात जेसीचा अंत व शेवटी रहस्य उघड होणे हा प्रकार आहे. ह्या चित्रपटातील खून होतानाच दाखविलेला शॉट् पुन्हापुनः येतो; परंतु तो अत्यंत बटबटीत वाटतो.

ह्या सहा चित्रपटात सेक्स हा मुक्तपणे आला आहे. परंतु सेक्सचं चित्रण जेवढे अटळ हवे तेवढे नाही. अत्यंत दक्षतेने सेक्सचे चित्रण केले आहे. त्याला कसलीही कलात्मक उंची नाही. केवळ तांत्रिकतेने आलेला हा सेक्स वाटतो. हां! तुम्हाला सेक्स पाहिजे ना? मग घ्या तर! अगदी संपूर्ण उघडावाघडा. त्यामुळे एक दोन चित्रपट सोडले तर कलात्मक दर्जेदार चित्रपट पाहिल्याचे समाधान मिळत नाही. तरीही मिटिंग ॲट ब्रे हा काव्यात्मता असलेला चित्रपट एक तरल अनुभव देऊन जातो तर 'मालप्रेटिस' हा चित्रपट 'लाईफ इज ड्रीम' म्हणून चकरावून सोडतो आणि म्हणून हे दोन्हीही बेल्जियम चित्रपट त्यातील देखण्या नटाबरोबरच लक्षात राहतात. □


**पूर्णिया**
**अनिल अवचट**
**किंमत : सहा रुपये**

---

**शनवारवाड्यातील**
**शमादान**
**ब. मो. पुरंदरे**
**किंमत : साडेतीन रुपये**

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC-68

## वैभव आणि वैराग्य यांचे चमत्कारिक मिश्रण : पृष्ठ ४ वरून

कारणाचा अविभाज्य भाग बनला आहे. नवनिर्माणाला सर्वसामान्य माणूस शिव्या घालीत असला तरी या शब्दाची व विद्यार्थी–चळवळीची जादू अजून कायम आहे. विद्यार्थी–युवक हेही राजकारणातील आपला सहभाग कायम ठेवण्याची जारीने खटपट करीत आहेत. अहमदाबाद शहरात तीन वेगवेगळ्या राजकीय युवक–विद्यार्थी संघटना आहेत. युवा आंदोलन समिती (हिचा जनता फ्रंटला पाठिंबा आहे.), युवा संघर्ष समिती (जनता फ्रंटच्या पार्लमेंटरी बोर्डात स्थान हवे या मुद्द्यावर या समितीने फ्रंटशी विरोध करण्याचे धोरण ठेवले आहे व स्वतःचे उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेतला आहे.), गुजरात युवक नागरिक समिती (जनता फ्रंट हा एक फार्स आहे असे हिचे मत आहे.). प्रत्यक्ष निवडणुकीपर्यंत अजूनही काही युवा संघटना उभ्या राहातील.

' युवक–विद्यार्थी राजकारण ' हा घटक आगामी निवडणुकांवर बराच व अनपेक्षित प्रभाव टाकू शकेल. गुजरातमधील काँग्रेस पक्षात सध्या निवडणुकीत एकसंध पक्ष म्हणून जनतेसमोर कसे जायचे याची चिंता जास्त आहे. तरुणतुर्क कृष्णकांत यांच्याबरोबर रतुभाई अडाणी, अमूल देसाई, सनत मेहता यांनी नुकतीच गुप्त राजकीय चर्चा केली. त्यांच्यातील चलबिचल स्पष्ट आहे. काँग्रेस हायकमांडनेही आपला पवित्रा बदलला असून निवडणुकीत मुरब्बी व ' शुअर ' सीट धरतील अशांना तिकिटे देण्याचा विचार चालवला आहे.

काँग्रेस गोटातील निवडणूक हालचालींना येथील वृत्तपत्रे विशेष प्रसिद्धी देत नाहीत. मोरारजी, जनता फ्रंट व तीन युवक संघटनांमधील मारामाऱ्या यावर ती भर देतात. याचा उलटा परिणाम म्हणून काँग्रेसपक्ष ववाएटली अधिकारावर येण्याची शक्यता आहे. गुजरात निवडणुकांचा निर्णय जाहीर केल्यावर थोड्याच दिवसात श्रीमती गांधींनी गुजरातमधील चार जिल्ह्यांचा झंझावाती दौरा केला व गुजराती जनतेची भलावण केली. यापुढे निवडणुकीपर्यंत त्या दर आठवड्यास गुजरातमध्ये येतील यात शंका नाही.

निवडणुकीस एक महिना राहिला आहे. अहमदाबादी जनता तळपत्या उन्हात आपले रोकडे व्यवहार करीत आहे. अद्याप शहरावर निवडणुकीची कळा नाही. येथील सर्वसाधारण माणूस तसा राजकीय प्रकृतीचा नाही. सरकारव्यतिरिक्तच्या सत्तेचे आकर्षण ( आध्यात्मिक वा आर्थिक ) हे गुजराती माणसाचे वैशिष्टय वाटते. शहरात असंख्य धार्मिक कार्यक्रम चालू असतात. वैभव आणि वैराग्य यांचे एक चमत्कारिक मिश्रण इथे आढळून येते. वागण्यात प्युरिटनिझमची चांगलीच झाक दिसते. कडवेपणा, वैचारिक स्पष्टता वा सामूहिकतेचे भान यांचा येथे आढळ विशेष होत नाही.

२२ लाख वस्तीच्या या शहरात, कामगार–मजुरांचे वर्चस्व असूनही येथे कोणत्याच छटेच्या साम्यवादास थारा नाही, याचे कारण गुजराती माणसाच्या वरील वैशिष्टयात सापडू शकेल. □




# भस्मासुराचा उदयास्त

अमाप लोकप्रियता लाभलेल्या ग्रंथाची
नवीन चित्रपुरवणीसह प्रसिद्ध होत असलेली
तिसरी अद्ययावत आवृत्ती

लेखक : रा. म. शास्त्री / वि. ग. कानिटकर
प्रसिद्धीनंतरची किंमत : रुपये पंचेचाळीस सुमारे
पृष्ठसंख्या ७२५ (डेमी) सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत : **रुपये तीस फक्त.**

१ जून १९७५ पूर्वी

प्रसिद्धीपूर्व ग्राहकांनी रुपये तीस म. ऑ. वा ड्राफ्टने पाठवून आपली प्रत कृपया नोंदवावी. चेक असल्यास एक रुपया वटणावळ अधिक.

ग्रंथ रजि. पोस्टाने घरपोच हवा असल्यास रुपये तीन अधिक पाठवावेत.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**